वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.)

मा. सर्वसाधारण सभा

मा. सर्वसाधारण सभा सूचना क्र. ०६

दि.१५/०४/२०२६

प्रति,

मा.श्री./श्रीमती .....,

नगरसेवक/ नगरसेविका,

वसई-विरार शहर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभा गुरुवार, दि.२३/०४/२०२६ रोजी दुपारी ०३:०० वाजता 'सर्वसाधारण सभागृह', ४ था मजला, वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, यशवंत नगर, विरार (प.) येथे खालील विषयांवर निर्णय घेणेसाठी आयोजित करण्यांत आली आहे.

तरी सदर सभेस कृपया उपस्थित रहावे हि विनंती.

महानगरपालिका मा.सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका

१. मागील दि.२०/०३/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेबाबत.
२. प्रश्नोत्तरे.
३. शासकीय पत्र व्यवहार माहितीस्तव.
४. श्रीम.जयश्री पांडुरंग मानकर, अधिक्षक यांच्या स्वेच्छा सेवा निवृत्तीबाबत.
५. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.
६. वसई-विरार शहर महागनरपालिका भुयारी गटार योजनेअंतर्गत (STP-२) मुख्य मलनि:स्सारण वाहिनीस इमारतीच्या मलनि:स्सारण वाहिनीशी जोडणी करणे कामाचे GST च्या रक्कमेस सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.
७. विकास आराखडा (Development Plan) सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत.
८. मा.सर्वोच्च न्यायालय येथील Suo Moto Writ Pet.(Civil) No.५/२०२५ बाबत दि.११/०८/२०२५ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने मनपा क्षेत्रात भटक्या श्वानांना खायला देण्याकरिता जागा निश्चित करुन प्रसार माध्यमांमध्ये जनजागृतीकरिता देणेसाठी मा. महासभेची मान्यता मिळणेबाबत.
९. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३३ व अन्वये विरार येथील हायस्पीड रेल्वे स्थानक क्षेत्रात स्थानिक क्षेत्र योजना (Local Area Plan) तयार करणेकामी इरादा प्रसिध्द करण्याबाबत.
१०. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई (पू) अंतर्गत विविध विकास कामे करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे बी-१ निविदा दर मागविणे कामी मान्यता मिळणे बाबत.
११. वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई (पू) गोखिवरे फादरवाडी येथिल बहुउद्देशीय इमारतीतील दुसऱ्या मजल्यावर विभागीय कार्यालयासाठी फर्निचर व्यवस्था करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे बी-१ निविदा दर मागविणे कामी मान्यता मिळणे बाबत.

१२.वसई-विरार शहर महानगरपालिकेस सन २०२६-२०२७, २०२७-२०२८ व २०२८-२०२९ या वित्तीय वर्षासाठी इलेक्ट्रीक शक्तीवरील व इतर इंधनवार चालणारी वाहने भाडे तत्वावर घेणे तसेच त्याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

१३.६९ गावे पाणी पुरवठा योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या व वसई-विरार शहर महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या ५२ गावांमधील विविध जलकुंभ दुरूस्ती करणेकामी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

१४.वांद्री मध्यम प्रकल्प, ता.जि.पालघर वसई-विरार शहर महानगरपालिकेकर पाण्यासाठी आरक्षीत करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१५.वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात माहिती शिक्षण प्रसार व जनजागृती/ नागरीकांच्या सवयींमधिल बदल (Information Education Communication / Behaviour Change Communication) संबंधित उपक्रम राबविणेकरिता अभिकर्त्याची नियुक्ती करणेकामी होणाऱ्या खर्चास मा. सर्वसाधारण सभेपुढे प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

१६. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत विरार (प.) यशवंत नगर येथील परिवहन सेवेसाठी बस डेपो व नविन प्रशासकीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील खुले लॉनच्या जागेवर सभागृहाचे बांधकाम करणेसाठी प्रकल्प सल्लागार / वास्तुविशारद यांची नेमणूक करणेकामी स्वारस्य अभिरुची (EOI) मागविणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

आपला विशासू,

(विश्वनाथ तळेकर)
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १ **सभा सुचना क्र. ६** **दिनांक : २३/०४/२०२६**

विषय :- मागील दि.२०/०३/२०२६ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेबाबत.

ठराव/निर्णय :- दि.२०/०३/२०२६ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेचे कामय केलेल्या इतिवृत्ताचे वाचन करुन दुरुस्तीसह कायम करण्यात आले.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(~~अजीव~~ पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २ | सभा सुचना क्र. ६ | दिनांक : २३/०४/२०२६

विषय :- प्रश्नोत्तरे.

अ.क्र.	सचिव कार्यालयास प्रश्न प्राप्त दिनांक	सदस्याचे संपूर्ण नाव व प्रभाग क्रमांक	प्रश्नाचे संक्षिप्त स्वरूप
१.	१६/०४/२०२६	श्री.पंकज दत्तात्रेय देशमुख, प्रभाग क्र.१०-ड	मागील महासभेत रेल्वे स्थानक परिसर फेरीवालामुक्त करण्याचा जो निर्णय झाला, त्यावर आतापर्यंत प्रशासनाने कोणती ठोस कार्यवाही केली आहे? त्याचा सविस्तर अहवाल सादर करावा. जर कार्यवाही सुरू असेल, तर वसई, नायगाव, नालासोपारा आणि विरार या स्थानक परिसरातून अद्याप फेरीवाले पूर्णपणे का हटलेले नाहीत? प्रशासकीय यंत्रणा यात अपयशी का ठरत आहे? वसई, नायगाव, नालासोपारा आणि विरार या चारही स्थानक परिसरातील फेरीवाले हटविण्याची जबाबदारी नेमक्या कोणत्या अधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे? त्या अधिकाऱ्यांची नावे व पदनाम काय आहेत? संबंधित अधिकाऱ्यांवर नेमकी कोणती जबाबदारी आणि कर्तव्ये सोपवण्यात आली आहेत? (उदा. जप्तीची कारवाई, दंड आकारणे किंवा पोलीस बंदोबस्त मिळवणे). वारंवार सूचना देऊनही आणि महासभेचा ठराव असतानाही संबंधित अधिकारी कारवाई करत नसतील, तर अशा कर्तव्यदक्षता न दाखवणाऱ्या अधिकाऱ्यांवर प्रशासन कोणती शिस्तभंगविषयक कारवाई करणार आहे?
२.	१७/०४/२०२६	श्री.सचिन संभाजी देसाई प्रभाग क्र. ८-ड	रेल्वे स्टेशन, वर्दळीच्या ठिकाणच्या रस्त्यावरील अनधिकृत फेरीवाले हटविण्याबाबत मा.सुप्रीम कोर्टाचे आदेश आहेत. परंतु वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्टेशन परिसरातील रोड वरील अनधिकृत फेरीवाले हटविण्याबाबत आजतगायत कोणतीही ठोस कार्यवाही महानगरपालिकेकडुन झाल्याचे निदर्शनास येत नाही.
३.	१७/०४/२०२६	श्रीमती प्रज्ञा कमलाकर पाटील, प्रभाग क्र.१५-अ	**ट्रॅफिक आणि अनधिकृत फेरीवाले** "शहरातील मुख्य रस्ते फेरीवाल्यांनी व्यापल्यामुळे निर्माण होणाऱ्या ट्रॅफिक समस्यांवर महापालिकेचे स्पष्ट 'फेरीवाला धोरण अंमलबजावणी कधी होणार ? नियमित दडात्मक कारवाईनंतरही परिस्थिती जैसे थे का राहते? 'नो हॉकर्स झोनची प्रभावी अंमलबजावणी का होत नाही ?"
४.	१७/०४/२०२६	श्री.प्रफुल्ल जगन्नाथ साने, प्रभाग क्र.४ (अ)	वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरीकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी नळ जोडण्या देण्याबाबत. वसई-विरार शहर महानगरपालिकेत भुतपुर्व 4 नगरपरिषदा व ५३ गावांचा समावेश झाला असून सदर गावांमध्ये व त्यांच्या हद्दीमध्ये आजपावेतो खुप कमी प्रमाणात नागरीकांना नळाब्दारे पाणी उपलब्ध होत आहे. अन्य सर्व नागरीकांना अद्याप नळजोडण्या काही तांत्रिक बाबींमुळे देण्यात येत नाहीत. सद्यःस्थितीत

			उन्हाळ्याचे दिवस सुरू असून गरीब नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. परिणामी काही नागरीक अनधिकृत नळजोडण्या घेत असल्याच्या तक्रारी देखील प्राप्त होत आहेत.भारताच्या संविधानातील कलम २१ अन्वये प्रत्येक नागरिकास जीवनाचा व सन्मानाने जगण्याचा अधिकार असून त्याअंतर्गत स्वच्छ पाणी, स्वच्छता व मूलभूत नागरी सुविधा यांचा समावेश होतो. तसेच, ७४ वी घटना दुरुस्ती नुसार अशा सेवा पुरविण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपविण्यात आलेली आहे.महानगरपालिका क्षेत्रात निवास करणाऱ्या नागरीकांना किमान पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अधिकृत नळजोडण्या दिल्यास त्यांचा मुलभूत हक्क त्यांना उपलब्ध करून देणे शक्य होईल. तरी भारताच्या संबिधानातील कलम २१ अन्वये तसेच ७४ व्या घटना दुरुस्ती नुसार महानगरपालिकेची जबाबदारी असलेली बाब म्हणजे नागरीकाचा मुलभुत अधिकार "पिण्याचे शुध्द पाणी" उपलब्ध करून देण्यासाठी सर्व मालमत्तांना सरसकट नळजोडण्या देण्याबाबत ठोस निर्णय घेण्यात यावा ही विनंती.

ठराव/निर्णय :- सन्मा. सदस्य यांनी कलम ४४ अंतर्गत विचारलेल्या प्रश्नांपैकी वरीलप्रमाणे स्वीकृत केलेल्या प्रश्नांवर सभागृहात सविस्तर चर्चा करणेत येऊन ठेकेदाराने नेमून दिलेली कामे योग्यरित्या करावी व प्रशासनाने यावर लक्ष देणे असे एकमताने ठरविण्यांत आले.दिलेल्या उत्तराबाबत संबंधित सदस्यांना अवगत करणेत आले.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३ **सभा सुचना क्र. ६** **दिनांक : २३/०४/२०२६**

विषय :- शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव .

ठराव/निर्णय :-

१. महाराष्ट्र शासान, नगर विकास विभाग, शासन आदेश क्र.गॅविसू-२०२६/प्र.क्र.११६/नवि-२०, दिनांक २७/०३/२०२६

२. महाराष्ट्र शासान, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण २०२०/प्र.क्र.१३१/कार्या-२, दिनांक ३०/०३/२०२६

३. महाराष्ट्र शासान, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- पुरक-२०२५/प्र.क्र.१७१/नवि-३२, दिनांक ३०/०३/२०२६

४. महाराष्ट्र शासान, सामान्य प्रशासन विभाग (मातं), शासन निर्णय क्रमांक- आयटी-२०२६/प्र.क्र.७२/मातं, दिनांक ०१/०४/२०२६

५. महाराष्ट्र शासान, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- आरोग्य-२०२४/प्र.क्र.९३/नवि-२०, दिनांक ०१/०४/२०२६

वरिल शासकीय प्रत्र व्यवहाराची माहिती व प्रत प्राप्त झालेली आहेत असे एकमताने मान्य केले.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुतानें~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव ~~पाटील~~)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४ **सभा सुचना क्र. ६** **दिनांक : २३/०४/२०२६**

विषय :- श्रीम. जयश्री पांडूरंग मानकर, अधिक्षक यांच्या स्वेच्छा सेवा निवृत्तीबाबत.

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" नवघर-माणिकपूर येथील आस्थापनेवरील श्रीम. जयश्री पांडुरंग मानकर, अधिक्षक यांनी दि. १८/१२/२०२५ रोजी स्वेच्छा सेवानिवृती मिळणेबाबत अर्ज सादर केलाआहे.

श्रीम. जयश्री पांडुरंग मानकर, यांची नियुक्ती तत्कालीन दिवाणमान ग्रामपंचायत ठराव क्र.४(४) दि.२३/०८/१९८९ नुसार मासिक पगार रु. ९५०-२०-११५०-द.रो.२५-१४०० या वेतनश्रेणीत नेमणूक करण्यात आली. दि. ०१/०९/१९८९ पासून कनिष्ठ लिपिक म्हणून कामावर रुजू झाल्या. तसेच श्रीम. जयश्री पांडुरंग मानकर यांची अधिक्षक पदावर कार्यालयीन आदेश क्र. आस्था/७३८, दि. २८/१२/२०२१ अनुसार पदोन्नती देण्यात आली आहे. त्यांना दि. २८/१२/२०२१ पासून पदोन्नतीच्या पदाचे वेतनस्तर रु. ५६८००/- लागु करण्यात आले.

श्रीम. जयश्री पांडुरंग मानकर, अधिक्षक हयांची नेमणूकीपासून ते वसई विरार शहर महानगरपालिकेत ३६ वर्षे ५ महिने सेवा झालेली आहे. त्यांचे सद्याचे वय ५७ वर्षे असून त्याच्या वैयक्तीक व कौटुंबिक जबाबदाऱ्यामुळे त्यांनी स्वेच्छा सेवानिवृती हवी आहे, असे त्यांनी अर्जात नमूद केलेले आहे. श्रीम. जयश्री पांडुरंग मानकर, अधिक्षक यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित नाही, तसेच न्यायालयीन प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील कलम ६६ नुसार स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याबाबत पोटनियम (१) मध्ये नमुद केल्यानुसार स्वेच्छा निवृत्तीकरीता शासकीय कर्मचाऱ्यांनी दिलेली नोटीस नियुक्ती प्राधिकाऱ्याने स्विकारणे आवश्यक असेल, मात्र उपरोक्त अर्जामध्ये नमुद केलेल्या कालावधी संपण्यापुर्वी (म्हणजेच अर्जाच्या तारखेच्या तीन महीन्यांच्या आत) नियुक्ती प्राधिकाऱ्याने सेवानिवृत्तीसांठी परवानगी देण्यास नकार दिला नाही तर त्या कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासुन सेवानिवृत्ती अंमलात येईल.

सबब श्रीम. जयश्री पांडुरंग मानकर, अधिक्षक यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीस महानगरपालिका स्तरावर परवानगी देण्यात आल्यानंतर, त्यांना सेवानिवृत्तीनंतरचे सर्व लाभ म्हणजेच सेवानिवृत्तीवेतन उपदान, रजा रोखीकरण, व इतर अनुषंगिक लाभ देणे आवश्यक आहे.

तरी श्रीम.जयश्री पांडुरंग मानकर, अधिक्षक यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीच्या अर्जावर महानगरपालिका स्तरावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यास शिफारस आहे.

ठराव / निर्णय :- श्रीम. जयश्री पांडुरंग मानकर, अधिक्षक यांच्या दि. १८/१२/२०२५ रोजी स्वेच्छा सेवानिवृती मिळणेबाबतच्या विनंती अर्जानुसार त्यांची म.ना.से. (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ कलम ६६ पोटनियम (१) अन्वये दि.०१/०५/२०२६ पासून मध्यानपूर्व महानगरपालिका सेवेतुन स्वेच्छा सेवानिवृत्त करण्यास तसेच त्यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर सेवा उपदान, रजा रोखीकरण, सेवा निवृत्ती वेतन व इतर अनुषंगिक लाभ अदा करणेस ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव - ~~प्रफुल्ल साने~~

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराय/सर्वानुमते/~~बहुमाने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(~~अजीव~~ अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५ **सभा सुचना क्र. ६** **दिनांक : २३/०४/२०२६**

विषय :- जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-

1) जा.क्र./वविशम/उप-आ./50/24-25, दि.13/03/2025 रोजीचे पत्र.

2) प्रशासकीय ठराव क्र. 2411, वृक्षप्राधिकरण/उद्यान, विभाग दि.13/03/2025

3) जा.क्र./जिनिस/O/२०२५/Mar/combineAA/०६०५७, Date - १८/०३/२०२५

4) F.no.२४/१७/MC/Vasai/२०२०-२१, Date - २८/०५/२०२५

वरील विषय संदर्भान्वये सादर करणेत येते की, सन 2024-25 या वित्तीय वर्षामध्ये 'दलितेत्तर वस्ती सुधारणा' या योजनेअंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील प्रभाग समिती 'आय' (वसई गाव) मधील वीर चिमाजी आप्पा उद्यानामध्ये खुली व्यायामशाळा एडवेंचर थीम पार्क साहित्य, लहान मुलांची खेळणी व इतर अनुषांगिक कामे संदर्भ क्र. 1 नुसार प्रस्तावित करण्यात आली होती. सदर कामास वसई-विरार शहर महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्र. 2411, दि.13/03/2025 अन्वये मान्यता घेवून सदर प्रस्ताव पुढील मंजूरीकरीता मा. जिल्हाधिकारी यांचे कार्यालयास पाठविण्यात आला होता. सदर प्रस्तावास संदर्भ क्र. 3 नुसार मा. जिल्हाधिकारी सो. यांची रू. 2,48,90,925/- (अक्षरी रू. दोन कोटी अड्ठेचाळीस लक्ष नव्वद हजार नवशे पंचवीस रूपये मात्र/-) इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यतेसह निधी वितरीत करणेची मंजूरी प्राप्त झालेली आहे.

'वीर चिमाजी आप्पा उद्यान' हे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुंबई मंडळ, महाराष्ट्र यांच्या अखत्यारितीत असलेल्या भुखंडावर विकसित करणेत आलेले असून वरील नमूद कामे करणेकरीता भारतीय पुरातत्व विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत मा. अधिक्षक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुंबई मंडळ, महाराष्ट्र यांना कळविण्यात आले होते. परंतू, संदर्भ क्र. 4 नुसार मा. अधिक्षक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुंबई मंडळ, महाराष्ट्र यांचे कडून सदरचे काम करणेस परवानगी नाकारण्यात आली आहे.

त्यामुळे, खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे सदरचे मंजूर कामाचे स्थळ बदलून वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (ई) अंतर्गत महापालिकेच्या ताब्यात असलेली आरक्षण क. 388 मधील उद्यानासाठी राखीव असलेल्या जागेमध्ये खुली व्यायामशाळा एडवेंचर थीम पार्क साहित्य, लहान मुलांची खेळणी व इतर अनुषांगिक कामे करता येतील.

अ.क्र.	कामाचे नावे	
	कामाचे जुने मंजूर ठिकाण	कामाचे सुधारीत ठिकाण
१.	वसई- विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील प्रभाग समिती 'आय' (वसई गाव) मधील वीर चिमाजी आप्पा उद्यानामध्ये खुली व्यायामशाळा एडवेंचर थीम पार्क साहित्य, लहान मुलांची खेळणी व इतर अनुषांगिक कामे करणे.	वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील प्रभाग समिती (ई) अंतर्गत महापालिकेच्या ताब्यात असलेली आरक्षण क्र.३८८ मधील उद्यानासाठी राखीव असलेल्या जागेमध्ये खुली व्यायामशाळा एडवेचर थीम पार्क साहित्य, लहान मुलांची खेळणी व इतर अनुषांगिक कामे करणे.

सदरचे काम प्रभाग समिती (ई) अंतर्गत महापालिकेच्या ताब्यात असलेलो आरक्षण क्र. 388 मधोल उद्यानासाठी राखीव असलेल्या जागेमध्ये करणेस सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी, सदर प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेची सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेकरीता तसेच सदरचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी व मा. जिल्हाधिकारी यांची सुधारीत प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करणेकरीता व मंजूरी प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा दर मागविणेकामी सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेत यावा.

ठराव / निर्णय :-. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत प्रस्तावाचे वाचन करण्यांत आले परंतु सदरच्या प्रस्तावास मा. महासभा एकमताने स्थगिती देत आहे.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव – मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुतांने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६ **सभा सुचना क्र. ६** **दिनांक : २३/०४/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महागनरपालिका भुयारी गटार योजनेअंतर्गत (STP-2) मुख्य मलनि:स्सारण वाहिनीस इमारतीच्या मलनि:स्सारण वाहिनीशी जोडणी करणे कामाचे GST च्या रक्कमेस सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

कामाचे नाव :-	वसई विरार शहर महानगरपालिका भुयारी गटार योजना अंतर्गत (STP -2) मुख्य मलनि: स्सारण वाहीनीला इमारतीच्या मलनि:सारण वाहीनीशी जोडणी करणे.
अंदाजपत्रकीय रक्कम :-	रु ४५,८०,०२,२८७/-
प्रशासकीय मंजुरी :-	मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३ दि. १६/०२/२०१५
ई- टेण्डरींग द्वारे निविदा प्रसिध्दी :-	वविशम/काअ/बांध/६७५/१६ दि.३०/०९/२०१६ पृ.क प/१०१-प१०६कार्यकारी अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका
वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक :-	दि. ०१/१०/२०२६
वृत्तपत्राचे नाव व पृष्ठ क्रमांक :-	१) दै. मुंबई चौफेर २) दै. आमची मुंबई
ई-टेण्डरींग द्वारे निविदा प्रिपरेशनची तारीख :-	दि. ०३/१०/२०२६ दि. १७/१०/२०१६
ई-टेण्डरींग द्वारे निविदा स्विकारण्याची तारीख :-	दि. १८/१०/२०२६ दि. २१/१०/२०१६
ई- टेण्डरींग द्वारे ई-निविदा खरेदी व प्रिपरेशनची अंतिम तारीख :-	दि. ०४/०१/२०१६
(प्रथम मुदतवाढ) ई- टेण्डरींग द्वारे निविदा स्विकारण्यावी तारीख :-	दि.०५/११/२०१६

(प्रथम मुदतवाढ) दि. ०६/११/२०१६

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रकीयेद्वारे प्राप्त निविदा :- ०७

ई - टेण्डरींग द्वारे निविदा उघडण्याची
दिनांक (प्रथम लखोटा) :- दि. ०७/११/२०१६

ई- टेण्डींग द्वारे निविदा उघडण्याची
दिनांक (द्वितीय लखोटा) :- दि. १६/११/२०१६

वसई विरार शहर महानगरपालिका भुयारी गटार योजनेअंतर्गत (STP-२) मुख्य मलनि:स्सारण वाहिनीस इमारतीच्या मलनि:स्सारण वाहिनीशी जोडणे करणेचे कामाचे संदर्भीय क्र.१ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता. संदर्भिय कार्यादेशानुसार प्रभाग समिती "बी " व "सी " कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी मुख्य मलनि:स्सारण वाहिनीस इमारतीचे मलनि:स्सारण वाहिनीशी जोडणेचे काम मे स्मृती इंटरप्राईजेस यांनी दिलेल्या कार्यादेशानुसार यशस्वीरित्या पुर्ण केलेले आहे. प्रभाग समिती "बी " व "सी "कार्यक्षेत्रातील सदरचे काम पुर्ण झालेनंतर खालील तक्त्याप्रमाणे देयक अदा करण्यात आलेले आहेत.

A. प्रभाग समिती ''बी "अंतर्गत अदा केलेली देयके खालीलप्रमाणे

अ.क्र.	धावते / देयक	देयक रक्कम (RS)	दिनांक़	कपात केलेली GST रक्कम		पृष्ठ क्र.
				CGST(RS)	SGST (RS)	
१	पहिले / धावते	६११४८६२	२६/१२/२०१८	६११४९	६११४९	
२	दुसरे/धावते	५३४५५२७	५/१/२०१९	५३४५५	५३४५५	
३	तिसरे /धावते.	२८०२७८६	२९/१/२०१९	२८०२८	२८०२८	
४	चौथे /धावते	३०१२२५२	२९/१/२०१९	३०१२३	३०१२३	
५	पाचवे धावते	३३१८८७०	७/३/२०१९	३३१८९	३३१८९	
६	सहावे /धावते	८३९०१०१	२४/६/२०१९	८३९०१	८३९०१	
७	सातवे /धावते	७७८१७८९	२९/१०/२०२०	७७८१८	७७८१८	
८	आठवे/धावते	५९३२४७७	२९/१०/२०२०	५९३२५	५९३२५	
९	नववे /धावते	७०८५०१५	२४/३/२०२१	७०८५०	७०८५०	
१०	दहावे/धावते	३५५२३१४	१८/८/२०२२	३५५२३	३५५२३	
११	अकरावे /धावते	३२८०५०३	२३/३/२०२३	२७२७०	२७२७०	
एकुण		**५६६१६४९६**				

B. प्रभाग समिती ''सी "अंतर्गत अदा केलेली देयके खालीलप्रमाणे

अ.क्र.	धावते / देयक	देयक रक्कम (RS)	दिनांक़	कपात केलेली GST रक्कम		पृष्ठ क्र.
				CGST(RS)	SGST (RS)	
१	पहिले / धावते	६६७६०४४	२६/१२/२०१८	६६७६०	६६७६०	
२	दुसरे/धावते	४३७८७४६	१४/३/२०१९	४३७८७	४३७८७	
३	तिसरे /धावते	३८०२२६०	२४/६/२०१९	३८०२३	३८०२३	
४	चौथे /धावते	६६८६०७१	१९/१०/२०२०	६६८६१	६६८६१	
५	पाचवे धावते	३४६३३०१	११/१०/२०२०	३४६३३	३४६३३	
६	सहावे /धावते	६४३५५८९	२४/३/२०२१	६४३५६	६४३५६	

७	सातवे /धावते	८२७८८०६	०५/०७/२०२१	८०५८७	८०५८७	
८	आठवे/धावते	७३९५९२०	२४/१/२०२२	७३९५९	७३९५९	
९	नववे /धावते	३८१६२३१	२५/८/२०२२	३८१६२	३८१६२	
१०	दहावे/धावते	३९४८९११	२३/३/२०२३	३९२८०	३९२८०	
११	अकरावे /धावते	४८७९४८८	२२/३/२०२४	४८७९५	४८७९५	
एकुण		**५९७६१३६७**				

उक्त परिशिष्टानुसार मे स्मृती इंटरप्राईजेस यांच्या अदा केलेली देयके १ एप्रिल , २०१७ नंतरची आहेत. मे स्मृती इंटरप्राईजेस यांनी संदर्भिय क्र ०२ अन्वये GST ची रक्कमेची मागणी केलेली आहे तथापि मे. स्मृती इंटरप्राईजेस यांना अदा केलेल्या देयकाची तपासणी केली असता त्यांच्य प्रत्येक देयकातुन १% CGST व १% SGST ची कपात करण्यात आलेली आहे. दरम्यान उपरोक्त कामास दि. १७/०४/२०१७ रोजी कार्यादेश देण्यात आले असुन सदरचे काम दि. ०१/०७/२०१७ नंतर झालेले आहे. (शासन निर्णय जी.एस.टी १०१७ /प्र.क्र८१/कराधान १ दि. १९/०८/२०१७) च्या परिपत्रकाद्वारे दि. १ जुलै २०१७ नंतर करण्यात येणाऱ्या कामाबाबत काम सुरु ठेवण्यात यावे तसेच देयकही अदा करण्यात यावीत. अशा कामासंदर्भात दयावयाच्या देयकामध्ये जी एस टी अंमलबजावणीमुळे होणाऱ्या कराच्या बोज्यात होणाऱ्या बदलाबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्याचे निर्देश आहेत.

तसेच शासन निर्णय .जी .एस.टी १०१७ /प्र.क्र.१५५/कराधान १ दि. ११ सप्टेंबर च्या परिपत्रकान्वये २, ब परिच्छेदानुसार निविदा जर दि. ०१ जुलै २०१७ पुर्वी दाखल केली असल्यास कंत्राटदाराने अस्तित्वातल्या VAT प्रमाणे कराचा भार लक्षात घेऊन किंमत QUOTE केली असेल, मात्र कंत्राटदाराचे काम ०१ जुलै , २०१७ नंतर पुर्ण होणार असेल तर त्या कामावर जी एस टी ची आकारणी होणार आहे असे निर्देशित केले आहे. दि. १ जुलै ,२०१७ ते १७/०७/२०२२ पर्यंत १२% जी.एस.टी लागु असुन कंत्राटदाराच्या कराच्या भाराबाबत परिगणनेनुसार वाढीव जी.एस.टी देणे आवश्यक आहे. तसेच शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१७/ प्र.क्र.१२१ दि.२७/०९/२०२२ अन्वये बांधकाम सेवांसाठी १८% (९% CGST+ ९% SGST) असा दर निश्चित करण्यात आला असुन सदर दर हा दि. १८/७/२०२२ रोजीपासुन लागु करण्यात आलेला आहे. येणेप्रमाणे कंत्राटदाराच्या कराच्या भाराबाबत परिगणनेनुसार दि. १८/०७/२०२२ ते दि.२२/३/२०२४हया दिनांकापर्यंत संबंधीत ठेकेदारास प्रचलित जी एस टी दर खालीलप्रमाणे देणे अपेक्षित आहे.

S.NO	BILL	DATE	BILL AMOUNT Rs.	VAT (-) Taxable value	12% & 18 %GST
1	2	3	4	5	6
1	I st to IX ,B ward (as per 12% GST)	26/12/20218 TO 22/03/2021	49783679.00	47413027.62	56,89,563.36
2	X & XI,B ward (as per 18% GST)	22/08/2022 to 21/08/2023	6832817.00	6507444.76	11,71,340.06
3	I st to VIII ,C ward (as per 12% GST)	26/12/2018 to 24/01/2022	47116737.00	44873082.86	53,84,769.94
4	IX st to XI ,C ward (as per 18% GST)	25/08/2022 to 22/03/2024	12644630.00	12042504.76	21,67,650.86
TOTAL			116377867.00	110836065.00	1,44,13,324.22

सदर प्रकरणात संबंधित कंट्राटदारास जीएसटी च्या रक्कम उपरोक्त प्रमाणे देणे अपेक्षित असताना त्यांना अदा करण्यात आलेल्या नाहीत व संबंधित कंट्राटदाराने या सर्व रक्कमा जीएसटी विभागास भरणा केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने संबंधित कंट्राटदाराने सादर केलेल्या देयकांच्या प्रती व इतर सर्व आवश्यक बाबींचा विचार करता सदर प्रस्तावास मान्यता देण्यास व संबंधित ठेकेदारास उक्त रक्कम प्रदान करण्यास हरकत नाही.

तरी तक्यातील प्रचलित GST नुसार रक्कम रु १,४४,१३,३२४/- इतक्या रक्कमेस सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (अ) नुसार मा. महासभेपुढे मंजूरीस्तव शिफारस असे.

ठराव / निर्णयः - वसई-विरार शहर महागनरपालिका भुयारी गटार योजनेअंतर्गत (STP-2) मुख्य मलनि:स्सारण वाहिनीस इमारतीच्या मलनि:स्सारण वाहिनीशी जोडणी करणे कामाचे GST च्या रक्कमेस सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत प्रस्तावाचे वाचन करण्यांत आले परंतु सदरच्या प्रस्तावास मा. महासभा एकमताने स्थगिती देत आहे.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७ **सभा सुचना क्र. ६** **दिनांक : २३/०४/२०२६**

विषय :- विकारा आराखडा (Development Plan) सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत.

वसई विरार उपप्रदेशाची विकास नियंत्रण नियमावली -2001 यांस राज्य शासनाने नगरविकास विभाग अधिसुचना क्र. टीपीएस/120/1813/सीआर-48/200२/नवी-12 दि. 16/02/2004 अन्वये एम-1 ते एम-14 या बदलासहित तसेच ईपी-1 ते ईपी-7 यामधील नियम वगळून मंजुर केलेली असुन ती दि. 01/03/2004 पासुन अमलात आलेली आहे. राज्य शासनाने त्यानंतर नगरविकास विभाग अधिसुचना क्र. टीपीएस/120/1813/सीआर-48/2002/नवी-12 दि. 30/11/2005 अन्वये ईपी-1 ते ईपी-7 यामधीलवगळलेले नियम मंजुर केले असुन दि. 18/01/2006 पासुन अंमलात आलेले आहेत.

राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने अधिसुचना क्र. टि.पी.एस.12०१/1548/ सी.आर.234 (सी) दि.09/02/2007 अन्यये वसई विरार शहर उपप्रदेशाची विकास योजना भागशः मंजुर केली असुन ती दि. 15/03/2007 पासुन अंमलता आलेली आहे. तसेच नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्र.2606/412/प्र.क्र/223/2006/युडी-24 दि. 03/07/2009 अन्वये वसई विरार शहर महानगरपालिका अस्तित्वात आलेली असुन शासन निर्णय क्र. टि.पी.एस.1201/2429/सी.आर-262/युडी-12 दि. 07/07/2010 नुसार या महानगरपालिकेला नियोजन प्राधीकरण म्हणुन अधिकार प्रदान केलेले आहे. तसेच शासनाने वसई विरार शहर महानगरपांलिका हद्दीतुन वगळलेल्या 21 गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोकडे असलेले अधिकार, दि. 21 फेब्रुवारी 2015 पासुन वसई विरार शहर महानगरपालिकेला प्रदान केलेले आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीसाठी तयार करण्यात येत असलेला विकास आराखडा (Development Plan) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 (MRTP & Act) अन्वये तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

सदर विकास आराखडा तयार करताना विविध तांत्रिक बाबी विविध शासकीय विभागांशी समन्वय साधुन माहिती संकलीत करणे तसेच आवश्यक सुधारणा व अंतिमीकरणाची प्रक्रिया सुरु आहे. सदरची प्रक्रिया ही जटील व सखोल असल्याने, मुळ नियोजित कालमर्यादेत विकास आराखडा सादर करणे शक्य होणार नाही, असे दिसून येते.

त्यानुसार वरील वस्तुस्थिती लक्षात घेता वसई विरार शहर महानगरपालिकेकरीता सुधारित विकास आराखडा तयार करण्यासाठीचा इरादा दि. 02/11/2023 रोजी घोषित करण्यांत आला असून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 (MRTP & Act) कलम 26 अन्वये उद्देश घोषित केल्याच्या दिनांकांपासून दोन वर्षाच्या मुदतीत विकास योजनेचा मसुदा तयार करणे बंधनकारक आहे, म्हणजेच दि.02/11/2025 रोजी पर्यंत तयार करुन प्रसिध्द करणे आवश्यक होते. तथापि, तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 148 (अ) अन्वये राज्यातील लोकसभा निवडणुक, विधानसभा निवडणुक, कोकण पदवीधर निवडणुक व महानगरपालिकेच्या निवडणुक यांचे कालावधी वगळता, सुधारीत विकास योजनेचा मसुदा तयार करणेचा मुळ मुदत ही दि.30/04/2026 पर्यंत आहे.

म्हणूनच, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 मधील कलम 26 च्या तिस-या परंतुकानुसार विकास आराखडा तयार करण्यासाठी अद्दायावत जनगणेच्या आकडेवारीनुसार दहा लाख किंवा अधिक परंतु एक

कोटीपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या महानगरपालिका किंवा नियोजन प्राधिकरणाच्या बाबतीत, कमाल बारा महिन्यांपर्यंत अनुज्ञेय असून त्यानुसार शासनाकडे मुदतवाढ बाबतची मागणी करणे आवश्यक आहे.

त्यामुळे पुढील प्रमाणे मागणी करण्यांत येते की,

1. वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीसाठी तयार करण्यात येत असलेल्या विकास आराखडयास (DP) अंतिम स्वरुप देण्यासाठी अतिरिक्त कालावधी आवश्यक असल्याने, उक्त अधिनियमाच्या कलम 26 अन्वये शासनाकडे मुदतवाढ मंजूर करण्यासाठी प्रसताव सादर करण्यात यावा.

2. सद्दस्थितीत उप-संचालक (DP Unit) चे पद रिक्त असल्याने व नगर नियोजन अधिकारी यांची नियुक्त प्रलंबित असल्यामुळे विकास योजनेच्या कालमर्यादेचा विचार करता मुदत वाढीचा प्रस्ताव नगर रचना मुख्य कार्यालय येथे सादर करणेच्या अनुषंगाने योग्यती कार्यवाही आयुक्त यांचे मार्फत करणे करीता मुदतवाढीचा व सदरचा प्रस्तावा मा. सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर करणेच्या मान्यतेकरीता सादर.

ठराव /निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीसाठी तयार करण्यात येत असलेल्या विकास आराखडयास (DP) अंतिम स्वरुप देण्यासाठी अतिरिक्त कालावधी आवश्यक असल्याने तसेच सद्दस्थितीत उप-संचालक (DP Unit) चे पद रिक्त असल्याने व नगर नियोजन अधिकारी यांची नियुक्त प्रलंबित असल्यामुळे विकास योजनेच्या कालमर्यादेचा विचार करता मुदत वाढीचा प्रस्ताव नगर रचना मुख्य कार्यालय येथे सादर करणेच्या अनुषंगाने योग्यती कार्यवाही आयुक्त यांचे मार्फत करणे करीता मुदतवाढीच्या प्रस्तावास वसई विरार शहर महानगरपालिका महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 मधील कलम 26 च्या तिस-या परंतुकानुसार करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साबे

अनुमोदकाचे नाव - प्रविण शेट्टी

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुतांने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ८ **सभा सुचना क्र. ६** **दिनांक : २३/०४/२०२६**

विषय :- मा. सर्वोच्च न्यायालय येथील Suo Moto Writ Pet. (Civil) No.५/२०२५ बाबत दि. ११/०८/२०२५ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने मनपा क्षेत्रात भटक्या श्वानांना खायला देण्याकरिता जागा निश्चित करुन प्रसार माध्यमांमध्ये जनजागृतीकरिता देणेसाठी मा. महासभेची मान्यता मिळणेबाबत.

मा. सर्वोच्च न्यायालय येथील Suo Moto Writ Pet. (Civil) No.५/२०२५ वावत दि. ११/०८/२०२५ रोजीच्या सुनावणीत शैक्षणिक संस्था, रुग्णालये, क्रीडा संकुल, बस स्टैंड/डेपो (आंतरराज्य बस टर्मिनल्ससह) आणि रेल्वे स्थानक यासारख्या संस्थात्मक क्षेत्रांमध्ये कुत्र्यांच्या चाव्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे हे लक्षात घेता, सार्वजनिक सुरक्षा, आरोग्य आणि भटक्या कुत्र्यांच्या व्यवस्थापनाच्या हितासाठी दि. २२/०८/२०२५ रोजी पुढील निर्देश जारी करणे हे न्यायालय योग्य मानते.

१. Municipal authorities shall forthwith commence an exercise for creating dedicated feeding spaces for the stray dogs in each municipal ward. The feeding areas shall be created/identified keeping in view the population and concentration of stray dogs in the particular municipal ward. Gantries/notice boards shall be placed near such designated feeding areas, mentioning that stray dogs shall only be fed in such areas. Under no condition shall the feeding of stray dogs on the streets be permitted. The persons found feeding the dogs on the streets in contravention of the above directions shall be liable to be proceeded against under the relevant legal framework.

भटक्या श्वानांना अनियमीत आहार दिल्याने होणाऱ्या अनुचित घटनांबद्दलच्या पार्श्वभूमीवर आणि रस्त्यावर तसेच सार्वजिनक ठिकाणी श्वानांना अन्न देण्याची प्रथा बंद करण्याच्या अनुषंगाने उपरोक्त निर्देश जारी करण्यात आलेले आहेत. कारण हि प्रथा रस्त्यावर चालणा-या सामान्य माणसाला मोठ्या अडचणी निर्माण करते. त्याअनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांना महानगरपालिका क्षेत्रामध्ये खायला देणेसाठी जागा निश्चित करुन Feeding Spot तयार करुन Feeding Spot जवळ फलक लावणेबाबत निर्देश पारीत केलेले आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. २२/०८/२०२५ रोजीच्या निर्देशाची अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात ए ते आय प्रभाग समिती निहाय भटक्या श्वानांना खाद्य पदार्थ खायला देणेसाठी जागा निश्चित करणेसाठी सर्वे करण्यात आला. सदर सर्वे अंती ९ प्रभागनिहाय ठिकाणी श्वानांसाठी खाद्य पदार्थ खायला देण्यासाठी Feeding Spot तयार करणेसाठी जागा निश्चित केलेल्या आहेत. तथापि, सदर ठिकाणी लोखंडी सुचना फलक लावणे आवश्यक आहे. जेणे करुन श्वान प्रेमी व इतर यांना त्या निश्चित केलेल्या ठिकाणी भटक्या श्वानांना खाण्यासाठी खाद्य देणेबाबत, तसेच वरील निर्देशाचे उल्लंघन करुन रस्त्यावर श्वानांना इतरस्त्र अन्न देताना आढळणाऱ्या संबंधित व्यक्तीवर कायदेशीर चौकशीनुसार कारवाई करणेबाबत देखिल जागृक्ता निर्माण होईल.

२. The direction given in para १३ of the order dated ११th August २०२५, is reiterated with a slight modification that no individual or organization shall cause any hindrance or obstruction in the effective implementation of the directions given above. In case any public servant acting in compliance with the aforesaid directions is obstructed, then the violator/s shall be liable to face prosecution for obstructing the public servant acting in discharge of official duty.

उपरोक्तनुसार कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेने वरील निर्देशांच्या प्रभावी अंमलबजावणीत कोणताही अडथळा निर्माण करू नये. जर वरील निर्देशांचे पालन करणाऱ्या कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याने अडथळा आणला तर, उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला अधिकृत कर्तव्य बजावताना अडथळा आणल्याबद्दल खटला भरण्यास पात्र ठरेल. त्याअनुषंगाने मनपाक्षेत्रात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधितांवर कायदेशीर कारवाई करणे सोयीचे झाले आहे.

३. मनपा क्षेत्रात श्वानांबद्दल आपुलकी व प्रेम दर्शविणारे श्वानंप्रेमी व इतर सामाजिक संघटना कार्यरत आहेत. अश्या संघटनांना श्वानांना खायला देण्यासाठी मनपामार्फत तयार केलेले Feeding Spot मध्ये खायला न देता, त्यांचे राहत्या सोसायटीमध्ये श्वानांना खायला देण्यासाठी इच्छा दर्शविलेली आहे. अश्या सोसायटीं ज्या श्वानांना खायला देण्यासाठी सोसायटीच्या आतमध्ये Feeding Spot तयार करत असतील, अश्या इच्छुक सोसाटीनी सदर विभागाच सहा. आयुक्त यांची परवानगी घेतल्यास त्यांना पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल.

४. दि. ०१/०३/२०२६ रोजीपासून वसई विरार शहर महानगरपलिका क्षेत्रात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्देशाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने भटक्या श्वानांना खायला देण्यासाठी Feeding Spot उपलब्ध करुन दिलेल्या ठिकाणांची माहिती व सदर निर्देशांची अंमलबजावणी न करणाऱ्यांच्या विरुद्ध दंडात्मक पर्यायी फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत मनपा क्षेत्रामधील नागरिकांमध्ये जागृक्ता आणणेसाठी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या संकेतीक स्थळावर व प्रसार माध्यमांमार्फत जनजागृती करणे आवश्यक आहे.

५. तरी, मा. सर्वोच्च न्यायालय येथील Suo Moto Writ Pet. (Civil) No.५/२०२५ बाबत दि. ११/०८/२०२५ रोजीच्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी

६. वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात भटक्या श्वानांना अनियमीत आहार दिल्याने होणाऱ्या अनुचित घटनांबद्दलच्या पार्श्वभुमीवर आणि रस्त्यावर तसेच सार्वजिनक ठिकाणी श्वानांना अन्न देण्याची प्रथा बंद करण्यासाठी भटक्या श्वानांना खाद्यपदार्थ खायला देण्यासाठी लोखंडी सुचना फलक लावून जागा निश्चित करणेबाबत.

७. तसेच सदर ठिकाणी खायला न देता इतरस्त्र खाद्य टाकून अस्वच्छता निर्माण करणाऱ्या संबंधितांवर रु. ५०००/- इतकी दंडात्मक रक्कम आकारुन कारवाई करणेबाबत.

८. सदर कामामध्ये अडथळा निर्माण्या करणाऱ्या संबंधितांवर मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत.

तसेच दि. ०१/०३/२०२६ रोजीपासून वसई विरार शहर महानगरपलिका क्षेत्रात प्रभाग समिती ए ते आय निहाय भटक्या श्वानांना खाद्यपदार्थ खायला देण्यासाठी जागा सुरु करणेबाबतची सर्व माहिती मनपाच्या सांकेतीक स्थळावर व प्रसार माध्यमांमार्फत जनजागृती करणेसाठी देणेबाबत सदरचा प्रस्तावास मा. महासभा शिफारस देत आहे.

ठराव / निर्णय :- मा. सर्वोच्च न्यायालय येथील Suo Moto Writ Pet. (Civil) No.५/२०२५ बाबत दि. ११/०८/२०२५ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने मनपा क्षेत्रात भटक्या श्वानांना खायाला देण्याकरिता जागा निश्चित करुन प्रसार माध्यमामध्ये जनजागृतीकरिता देणेसाठी मा. महासभा मान्यता देण्यात येत आहे.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ९ **सभा सुचना क्र. ६** **दिनांक : २३/०४/२०२६**

विषय :- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 33 व अन्वये विरार येथील हायस्पीड रेल्वे स्थानक क्षेत्रात स्थानिक क्षेत्र योजना (Local Area Plan) तयार करणेकामी इरादा प्रसिध्द करण्याबाबत.

वसई-विरार उपप्रदेशाची विकास नियंत्रण नियमावली-२००१. राज्य शासनाने नगरविकास विभाग अधिसूचना टीपीएस/१२०/१८१३/सीआर-४८/२००२/नवी-१२, दि. १६/०२/२००४ अन्वये एम-१ ते एम-१४ या बदलासहित तसेच ईपी-१ ते ईपी-७ यामधील नियम वगळून मंजूर केलेली असून ती दि. ०१/०३/२००४ पासून अंमलात आलेली आहे. राज्य शासनाने त्यानंतर नगरविकास विभाग अधिसूचना क्र. टीपीएस/१२०/१८१३/सीआर-४८/२००२/नबी-१२, दि. ३०/११/२००५ अन्वये ईपी-१ ते ईपी-७यामधील वगळलेले नियम मंजूर केले असून ते दि. १८/०१/२००६ पासून अंमलात आलेले आहेत.

वसई विरार उपप्रदेशाची शहर विकास योजना (आराखडा) शासन निर्णय क्र. टि.पी.एस. १२०१/१५४८/ सी.आर-२३४ (सी) दि. ०९/०२/२००७ अन्वये भागशः मंजुर केली असून ती दि. १५/०३/२००७, पासून अंमलात आलेली आहे. (११३ ई.पी वगळून त्यापैकी ३५ ई.पी शासनाने नंतर मंजुर केलेल्या आहेत.) तसेच वसई-विरार उपप्रदेशातील एकुण क्षेत्रापैकी ४ तत्कालीन नगरपालिका (वसई, नवधर-माणिकपूर, नालासोपारा व विरार) व ५३ गावांसह शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. २३०६ /४१२/प्र.क्र/२२३/२००६/युडी-२४, दि. ०३/०७/२००९ अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिका अस्तित्वात आलेली असून नगरविकास विभाग निर्णय क्र.टि.पी.एस. १२०९/२४२९/सी. आर-२६२/यूडी-१२ दि.०७/०७/२०१० नुसार या महानगरपालिकेला महानगरपालिका क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार प्रदान केलेले आहेत. तेव्हा पासून वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यरत असून त्याप्रमाणे कामकाज करीत आहे.

ज्याअर्थी वसई विरार उपप्रदेशाच्या मंजुर विकास आराखड्यामध्ये मुंबई अहमदाबाद हायस्पीड रेल्वेची अलाईनमेंट विरार रेल्वे स्थानकाचा परिसर आणि डीपी रोड (Alignment of Mumbai Ahmedabad High speed Rail Station Area at Virar & DP Road) चे समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ Act १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये केलेल्या कार्यवाही शासनाने. नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस- १२२१/६०४/प्र.क्र १२४/२२/नवि- १२ दि- ०७/०४/२०२५ च्या अधिसूचनेनुसार भागाशः मान्यता दिली आहे (शासनाच्या दि.०७/०४/२०२५ व टिपीएस १२२९/६०४/प्रक्र-१२४/२२/नवि-१२ रोजीचे पत्रा प्रमाणे)

तसेच विरार हायस्पीड रेल्वे स्थानक हे चार स्थानकापैकी एक आहे जे (SAD) स्टेशन क्षेत्र विकासासाठी Japan International Corporation Agency (JICA) सोबतच्या Project (SMART) अंतर्गत निवडले गेले आहे. मुंबई अहमदाबाद हाय स्पीड रेल्वे प्रकल्पाच्या रेल्वे स्थानक क्षेत्र नियोजनाकरीता भारत सरकाराच्या आवासन आणि शहरी कार्य मंत्रालय (Ministry of Housing and Urban Affairs MOHUA) यांनी दि-२०/०९/२३ च्या Office Memorandum अन्वये Project Team (PT) तसेच joint Cordinating Committee (JCC) व दि.१०/१०/२३ रोजीच्या office Memorandum अन्वये Joint Planing Team (JPT) अशा समीर्तीची स्थापना केली आहे. व त्याअनुसार स्थानक क्षेत्र विकास आराखडा तैयार करण्याचे अधिकार उपसंचालक, नगररचना विभाग यांना देण्यात आले आहे.

तसेच कक्ष अधिकारी, नवि-१२, दि. २९.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये वसई विरार शहर महानगरपालिकेस स्थानिक नियोजनाबाबत तपशिलवार अहवाल सादर करण्यास निर्देश दिले आहे. त्या अनुषंगाने इकडील कार्यालयाने जा.क्र. वविशम/नर/शा/५९३/२०२४-२५ दि.२४/०९/२०२४ च्या पत्रान्वये शासनाच्या नगरविकास विभागाकडे सदर विषयाबाबत योग्य निर्देश मिळणेकरीता विनंती केली होती.

तसेच JICA, MOHUA महाराष्ट्र शासनाकडून मिळणा-या सुचनेचे पालन करण्यात आले असुन, इकडील कार्यालयाच्या वविशम/नर/शा/१२३२/२०२४-२५ दि. ०६/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये वसई विरार हाय स्पीड रेल्वे च्या स्थानिक क्षेत्रीय योजनेचा समावेश करण्यासाठी आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये स्थानिक क्षेत्र नियोजनाकरीता नियम तैयार करणेस विनंती केली होती. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये सुधारणा करून स्थानिक क्षेत्र नियोजनाकरीता नविन कलमांचा समाविष्ट करण्यात आला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये खालील प्रमाणे Local Area Plan करीता सुधारणा करण्यांत आलेली आहे :

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम "३३ B" नुसार

Plans for areas of Comprehensive development. (१) Any time after the publication of notice regarding preparation] of draft Development plan under section २६, a Planning Authority may prepare plan or plans showing proposals for the development of an area or areas which in the opinion of the Planning Authority should be developed or re-developed as a whole (hereinafter referred to as the area or areas of Comprehensive development); and in particular, such plans shall provide for

(a) detailed development of specific areas for urban renewal, housing, shopping centres, industrial areas, civic centres, educational and cultural institutions;

(b) control of architectural features, elevation and frontage of buildings and structures;

(c) dealing satisfactorily with areas of bad layout, obsolete development and slum areas and re-location of population;

(d) open spaces, gardens, playgrounds and recreation areas.

(2) When the plans for an area or areas of Comprehensive development are prepared, whether or not separately, the Planning Authority shall follow the same procedure before submission of to the State Government for sanction as is provided by sections २५, २६, २७, २८, ७** ३० and ३१ as respect a draft Development plan and submit such plan or plans from time to time to the State Government for sanction, along with a report-

(a) explaining the proposals and the stages of the development programme by which it is proposed to execute the plan or plans,

(b) giving an appropriate estimate of the cost involved in executing the proposals of the plan or plans.

(३) The State Government may, after consulting the Director of Town Planning by notification in the Official Gazette, sanction the plan or plans for the area or areas of Comprehensive development either without, or subject to such, modifications as it may consider necessary not later than three months of the date of receipt of such plans from the Planning Authority or not later than such further period as may be extended by the State Government.

वर नमूद केल्या नुसार महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना (सुधारणा) अधिनियम 1966 मधील कलम ३३ B व ३३ C अन्वये विरार येथील हायस्पीड रेल्वे स्थानक येथे Local Area Plan तयार करणेकामी इरादा राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरीता मा. सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना (सुधारणा) अधिनियम १९६६ चे कलम 33 B व 33 अन्वये विषयांकीत विरार HSR Local Area Plan नियोजनाचे प्रारूप सिमांकन तसेच अंदाजे ४६४ हेक्टर क्षेत्रामध्ये Local Area Plan तयार करून शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार शासन राजपत्रात सुचना प्रसीद्ध करणेकामी व तयार होणा-या Local Area Plan चा प्रस्ताव शासनाकडे पाठविणे करीता आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी मा. सर्वसाधारण सभे पुढे सादर करण्यात येत आहे.

ठराव / निर्णयः- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 33 व अन्वये विरार येथील हायस्पीड रेल्वे स्थानक क्षेत्रात स्थानिक क्षेत्र योजना (Local Area Plan) तयार करणेकामी इरादा प्रसिध्द करण्याबाबत प्रस्तावाचे वाचन करण्यांत आले परंतु सदरचा प्रस्तावास मा. महासभेने एकमताने स्थगिती दिली. तसेच काही नियम मा. स्थायी समितीने घ्यावयाचे असल्याने त्याप्रमाणे विभागाने कार्यवाही करुन नंतर प्रस्ताव सभेपुढे आणावे असे एकमत्ताने ठरविण्यांत आले.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमाने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १० **सभा सुचना क्र. ६** **दिनांक : २३/०४/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई (पू) अंतर्गत विविध विकास कामे करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे बी-1 निविदा दर मागविणे कामी मान्यता मिळणे बाबत.

वसई विरार शहर महानगरपालिका वसई पश्चिम विविध डांबरीकरण केलेले रस्ते आहेत. वसई विरार भुप्रदेश हा अति पर्जन्यशील क्षेत्रामध्ये येत असून दरवर्षी पावसाळ्या दरम्यान सुमारे 3000 मी.मी. ते 3500 मी.मी. इतकी विक्रमी पावसाची नेंद होते. त्यामुळे वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात अतिवृष्टी निर्माण होते.

तसेच पावसाळ्यामध्ये अतिवृष्टीच्या वेळी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचते व रस्त्यालगत गटार नसल्याने रस्त्यावरील पाण्याचा निचरा योग्य त्या वेळेत होत नाही. पाण्याचा निचरा न झाल्याने नागरीकांना वाहतुकीच्या वेळेत विविध अडचणींना सामोरे जावे लागते.

सार्वजनिक सुरक्षतेच्या दृष्टीने संबंधीत स्थळी कल्वर्ट, नाल्यासाठी संरक्षक भिंत, पाईप उघाडी, आर.सी.सी रिटेंनीग वॉल चे बांधकाम करणे अत्यावश्यक आहे.

त्यामुळे खालील नमुद कामासाठी बी-1 निविदा दर मागविणे आवश्यक आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	वसई (पू) मध्ये देवदळ गाव ते मच्छी कंपनी पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	रु.77,92,813/-
		रु.77,92,813/-

वरील नमुद कामाचा खर्च "इतर विकास कामे 20%" या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यात येणार आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई पश्चिम अंतर्गत विविध विकास कामे करणे कामी एकूण रक्कम रु.77,92,813/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. वरील नमुद कामांकरीता होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तरी वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई पश्चिम अंतर्गत विविध विकास कामे करणे कामी हेणाऱ्या रक्कम रु.77,92,813/- इतक्या खर्चास खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधि. 1949 चे कलम ७३ (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचे अधिकार मा. सर्वसाधारण सभेला आहेत. सदरील प्रस्ताव निधी उपलब्धतेच्या अधीन राहून मंजूरीस्तव सविनय सादर.

तरी सदरचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस शिफारस असे.

ठराव/निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई पूर्व अंतर्गत अंतर्गत विविध विकास कामे करणे कामी खालील नमूद कामांना प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदर कामी ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-१ पद्धतीने ई-निविदा दर मागविणेस मा.सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१	वसई पूर्व मध्ये देवदळ गाव ते मच्छी कंपनी पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	रु.७७,९२,८१३/-
		रु.७७,९२,८१३/-

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - प्रविण शेट्टी

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुतांने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ११ **सभा सुचना क्र. ६** **दिनांक : २३/०४/२०२६**

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई (पू) गोखिवरे फादरवाडी येथिल बहुउद्देशीय इमारतीतील दुसऱ्या मजल्यावर विभागीय कार्यालयासाठी फर्निचर व्यवस्था करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे बी-1 निविदा दर मागविणे कामी मान्यता मिळणे बाबत.

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विविध विभागीय कार्यालय अस्तित्वात आहेत. वसई पूर्व वालीव कार्यालयाच्या कामकाजासाठी आवश्यक कार्यालयीन इमारत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. सध्या कार्यालयीन कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आवश्यक जागेचा अभाव नसल्यामुळे त्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे.

प्रस्तावित कार्यालयीन इमारत उभारल्यास संबंधित विभागाचे प्रशासकीय कामकाज अधिक प्रभावी व सुलभरीत्या पार पाडता येईल.

वरील बाबींचा विचार करता, नागरिक सेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत सदरील विभागीय कार्यालय सुरू आहेत. सदरील विभागीय कार्यालय दुरुस्त करणे आवश्यक आहे.

त्यामुळे खालील नमुद कामासाठी बी-१ निविदा दर मागविणे आवश्यक आहे.

अ.क्र.	कामाचे न्नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	वसई (पू) मध्ये मौजे गोखिवरे फादरवाडी येथिल बहुउद्देशीय इमारतीतील दुसऱ्या मजल्यावर विभागीय कार्यालयासाठी फर्निचर व्यवस्था करणे.	रु.१,३०,३७,२९१/-
		रु.१,३०,३७,२९१/-

वरील नमुद कामाचा खर्च "कार्यालय व समिती सभागृह नुतनीकरण "या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यात येणार आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई (पू) विभागीय कार्यालयासाठी फर्निचर व्यवस्था करणे कामी एकूण रक्कम रु.१,३०,३७,२९१/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. वरील नमुद कामांकरीता होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तरी वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई (पू) गोखिवरे विभागीय कार्यालयासाठी फर्निचर व्यवस्था करणे कामी होणाऱ्या रक्कम रु.१,३०,३७,२९१/- इतक्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधि. १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचे अधिकार मा. सर्वसाधारण सभेला आहेत.

सदरील प्रस्ताव निधी उपलब्धतेच्या अधीन राहून मंजूरीस्तव सविनय सादर.

तरी सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस शिफारस असे.

ठराव / निर्णय :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वरील कामी तयार करणेत आलेल्या रु. १,३०,३७,२९१/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकात ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस, तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२ **सभा सुचना क्र. ६** **दिनांक : २३/०४/२०२६**

विषय : - वसई-विरार शहर महानगरपालिकेस सन २०२६-२०२७, २०२७-२०२८ व २०२८-२०२९ या वित्तीय वर्षासाठी इलेक्ट्रीक शक्तीवरील व इतर इंधनवार चालणारी वाहने भाडे तत्वावर घेणे तसेच त्याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

ईलेक्ट्रीक व्हेईकल तंत्रज्ञान हे यापुढील कालावधीतील जागतिक स्तरावर दळणवळणाच्या क्षेत्रातील आमुलाग्र बदल घडवून आणणारी बाब आहे. इलेक्ट्रीकल व्हेईकलमुळे जागतिक स्तरावर व देशांतर्गत पेट्रोलियम पदार्थावरील अवलंबित्व कमी होईल पर्यायाने कार्बनडाय ऑक्साईडचे उत्सर्जन कमी झाल्याने होणारे प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. याशिवाय पर्यावरण पूरक स्वस्त इंधन खर्च, वाहनांची देखभाल कमी होणे इत्यादि बाबत देखील मदत होणार आहे. त्यामुळे जागतिक उद्योग, शासन इत्यादियांनी इलेक्ट्रीक व्हेईकल हे सुरक्षित, किफायतशीर, पर्यावरण पूरक असल्याचे यशस्वी रित्या दाखवून दिले आहे. युनायटेड नेशनचा २०३० पर्यंत इलेक्ट्रीक व्हेईकलला उत्तेजन देण्याचा उद्देश आहे. सदर उद्देशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागा मार्फत शासन निर्णय क्र. मइवाधो-२०२१/प्र.क्र.२५/तां.क ४,दि. २९/१२/२०२१ अन्वये **महाराष्ट्र ईलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२१** निर्गमित करणेत आलेले आहे. सदर शासननिर्णयात **दि. ०१ एप्रिल २०२२ पासून शासकिय वापरासाठी भाडे तत्वावर घेण्यात येणारी सर्व वाहने ही बॅटरी इलेक्ट्रीक असतील.**असा निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

सदर शासन निर्णया मध्ये **दि.०१ एप्रिल, २०२२** पासून महानगरपालिकेकडून भाडेतत्वावर घेण्यात येणारी वाहने ही इलेक्ट्रिक बॅटरीवर चालणारी असावी नमुद आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करणे करिता सन २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता महानगरपालिकेस भाडे तत्वावर वाहने पुरवठा करणे कामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. या ई-निविदेत मे. एम ४ कॉर्पोरेशन यांचे कमी दर प्राप्त झाल्याने सदरची ई-निविदा मा. प्रशासकीय ठराव क्र. ७२१, दि. २२/०६/२०२३ अन्वये मंजूर करण्यात आलेली आहे. सदरची ई-निविदा मंजूर करताना र.रु. ६ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घेण्यात आलेली होती.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मालकिची वाहने विविध विभागाअंतर्गत कार्यरत आहेत. परंतु या वाहनांव्यतिरिक्त विविध विभागांच्या कार्यालयीन कामकाजाकरिता खालील प्रमाणे वाहनांची आवश्यकता असते.

"तक्ता—अ"

अ.क्र.	विभाग	प्रकार	कामे
१	सामान्य प्रशासन	चार चाकी वाहन / रिक्षा	कार्यालयीन कामकाज करणे, मंत्रालय व मा.जिल्हाधिकारी कार्यालय, कोकण भवन येथे ये-जा करणे.
२	अतिक्रमण विभाग	टोईंग व्हॅन	नो-पार्किंग मधील वाहने उचलणे,
३	दिवाबत्ती विभाग	टाटा एसई टेम्पो	रोड लाईट देखभाल दुरुस्ती करणे कामाकरिता
४	रुग्णालय विभाग	चार चाकी वाहन	रुग्णालयीन तसेच कार्यालयीन कामकाज करणे, शासनाकडून आयोजित करणेत आलेल्या पल्स पोलिओ करिता,
५	राष्ट्रीय नागरी उपजिविका	रिक्षा	कार्यालयीन कामकाज करणे व इतर अनुषंगिक कामे
६	महिला बालकल्याण	आयसर टेम्पो, टाटा एसई टेम्पो	कार्यालयीन कामकाज करणे व इतर अनुषंगिक कामे तसेच शालेय विद्यार्थ्याना साहीत्य वाटप करणे कामी
७	लेखापरिक्षण पथक	अर्टीगा	प्रभागातील लेखा परिक्षण करणे व इतरअनुषंगिक कामे
८	घरपटी व पाणीपट्टी	रिक्षा	महापालिकेच्या फंडात अधिक भर होणे करिता वाहनाव्दारे घोषणा करणे, जप्ती करणे कामाकरिता
९	उद्यान विभाग	आयशर टेम्पो	कार्यालयीन कामकाज करणे व इतर अनुषंगिक कामे
१०	स्वच्छता	रिक्षा, टेम्पो, चारचाकीवाहन	स्वच्छ भारत अभियांना अंतर्गत सर्वे करणे, स्वच्छते बाबत जनजागृती करणेकामी बॅनर प्रभागामध्ये लावणे व दिल्ली येथून शहराची पहाणी करणे करिता अधिकारी वर्गास वाहने उपलब्ध करुन देणे.

११	महापौर मॅरेथॉन	आयसर टेम्पो, टेम्पो, चारचाकी वाहन टोईंग व्हॅन	महापौर मॅरेथॉन स्पर्धेच्या दिवशी व स्पर्धेच्या पुर्वी आवश्यकतेनुसार वाहनांचा पुरवठा करण्यात येतो.
१२	सर्व	चार चाकी मोठी व लहान वाहन	महापालिकेतील सर्व विभागा मध्ये शहरातील नागरिकाकडून माहिती अधिकार अपिल सुनावणी करणे करीता कोकणभवन, जिल्हाधिकारी कार्यालय कार्यालयीन कामकाज, ऍन्टीकरप्शन विभाग, पीएफ ऑफीस, वविशमचे अधिकारी/कर्मचारी यांना ये-जाकरण्यासाठी इ. तसेच विभागास कार्यालयीन कामकाजासाठी
१३	नगररचना	टाटा आयशर टेम्पो	विभागातील फाईल्स व इतर दप्तरने –आण करणेसाठी
१४	वैद्यकीय आरोग्य	नेक्सॉन, आयसर टेम्पो, टाटा एसई टेम्पो	वैद्यकीय आरोग्य विभागास शासनाकडून पुणे व पालघर येथून मोफत औषधे उपलब्ध होतात. त्याकामी आवश्यकतेनुसार वाहने पुरवठा करण्यात येतो.
१५	श्री गणेशोत्सव	टाटा आयशर व टाटा एसई टेम्पो	श्री गणेशमूर्ती विसर्जन करणे कामी महापालिकाक्षेत्रात कृत्रिम तलाव तयार करण्यात येतात. या कृत्रिम तलावातील मूर्ती बंद खाणी व जेटी येथे नेणे कामी टेम्पांची आवश्यकता असते.
१६	MSF	अर्टीगा	महाराष्ट्र सुरक्षा पथकास कारवाईच्या ठिकाणी बंदोबस्त करणेकामी
९. बायो-मायनिंग व प्रक्रिया कामासाठी 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार' म्हणून मे.ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांची नियुक्ती करण्यास व येणाऱ्या खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

१०. वसई-विरार शहर महानगरपालिकेस कचरामुक्त शहर (GFC) '३' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) करणेकरिता मा.सर्वसाधारण सभेपुढे प्राथमिक प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

११. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात ओसी/सीसी नसलेल्या इमारतीमध्ये उभारण्यात आलेल्या रुग्णालयांबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

१२. वसई- विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) मध्ये नाना नानी पार्क ते आकांशा कॉम्प्लेक्स फेस-२ पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा आर.सी.सी. गटार बांधणे तसेच रस्त्याची उंची वाढवून खडीकरण व डांबरीकरण करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

१३. वसई- विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा स्टेशन रस्त्यालगत गोकुळ अपा. ते के.एम.अपा. पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

१४. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३३ व अन्वये विरार येथील हायस्पीड रेल्वे स्थानक क्षेत्रात स्थानिक क्षेत्र योजना (Local Area Plan) तयार करणेकामी इरादा प्रसिध्द करण्याबाबत. (दि.२३/०४/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेतील स्थगित विषय)

आपला विशासू,

(विश्वनाथ तळेकर)
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

(मा.महापौर महोदय यांच्या मान्यतेने)

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा.सर्वसाधारण सभा

सभा सुचना क्र. ०७

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०१ **दि.३० / ०४ /२०२६.**

विषय :- प्रभाग समिती 'आय' वसई येथील आस्थापनेवरील कार्यरत सफाई कर्मचारी श्री.राजेश विष्णू भाटे यांची स्वेच्छानिवृत्त मंजूर करणेबाबत...

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'आय', वसई येथील आस्थापनेवरील श्री.राजेश विष्णू भाटे, सफाई कामगार यांनी दि.२३/०१/२०२६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे.

श्री. राजेश विष्णू भाटे यांची सेवा भुतपूर्व वसई नगर परिषद यांचे कडील स्थायी समिती ठराव क्र.११४ दि.२७/०२/२००४ अन्वये दि.०१/०६/२००४ पासुन "सफाई कामगार" या पदावर नेमणूक करण्यात आली आहे.

श्री.राजेश विष्णू भाटे, सफाई कामगार यांची नेमणूकीपासून ते वसई विरार शहर महानगरपालिकेत २० वर्षे ४ महिने सेवा झालेली आहे.त्यांचे सद्याचे वय ५६ वर्षे असुन त्यांच्या कौटुंबिक अडचणीमुळे त्यांना स्वेच्छा निवृत्ती हवी आहे, असे दि. २३/०१/२०२६ रोजीच्या अर्जात त्यांनी नमूद केलेले आहे.

श्री. राजेश विष्णू भाटे यांचेविरुध्द सद्यस्थितीत कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी सुरु नाही अथवा प्रलंबित नाही तथा प्रस्तावित नाही. त्यामुळे त्यांची स्वेच्छा निवृत्तीची विनंती मान्य करण्यास हरकत नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ तरतूदीनूसार

१. शासकीय कर्मचाऱ्याला त्याची २० वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर नियुक्ती प्राधिकाऱ्यास तीन महिन्यांची लेखी नोटीस देऊन सेवेमधून केव्हाही सेवानिवृत्त होता येईल.

२. स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याबद्दल पोटनियम (१) खाली दिलेली नोटीस, नियुक्ती प्राधिकाऱ्याने स्वीकारणे आवश्यक असेल. परंतू, उपरोक्त नोटीशीमध्ये नमूद केलेला कालावधी संपण्यापूर्वी नियुक्ती प्राधिकाऱ्याने सेवानिवृत्तीसाठी परवानगी देण्यास नकार दिला नाही तर, त्या कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून सेवानिवृत्ती अंमलात येईल असे नमूद आहे.

तथापि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ मधील तरतूदी नूसार श्री. राजेश विष्णू भाटे यांना दि.२४/०४/२०२६ पासून महानगरपालिका सेवेमधून स्वेच्छा सेवानिवृत्ती दिलेली असून, त्यांना सेवानिवृत्तीनंतर सर्व लाभ म्हणजेच सेवा निवृत्ती वेतन, सेवाउपदान, रजारोखीकरण व इतर अनुषंगिक लाभ देणे आवश्यक आहे.

निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील श्री. राजेश विष्णू भाटे, सफाई कामगार यांनी दि. २३/०१/२०२६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबतच्या विनंती अर्जानुसार त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ कलम ६६ पोटनियम (१) मधील तरतुदी नुसार दि.२४/०४/२०२६ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेतून दिलेल्या स्वेच्छा सेवानिवृत्तीस व सेवानिवृत्तीनंतर सेवा निवृत्ती वेतन, सेवाउपदान, रजारोखीकरण व इतर अनुषंगिक लाभ देणेस ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकांचे नाव - प्रफुल्ल साने
व स्वाक्षरी

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील
व स्वाक्षरी - Patil

अनुकुल संख्या ..—.....प्रतिकुल संख्या.....—.....तटस्थ संख्या.....—.....

ठराव / सर्वानुमते / ~~बहुमताने~~ / मंजूर / ~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०२ **दि.३०/०४/२०२६.**

.....

विषय :- श्रीम.वर्षा दिपक सोलंकी यांना लाड समिती शिफारसीनूसार महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावून घेणेबाबत...

प्रस्तावाचा मजकूर : श्री. बाबु मोती सोलंकी यांची वसई नगरपरिषदेत दि.०१/०८/१९७८ पासून मेहतर कामगार या पदावर नियुक्ती करण्यात आली होती.

श्री. बाबु मोती सोलंकी, सफाई कामगार हे नियत वयोमानानुसार महानगरपालिका सेवेतुन **दि.३०/११/२०१९ रोजी सेवानिवृत्त** झाले आहेत. श्री. बाबु मोती सोलंकी यांना सेवेत नियमीत केल्याच्या दिनांकापासुन त्यांची भुतपूर्व वसई नगरपरिषद व महानगरपालिकेत एकूण ३१ वर्षे ०६ महिने इतकी सेवा झालेली आहे.

श्री.बाबु मोती सोलंकी यांनी त्यांची सुन श्रीम.वर्षा दिपक सोलंकी यांना वारसा हक्काने नोकरीवर सामावून घेणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला होता.

श्रीम.वर्षा दिपक सोलंकी यांनी माझे सासरे श्री.बाबु मोती सोलंकी हे नियत वयोमानानुसार दि.३०/११/२०१९ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या जागी वारसा हक्काने महानगरपालिकेत सामावून घेणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

प्रभाग समिती "आय" वसई यांनी वर्षा दिपक सोलंकी यांना लाड समिती शिफारशीनुसार महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावून घेणेबाबत प्रस्ताव आस्थापना विभाग, मुख्यालय येथे सादर केलेला होता.

सदर प्रस्तावामधील टि/५ वर तत्कालीन अति-आयुक्त यांनी विवाह दाखल्यासह फेरसादर करावे असे निर्देशित केलेले होते. त्याअनुषंगाने तत्कालीन मा.उप-आयुक्त (आस्था) यांनी श्रीम. वर्षा दिपक सोलंकी यांना विवाह दाखला सादर करणेबाबत कळविले होते. तदनंतर श्रीम.वर्षा दिपक सोलंकी यांनी दि.१३/१२/२०२२ रोजी विवाह दाखला आस्थापना विभाग, मुख्यालय येथे सादर केला.

मा.उच्च न्यायालय,मुंबई औरंगाबाद खंडपीठ यांचे आदेश दि.१० एप्रिल,२०२३ नुसार वारसाहक्का प्रकरणास स्थगिती देण्यात आली होती.

मा.उच्च न्यायालय मुंबई औरंगाबाद खंडपीठ यांचे दिनांक ०८/०१/२०२५ च्या आदेशानुसार वारसा हक्काने नियुक्ती देता येईल असे अभिप्राय दिलेले आहेत.

श्रीम.वर्षा दिपक सोलंकी यांनी मी श्रीम.वर्षा दिपक सोलंकी आपणास विनंती अर्ज करते की माझे सासरे श्री.बाबु मोती सोलंकी हे नियत वयोमानानुसार दि.३०/११/२०१९ रोजी सेवानिवृत्त झाले होते. त्यांचे जागी वारसा हक्काने नोकरी मिळणेबाबत मी दि.०५/०४/२०२१ अर्ज सादर केलेला होता. मी मुख्यालय येथे विचारणा केली असता मला मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची स्थगिती असल्याने वारसा हक्काचे प्रकरण होणार नाही असे सांगितले. तथापि आता वारसा हक्काने नोकरी देत असल्याचे मला समजले.

तरी महोदयांना विनंती आहे कि मला माझे सासरे श्री.बाबु मोती सोलंकी यांचे जागी वारसा हक्काने सफाई कामगार या पदावर नोकरी मिळावी हि आपणास विनंती असे कळविले आहे.

श्रीम.वर्षा दिपक सोलंकी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये श्रीम. वर्षा दिपक सोलंकी यांना तीन अपत्य असल्याचे निर्देशनास येते. तथापि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दि. ११ मार्च, २०२४ मध्ये शासन निर्णय दि. २४/०२/२०२३ मधील अनु. क्र. ८ मधील सफाई कामगारांच्या वारसा हक्कासंबंधांत इतर तरतुदी मधील अनु. क्र. ८.१ मधील लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापन देण्याची अतिरिक्त अट वगळण्यात येत आहे असे नमूद आहे. **श्रीम.वर्षा सोलंकी यांनी पत्रान्वये पुनःश्च वारसा हक्काने नोकरी मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलला असल्याने खालीलप्रमाणे फेरसादर करण्यात येत आहे.**

सेवानिवृत्त सफाई कर्मचा-यांच्या वारसा हक्क नियुक्ती प्रस्तावाचे छाननी पत्रक

अ) सेवानिवृत्त सफाई कामगारांची माहीती

अ.क्र.	माहितीचा तपशिल	आवश्यक कागदपत्रे
१	श्री. बाबु मोती सोलंकी	वारस हक्काने
२	जन्म दिनांक. ३०/११/१९५९	सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत
३	नियुक्ती दिनांक ०१/०८/१९७८	सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत
४	मुळ नियुक्ती पध्दत-	**सरळसेवा**
५	सफाई कामगार या पदावरुन पदोन्नती दिली आहे काय असल्यास पदनाम	पदोन्नती दिलेली नाही.
६	महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणुन केलेली एकुण सेवा-	३१ वर्षे ०६ महिने
७	कोणत्या पदावर सेवासमाप्ती	**सफाई कामगार**
८	कोणत्या तारखेला पद रिक्त	**दि.३०/११/२०१९**
९	सेवासमाप्तीचा प्रकार	**नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे**
१०	पद रिक्त झाल्याचे कारण	**नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे**
११	सेवा कालावधीनुसार वारस पात्र आहे काय	**होय, पात्र आहे...**

ब) वारसाची माहीती

	तपशिल		पुरावा दाखल कागदपत्र
१	वारसाचे नाव	श्रीम.वर्षा दिपक सोलंकी	
२	वारसाचे नाते	सून	सोबत कागपत्र जोडलेले आहेत.
३	वारसाचा जन्म दिनांक	दि. २१/०४/१९८८	शाळा सोडल्याचा दाखला
४	वारसाचे अर्ज करते वेळी वय	एकुण ३३ वर्ष	अनुज्ञेय आहे...
५	वारस हक्क नियुक्तीसाठी मनपाकडे प्राप्त वारसाचा अर्ज दिनांक	अर्ज दि. ०४/१०/२०२२	पात्रता योग्य आहे
६	वारसाची शैक्षणीक अर्हता	६ वी पास	साक्षांकीत दाखला
७	वारसाची जात	**अ.जा.(हरिजन)**	शाळा सोडल्याच्या दाखला
८	सफाई कामगारांचा मृत्यु / सेवानिवृत्त/ स्वेच्छा निवृत्ती /रुग्णता सेवा निवृत्ती झाला असल्यास पात्र वारसाचे संम्मती पत्र	कुटूंबातील इतर सदस्यांचे संमतीपत्र	कुटूंबातील एकूण व्यक्ती -
९	वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात राहत असल्या बाबत पुरावा	रेशन कार्ड क्रमांक NO.	त्याच कुटुंबात राहत असल्याबाबत रेशकार्ड जोडले आहे. SE.no.०२७१९२९ रेशन कार्ड

१०	अर्जदाराशी नाते किंवा सांभाळ करणा-या व्यक्तीचे नाव	मुलगा	**सेवेसाठी पात्र**
११	प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे काय	होय	प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे.
१२	जात पडताळणी प्रमाणपत्र आहे काय		शासन निर्णय दि. ११/०३/२०२४ नुसार शासन निर्णय दि. २४/०२/२०२३ मधिल अनु क्र. ८.४ नुसार नियुक्ती देण्यापूर्वी जात जातवैद्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे.
१३	लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र		सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुध्दीपत्रक दि.११ मार्च,२०२४ नुसार लहान कुटूंबाचे प्रमाणत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे.
१४	वारस कोणत्या पदासाठी पात्र होऊ शकेल.	सफाई कामगार	
१५	शिफारस	वारस श्रीम. वर्षा दिपक सोलंकी हक्काने महानगर पालिका सेवेत सफाई कामगार या पदासाठी पात्र आहे.	

संदर्भ क्र.७ शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदी खालीलप्रमाणे:-

१. **सफाई कामगारांची व्याख्या** :- लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. शौचालय स्वच्छता, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या खालील व्यक्ती-

१. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्ग.

२. **सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार**.

३. पूर्वी ज्या सफाई कामगारांनी डोक्यावरुन मैला वाहून नेण्याचे काम केले आहे. अशा सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे.

२. **सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार.**

२. **सफाई कामगारांकरीता वारसाहक्काची तरतूद**:- शासकीय/निमशासकीय/**महानगरपालिका**/ नगरपालिका/नगरपरिषदा/कटकमंडळे (कंटेनमेंट बोर्ड) राज्य शासनाची महामंडळे / राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ Parastatal संस्था/ अनुदानित संस्था शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इत्यादी आस्थापनेवरील उपरोक्त (१) येथे नमूद व्याख्येनूसार सफाई कामगारांना त्यांच्या **सेवानिवृत्तीनंतर**, मृत्यूनंतर, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा त्यांना वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर सफाई कामगाराचे आर्थिक नुकसान होऊ नये व त्याचे कुटूंब बेघर होऊ नयेआणि त्यास सामाजिक संरक्षण प्राप्त होण्याच्या दृष्टीने, लाड समितीच्या शिफारशीनूसार संबंधित सफाई कामगाराच्या जागी त्याच्या वारसाची नियमानूसार वारसा हक्काने नियुक्ती करण्याची कार्यवाही करावी.

३. **वारसा हक्काने पात्र ठरणारे सफाई कामगाराचे वारस :-**

१ पती/पत्नी

२ मुलगा / मुलगी

३ **सून** /जावई

४ विधवा मुलगी / बहिण/घटस्फोटीत मुलगी/बहिण/परित्यक्त्या मुलगी/बहिण/अविवाहित मुलगी अविवाहित बहिण.

५ सफाई कर्मचारी अविवाहीत असल्यास त्यांचा सख्खा भाऊ/सख्खी बहीण

६ नात/नातू

७ वरील पैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सादर वारसापैकी कोणीही सफाईचे काम करण्यास तयार नसल्यास सफाई कामगाराचा तहहयात सांभाळ करण्याची लेखी शपथपत्राव्दारे हमी देणारी संबंधित नामनिर्देशित व्यक्ती असे नमूद आहे.

शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदी खालीलप्रमाणे:-

१. **सफाई कामगारांची व्याख्या** :- लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. **शौचालय स्वच्छता**, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी **संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या व्यक्ती**-

उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्रीम.वर्षा दिपक सोलंकी हे लाड समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगार या पदावर नियुक्ती देणेस पात्र आहेत.

सबब शासन निर्णय क्र. सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक, दि. २४ फेब्रूवारी,२०२३ मधील तरतुदीनुसार श्रीम. वर्षा दिपक सोलंकी यांना लाड समितीच्या शिफारशीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावून घेणे बाबतच्या प्रस्तावावर विचार विनिमय करून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

निर्णय/ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी श्री. बाबु मोती सोलंकी सफाई कामगार हे दि. ३०/११/२०१९ रोजी सेवानिवृत्त झाले असून त्यांची सून **श्रीम. वर्षा दिपक सोलंकी** हया **शासन निर्णय क्र. सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रूवारी,२०२३** मधील तरतुदीनुसार वारस हक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत **"सफाई कामगार"** या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव : प्रफुल्ल साने
व स्वाक्षरी

अनुमोदकाचे नाव : मनोज पाटील
व स्वाक्षरी

अनुकूल संख्या ..—.. प्रतिकुल संख्या ..—.. तटस्थ संख्या ..—..
ठराव/सर्वानुमते/~~बहुताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(श्री.अजीव ~~वशवंत~~ पाटील)
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०३ **सभा सुचना क्र. ०७** **दि.३० / ०४/२०२६.**

प्रस्तावाचा विषय :- श्री. राहूल रमेश कवळे यांना लाड समिती शिफारसीनूसार महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावून घेणेबाबत...

प्रस्तावाचा मजकूर : वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत श्री.रमेश हरि कवळे, सफाई कामगार यांचे सेवापुस्तकाची तपासणी केली असताना त्यांची तत्कालिन नवघर ग्रामपंचायत मध्ये दि.०१/१२/१९८५ नुसार सफाई कामगार या पदावर सामावून घेण्यात आले. वविशम महानगरपालिका मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५(२) (२५) अन्वये सफाई कामगार या पदावर दि.०४/०९/१९८६ पासुन कायम करण्यात आले. श्री.रमेश हरि कवळे, सफाई कामगार हे सेवेत असताना दि.१९/११/२०२५ रोजी मयत झालेले आहेत.

श्री.रमेश हरि कवळे, सफाई कामगार यांना नियमित केलेल्या दिनांकापासून ते मयत दिनांक १९/११/२०२५ पर्यंतचा महानगरपालिकेत एकूण ३९ वर्षे सेवा झाली आहे.

श्री. राहूल रमेश कवळे यांनी माझे वडील कै. रमेश हरि कवळे, सफाई कामगार हे महानगरपालिकेत कार्यरत असताना दि.१९/११/२०२५ रोजी त्यांचे निधन झालेले आहे. तरी त्यांच्या जागी वारस हक्काने मला नोकरी मिळावी हि नम्र विनंती असे कळविले आहे.

उप-आयुक्त (आस्था) यांनी श्री. राहूल रमेश कवळे_यांना मा.तहसिलदार, वसई यांचेकडील वारस दाखला सादर करणेबाबत पत्राव्दारे कळविले आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र.३ नुसार श्री. राहूल रमेश कवळे यांनी दि.२३/०२/२०२६ रोजी वारस दाखला सादर केलेला आहे.

सेवानिवृत्त सफाई कर्मचा-यांच्या वारसा हक्क नियुक्ती प्रस्तावाचे छाननी पत्रक

अ) सेवानिवृत्त सफाई कामगारांची माहीती

अ.क्र.	माहितीचा तपशिल	आवश्यक कागदपत्रे
१	श्री. रमेश हरि कवळे	सरळ सेवेने
२	जन्म दिनांक. १८/११/१९६८	सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत
३	नियुक्ती दिनांक	सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत
४	मुळ नियुक्ती पध्दत-	**सरळसेवा**
५	सफाई कामगार या पदावरुन पदोन्नती दिली आहे काय असल्यास पदनाम	पदोन्नती दिलेली नाही.
६	महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणुन केलेली एकुण सेवा-	३९ वर्षे
७	कोणत्या पदावर सेवासमाप्ती	**सफाई कामगार**
८	कोणत्या तारखेला पद रिक्त	**दि.१९/११/२०२५**

९	सेवासमाप्तीचा प्रकार	**निधन झाल्यामुळे**
१०	पद रिक्त झाल्याचे कारण	**निधन झाल्यामुळे**
११	सेवा कालावधीनुसार वारस पात्र आहे काय	**होय, पात्र आहे...**

ब) वारसाची माहीती

	तपशिल		**पुरावा दाखल कागदपत्र**
१	वारसाचे नाव	श्री. राहूल रमेश कवळे	वारस दाखला
२	वारसाचे नाते	मुलगा	सोबत कागदपत्र जोडलेले आहेत.
३	वारसाचा जन्म दिनांक	दि. १४/०२/१९९०	शाळा सोडल्याचा दाखला
४	वारसाचे अर्ज करते वेळी वय	एकुण ३५ वर्ष	अनुज्ञेय आहे...
५	वारस हक्क नियुक्तीसाठी मनपाकडे प्राप्त वारसाचा अर्ज दिनांक	अर्ज दि. २३/०२/२०२६	पात्रता योग्य आहे
६	वारसाची शैक्षणीक अर्हता	०९ वी नापास	साक्षांकीत दाखला
७	वारसाची जात	**मल्हार कोळी**	जातीचा दाखला
८	सफाई कामगारांचा मृत्यु / सेवानिवृत्त/ स्वेच्छा निवृत्ती /रुग्णता सेवा निवृत्ती झाला असल्यास पात्र वारसाचे संम्मती पत्र	कुटूंबातील इतर सदस्यांचे स्वयंघोषणापत्र आहे	कुटूंबातील एकूण व्यक्ती - २
९	वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात राहत असल्या बाबत पुरावा	रेशन कार्ड क्रमांक NO.	त्याच कुटुंबात राहत असल्याबाबत रेशकार्ड जोडले आहे. SE.no.०६३१५४ रेशन कार्ड
१०	अर्जदाराशी नाते किंवा सांभाळ करणा-या व्यक्तीचे नाव	नामनिर्देशित मुलगा	**सेवेसाठी पात्र**
११	प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे काय	होय	प्रतिज्ञापत्र/स्वयंघोषणापत्र सोबत जोडले आहे.
१२	जात पडताळणी प्रमाणपत्र आहे काय		शासन निर्णय दि. ११/०३/२०२४ नुसार शासन निर्णय दि. २४/०२/२०२३ मधिल अनु क्र. ८.४ नुसार नियुक्ती देण्यापूर्वी जात जातवैद्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे.
१३	लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र		सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुध्दीपत्रक दि.११ मार्च,२०२४ नुसार लहान कुटूंबाचे प्रमाणत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे.

१४	वारस कोणत्या पदासाठी पात्र होऊ शकेल.	सफाई कामगार	
१५	शिफारस	वारस श्री.राहूल रमेश कवळी यांना वारसा हक्काने महानगर पालिका सेवेत सफाई कामगार या पदासाठी पात्र आहे.	

शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदी खालीलप्रमाणे:-

१. **सफाई कामगारांची व्याख्या** :- लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. शौचालय स्वच्छता, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या खालील व्यक्ती-

१. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्ग.

२. **सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार**.

३. पूर्वी ज्या सफाई कामगारांनी डोक्यावरुन मैला वाहून नेण्याचे काम केले आहे. अशा सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे.

२. **सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार.**

२. **सफाई कामगारांकरीता वारसाहक्काची तरतूद**:- शासकीय/निमशासकीय/**महानगरपालिका**/ नगरपालिका/नगरपरिषदा/कटकमंडळे (कंटेनमेंट बोर्ड) राज्य शासनाची महामंडळे / राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ Parastatal संस्था/ अनुदानित संस्था शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इत्यादी आस्थापनेवरील उपरोक्त (१) येथे नमूद व्याख्येनूसार सफाई कामगारांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर, **मृत्यूनंतर**, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा त्यांना वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर सफाई कामगाराचे आर्थिक नुकसान होऊ नये व त्याचे कुटूंब बेघर होऊ नयेआणि त्यास सामाजिक संरक्षण प्राप्त होण्याच्या दृष्टीने, लाड समितीच्या शिफारशीनूसार संबंधित सफाई कामगाराच्या जागी त्याच्या वारसाची नियमानुसार वारसा हक्काने नियुक्ती करण्याची कार्यवाही करावी.

३. वारसा हक्काने पात्र ठरणारे सफाई कामगाराचे वारस :-

३.१ पती/पत्नी

३.२ **मुलगा** / मुलगी

३.३ सून /जावई

३.४ विधवा मुलगी / बहिण/घटस्फोटीत मुलगी/बहिण/परित्यक्त्या मुलगी/बहिण/अविवाहित मुलगी अविवाहित बहिण.

३.५ सफाई कर्मचारी अविवाहीत असल्यास त्यांचा सख्खा भाऊ/सख्खी बहीण

३.६ नात/नातू

३.७ वरील पैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसापैकी कोणीही सफाईचे काम करण्यास तयार नसल्यास सफाई कामगाराचा तहहयात सांभाळ करण्याची लेखी शपथपत्राव्दारे हमी देणारी संबंधित नामनिर्देशित व्यक्ती असे नमूद आहे.

शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदी खालीलप्रमाणे:-

१. **सफाई कामगारांची व्याख्या** :- लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. **शौचालय स्वच्छता**, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी **संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या व्यक्ती**-

उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री. राहूल रमेश कवळे हे लाड समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगार या पदावर नियुक्ती देणेस पात्र आहेत.

सबब शासन निर्णय क्र. सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक, दि. २४ फेब्रूवारी,२०२३ मधील तरतुदीनुसार श्री. राहूल रमेश कवळे यांना लाड समितीच्या शिफारशीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावून घेणे बाबतच्या प्रस्तावावर विचार विनिमय करून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

निर्णय/ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी श्री. रमेश हरि कवळे सफाई कामगार हे दि. १९/११/२०२५ रोजी मयत झाले असून त्यांचा मुलगा **श्री. राहूल रमेश कवळे** हया **शासन निर्णय क्र. सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक, दि. २४ फेब्रूवारी,२०२३** मधील तरतुदीनुसार वारस हक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत **"सफाई कामगार"** या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव : प्रफुल्ल साने
व स्वाक्षरी

अनुमोदकाचे नाव : मनोज पाटील
व स्वाक्षरी

अनुकूल संख्या ..... प्रतिकुल संख्या ..... तटस्थ संख्या .....

ठराव/सर्वानुमते/~~बहुताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(श्री.अजीव यशवंत पाटील)
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४ **सभा सुचना क्र. ७** **दिनांक : ३०/०४/२०२६**

विषय :- प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील गाव-मौजे बोळींं येथील सर्व्हे नं. 165/वी/7 या उद्यानाकरीता आरक्षित असलेल्या भुखंडावर उद्यानाचा विकास व देखभाल करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, शासनामार्फत पर्यावरणीय संतुलन राखणे व शहरी सौदर्य निर्माण करणेच्या अनुषंगाने अशासकीय संस्था व विविध कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या खाजगी संस्थाच्या सहभागाने विविध कामे हाती घेण्याबाबत सुचना प्राप्त होत असतात.

सदर शहरातील विकास कामांच्या अनुषंगाने, शहरी पर्यावरणामध्ये प्रदुषण रोखणेकामी उपलब्ध जागेनुसार नागरीक्षेत्रात लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने शहरामध्ये उद्याने बिकसित करणे व मियावाकी पध्दतीने वृक्षलागवड करून नागरी वने (Urban Forest) तयार करणे आवश्यक आहे. UDCPR मधील तरतुदी नुसार निवासी इमारतीच्या बांधकामअंतर्गत काही क्षेत्र उद्यानांकरीता आरक्षीत ठेवणे आवश्यक आहे.

UDCPR मधील आरक्षण तत्त्वानुसार मे. जसम्रीत इस्टेट प्रा. लि. या संस्थेने सादर केलेल्या दस्ताऐवजानुसार उद्यानाकरीता आरक्षीत असलेले गाव- मौजे- बोळींंज येथील सर्व्हे नं. १६५/बी/७ हा भूखंड वसई-विरार शहर महानगरपालिकाकडे (Gift Deed) बक्षीस पत्र क्र. १९३२०/२०२२ दि.१७/११/२०२२ द्वारे सुपूर्द करण्यात आलेला आहे. सदर भूखंडाचा ७/१२ उतारा अद्ययावत करण्यात आला आहे. सदर उद्यानाचे क्षेत्रफळ २३०३.२६ चौ.मी. (२२.७ गुंठे) इतके असून सदर भुखंड वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नावे झालेला आहे. सदर उद्यान मोठ्या लोकवस्तीत असून त्याठिकाणी लोकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ अपेक्षित आहे. त्याकरीता सदर उद्यानाचे सुशोभिकण व त्याचे सौदर्य राखणेकामी दैनंदिन देखभाल करणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरून स्थानिक नागरीकांना पुरेपुर आनंद घेण्यास व आल्हाददायक वातावरण निर्माण करण्यास मदत होईल.

मे. जसम्रीत इस्टेट प्रा. लि. या संस्थेने सदर उद्यान भुखंडाचा विकास करण्याकरीता उद्यानाचा सविस्तर आराखडा व सर्वसाधारण रचना (Design) सादर केलेली आहे. सदर रचनेच्या अनुषंगाने, उद्यानाचे सुशोभिकरण व विकासकाम संपुष्टात आल्यावर सदर उद्यानाचे पुढील देखभाल व निगा राखणेबाबत चे काम करण्यारकरीता मे.जसम्रीत इस्टेट प्रा. लि. संस्था इच्छूक आहेत व वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अटी व शर्तींनुसार उद्यानाची देखभाल करणेकामी परवानगीची मागणी केलेली आहे.

दि.३०/१०/२०२५ रोजी उद्यान विभागामार्फत आपल्या कार्यक्षेत्रातील आरक्षीत भुखंडावर उद्यान विकसित करणे तसेच नव्याने विकसित होणाऱ्या उद्यानांची देखभाल विना मोबदला करणेकामी स्वारस्य अभिरूची सुचना प्रसिध्द करून अर्ज मागविण्यात आले होते.

तरी, प्रभाग समिती (अे) कार्यक्षेत्रातील गाव- मौजे-बोळींंज येथील सर्व्हे नं. १६५/बी/७ हया भुखंडावर शोभिवंत झाडे, हिरवळ, बैठक व्यवस्था, विद्युत व्यवस्था, पाण्यची व्यवस्था, कुंपन व इतर

स्थापत्य निगडीत कामे करून उद्यान विकसित करून सदर उद्यानाची वेळावेळी निगा देखभाल राखणे गरजेचे आहे. सदर उद्यानांची देखभाल करणेकामी वरील नमूद बाबी सुस्थीत ठेवण्याकरीता अंदाजे ५०,००० इतका मासिक खर्च असून वार्षिक ६,२०,०००/- खर्च अपेक्षित आहे. तसेच वेळोवेळी दुरूस्तीचे काम करण्याकरीता खर्च अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने, मे. जसम्रीत इस्टेट प्रा. लि. याना सदर भुखंडावर उद्यान विकसित करणे व दैनंदिन देखभालीचे काम विना मोबदला दिल्यास महापलिकेवर येणारा आर्थिक बोजा कमी होण्यास मदत होणार आहे.

उद्यानाचे देखभालीच्या कामाचा कालावधी किमान पाच वर्ष करीता देणे योग्य राहील तसेच सदर कालावधी दरम्यान वेळोवेळी नमूद उद्यानाची विभागामार्फत पाहणी व प्रत्यक्ष स्थितीचा आढावा घेवून उद्यान सुस्थितीत असल्यास पुढील वर्षाकरीता काम देण्याचा निर्णय महापालिकेमार्फत घेण्यात येईल. सदर उद्यानांमध्ये भविष्यात होणारा लोकांचा वावर लक्षात घेता सदर ठिकाणी महसूल प्राप्त होण्याच्या दुष्टीने कुठल्याही प्रकारचे प्रकल्प (खाद्यपदार्थाची दुकाने, विविध प्रकारची विक्री स्टॉल व इतर मनोरंजक बाबी) राबविण्यापुर्वी मे. जसम्रीत इस्टेट प्रा. लि. यांनी महापालिकेस कळविणे बंधनकारक राहील व पुढील अटी-शर्ती नमूद करून काम देणे योग्य राहील.

१) संबंधित उद्यानाची मालकी ही पूर्णपणे महानगरपालिकेची राहील. कोणत्याही परिस्थितीत खाजगी विकासकास मालकी हक्क किंवा भाडेपट्टा हक्क प्राप्त होणार नाही.

२) विकासकाने उद्यानाचे सौंदर्यीकरण व देखभालकार्य पूर्णपणे विनामोबदला करावयाचे राहील. महानगरपालिकेकडून कोणताही आर्थिक मोबदला दिला जाणार नाही.

३) उद्यान देखभालीचा कालावधी संपुष्टात आल्यावर महानगरपालिकेस करार रद्द वा नूतनीकरण करण्याचा अधिकार राहील.

४) विकासकाने सौंदर्यीकरणाचा सविस्तर आराखडा महानगरपालिकेस सादर करावा व तो महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेतल्याशिवाय काम सुरू करता येणार नाही.

५) सार्वजनिक वापर अबाधित ठेवणे, उद्यान हे सर्वसामान्य नागरिकांसाठी खुले राहील.

६) विकासकास उद्यानाचा सार्वजनिक वापर बंद किंवा मर्यादित करता येणार नाही.

७) महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय कोणत्याही व्यावसायिक जाहिराती लावता येणार नाही.

८) उद्यानात कोणतेही कायमस्वरूपी बांधकाम महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय करता येणार नाही.

९) सर्व कामे महानगरपालिका व राज्य शासनाच्या नियमानुसार व पर्यावरणीय नियमांचे पालन करून करावयाचे राहतील.

१०)विकासकास हा करार कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेकडे हस्तांतरीत करता येणार नाही.

११)कामाच्या दरम्यान कोणतीही दुर्घटना झाल्यास त्याची जबाबदारी विकासकाची राहील.

१२)कालावधी संपल्यानंतर सर्व सुविधा व साहित्य महानगरपालिकेकडे विनामोबदला हस्तांतरीत करावा लागेल.

तसेच महापालिका ठरवेल त्या व्यतिरिक्त अन्य अर्टी-शर्तीस अधिन राहून मंजूरी देणेत येईल.

तरी, मे. जसप्रीत इस्टेट प्रा. लि. यांना प्रभाग समिती (अे) कार्यक्षेत्रातील गाव-मौजे-बोळींज येथील सर्व्हे नं. १६५/बी/७ या भुखंडावर विनामोबदला उद्यान विकसित करणे व पाच वर्षाकरीता दैनंदिन देखभाल करणेचे काम देणेस प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मांडणेत यावा.

ठराव / निर्णय :- प्रभाग समिती (अे) कार्यक्षेत्रातील गाव- मौजे-बोळींज येथील सर्व्हे नं. १६५/बी/७ या उद्यानाकरीता आरक्षित असलेल्या भुखंडावर उद्यानाचा विकास व देखभाल करणेकामी प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५ **सभा सुचना क्र. ७** **दिनांक : ३०/०४/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात महानगरपालिकेची रुग्णालये व माता बाल संगोपन केंद्रांसाठी वैद्यकीय अधिकारी स्त्रीरोग तज्ञ (पूर्णवेळ), बधिरीकरण तज्ञ (पूर्णवेळ), रेडिओलॉजीस्ट (पूर्णविळ), चेष्ट स्पेशालिस्ट (पूर्णवेळ) संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी स्त्वरुपात करारपध्दतीने 6 महिन्याच्या कालावधीसाठी मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात पदभरती करणेकरीता वृत्तपत्रात तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळादर जाहिरात प्रसिध्द करणेस व सदरकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ७ रुग्णालये, २ माताबाल संगोपन केंद्र, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १५ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, ४४ आयुष्यमान आरोग्य मंदिर कार्यरत असुन यामध्ये शहरातील नागरीकांना रुग्णालयीन सेवा देण्यात येते.

शासन निर्णय क्र.वविम-१९११/प्र.क्र.६४९/नवि-२३, दि.९ सप्टेंबर २०१४ रोजीच्या महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांचा सुधारीत आकृतीबंधामध्ये खालील संवर्गातील मंजूर पदे व त्यानुसार कायम/कंत्राटी व मानद तत्वावर भरलेल्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	संवर्ग	दि.९ सप्टेंबर, २०१४ च्या आकृतीबंधातील मंजूर पदे	कायम भरलेली पदे	६ महिने कंत्राटी पध्दतीने भरलेली पदे	मानद तत्वावर भरलेली पदे
१	वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग तज्ञ) (पूर्णवेळ)	४	०	६	२
२	वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण तज्ञ) (पूर्णवेळ)	४	०	०	०
३	वैद्यकीय अधिकारी (रेडिओलॉजीस्ट) (पूर्णवेळ)	२	०	०	०
४	वैद्यकीय अधिकारी (चेष्ट स्पेशालिस्ट) (पूर्णवेळ)	२	०	०	०

सुधारित आकृतीबंधामध्ये स्त्रीरोग तज्ञ संवर्गात १९ पदे पस्तावित करण्यात आलेली आहेत.

सबब वसई विरार शहर महानगरपालिकेचा आकृतीबंध सन २०१४ मध्ये मंजूर झाला. सदर आकृतीबंध मंजूर झाला त्या काळात फक्त दोन रुग्णालये कार्यरत होती. सद्यस्थितीत महानगरपालिका क्षेत्रात वाढती लोकसंख्या पाहता महानगरपालिकेच्या २०१४ नंतर नव्याने ५ रुग्णालये तसेच २ माताबाल संगोपन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. सदर ठिकाणी विविध आजांरावरील उपचारासाठी दररोज रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सदरहू ठिकाणी वैद्यकीय सेवा पुरविणेकामी तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची आवश्यकता असल्याने रिक्त प्रवर्गातील पदे महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियम ५३(३) अन्वये ६ महिन्याचे कालावधीसाठी महानगरपालिका स्तरावर गठित निवडसमितीमार्फत कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात भरणे आवश्यक आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	पदनाम	एकूण भरावयाची पदे	रिक्त पदांचा प्रवर्गाचा तपशिल									
			अ. जा.	अ. ज.	वि. जा. (अ)	भ. ज. (ब)	भ.ज. (क)	भ. ज. (ड)	वि.मा .प्र.	इ.मा. व.	ईडब्ल्यु एस	खुला
१.	वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग तज्ञ) (पूर्णवेळ)	३	१	०	०	०	०	०	०	२	०	०
२.	वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण तज्ञ) (पूर्णवेळ)	४	१	०	१	०	०	०	०	०	०	२
३.	वैद्यकीय अधिकारी (रेडिओलॉजीस्ट) (पूर्णवेळ)	२	१	०	१	०	०	०	०	०	०	०
४.	वैद्यकीय अधिकारी (चेष्ट स्पेशालिस्ट) (पूर्णवेळ)	२	१	०	१	०	०	०	०	०	०	०

उपरोक्त रिक्त पदे ६ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरणेकामी मानधनावर होणाऱ्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	पदनाम	एकूण भरावयाची पदे	निश्चित केलेले मानधन प्रति माह रु.	मासिक मानधनावर होणारा खर्च रु.	सहामाही मानधनावर होणारा खर्च रु.
१.	वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग तज्ञ) (पूर्णवेळ)	३	१०४७९३/-	३१४३७९/-	१८८६२७४
२.	वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण तज्ञ) (पूर्णवेळ)	४	१०४७९३/-	४१९१७२/-	२५१५०३२
३.	वैद्यकीय अधिकारी (रेडिओलॉजीस्ट) (पूर्णवेळ)	२	१०४७९३/-	२०९५८६/-	१२५७५१६
४.	वैद्यकीय अधिकारी (चेष्ट स्पेशालिस्ट) (पूर्णवेळ)	२	.१०४७९३/-	२०९५८६/-	१२५७५१६
	एकूण	११	-	११५२७२३	६९१६३३८

उपरोक्तप्रमाणे सहामाही मानधनावर रु.६९,१६,३३८/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर मानधनापोटी होणारा खर्च सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात "रुग्णालय वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय सेवा व्यवस्थापन ठेका" या लेखाशिर्षाखाली रु.४०,००,००,०००/- इतकी तरतुदीमधून खर्च भागविता येईल. तरी सदरकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेची आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभेपुढे ठेवणेस शिफारस आहे.

ठराव/निर्णय :- महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात महानगरपालिकेची रुग्णालये व माताबाल संगोपन केंद्रांसाठी वैद्यकीय अधिकारी - स्त्रीरोग तज्ञ (पूर्णवेळ), बधिरीकरण तज्ञ (पूर्णवेळ), रेडिओलॉजीस्ट (पूर्णवेळ), चेष्ट स्पेशालिस्ट (पूर्णवेळ) संवर्गातील एकूण ११ रिक्त पदे कंत्राटी स्वरुपात करारपध्दतीने ६ महिन्याच्या कालावधीसाठी मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात करारनामा अटी-शर्तीच्या अधिन राहुन नेमणूक करण्यास तसेच महानगरपालिका संकेतस्थळावर व वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देऊन निवड समिती मार्फत पदभरती प्रक्रिया करणेस व याकामी त्यांचे मानधनापोटी येणाऱ्या सहामाही अंदाजे रक्कम रु.६९,१६,३३८/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुतांने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६ **सभा सुचना क्र. ७** **दिनांक : ३०/०४/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई गाव येथील मौजे मालोंडे स.नं. 77 अ मधील दफनभुमी जागेत विविध आवश्यक कामे करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

प्रस्तावाचा विषय	:	वसई विरार शहर महानगरपालिका **मौजे मालोंडे स.नं. ७७अ मधील ख्रिस्ती दफनभुमी जागेत ग्रेव्हगार्डस (दफनपेटी) व विविध आवश्यक कामे करणे** कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.
अंदाजपत्रकीय रक्कम	:	रु. ८४,३४,३४३/-
कामाची आवश्यकता	:	प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील ख्रिस्ती दफानभुमीत महानगरपालिकेमार्फत कंपाऊंड वॉल, गेट, वॉचमेन केबीन, शौचालय, प्रार्थना शेड, पाथवे, माती भराव व ३०० ग्रेव्हयार्डसचे (दफनपेटीचे) काम करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर ठिकाणी अस्तित्वात असलेल्या ग्रेव्हयार्डस (दफनपेटी) अपुऱ्या पडत असुन सदर जागेवर पाहणी केली असता आणखी २०० ग्रेव्हयार्डस (दफनपेटी) बांधता येणे शक्य आहे. तसेच उजव्या बाजुलगत असलेल्या कंपाऊंड वॉलची उंची वाढवुन फेसिंगचे काम करणे आवश्यक आहे. तसेच सदर कामाकरीता माजी महापौर सो. यांनी पत्रान्वये मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने सदर जागेचे प्रत्यक्ष पाहणी करुन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.
कामाचे स्वरुप	:	अंतर्गत कामे : ग्रेव्हयार्डस (दफनपेटी), पाथवे, बोनवेल, कंपाऊंड वॉल, फेसिंग, रंगकाम, चेकर्ड टाईल्स परिमाण : ग्रेव्हयार्डस (दफनपेटी) – २०० नग पाथवे – ३२०.५८ चौ.मी. बोनवेल – १.८० मी. X १.८० मी. कंपाऊंड वॉल – लांबी २२५ मी., उंची १.०० मी. फेंसिंग – २२५ मी. रंगकाम – १०४३.१५ चौ.मी. चेकर्ड टाईल्स – ३६३.८२ चौ.मी.
यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :-		यापुर्वी सदर ठिकाणी मागील ३ वर्षात कुठल्याही प्रकारचे काम झालेले नाही.
अर्थसंकल्पीय तरतुद	:	अ) लेखाशिर्ष : विकास विषयक कामांसाठी राखीव निधी

स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. ०९ अ.क्र. ९७५ वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) नुसार मा.

महासभेसमोर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव / निर्णय : वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वरील कामी तयार करणेत आलेल्या रु. ८४,३४,३४३/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकात ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. सदर कामी शासनाकडुन अनुदान/ निधी उपलब्ध झाल्यास सदरच्या निधीतुन काम करणेस प्रशासकीय वित्तीय मान्यता देणेत येत आहे. अनुदान/ निधी उपलब्ध न झाल्यास महानगरपालिका निधीतुन सदरचे काम करणेस मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवुन निविदेची कार्यवाही करणेस, तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - नरेंद्र पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७ **सभा सुचना क्र. ७** **दिनांक : ३०/०४/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व मालमत्तांना नळजोडण्या देऊन पाण्याचा लाभ उपलब्ध करून देण्याचा धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.

वसई-विरार उप प्रदेशातील भूतपुर्व 4 नगरपरिषदा व परिसरातील 53 गावांचा समावेश करून दि.09 जुलै, 2009 रोजी वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली आहे. महानगरपालिकेचे क्षेत्रफळ 311 चौ.कि.मी. इतके विस्तारीत असून डोंगरी, नागरी व सागरी भागात विस्थापिलेले आहे. महानगरपालिका क्षेत्राची सन 2011 च्या जनगणनेनुसार 12.23 लक्ष व सद्याची अंदाजे 25.28 लक्षापेक्षा अधिक लोकसंख्या झाली आहे. सद्यःस्थितीत खालील स्त्रोतांवरून महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

अ. क्र.	योजना	एकूण प्रतिदिन होणारा पाणी पुरवठा (द.ल.ली)	कार्यान्वित वर्ष
१	पेल्हार	१०	सन १९७५
२	उसगांव	२०	सन १९९६
३	सुर्या टप्पा - १	१००	सन २००६
४	सुर्या टप्पा - ३	१००	सन २०१७
५	MMRDA	१७०	दि. १५/११/२०२३
एकूण		**४००**	

वसई-विरार उप प्रदेशाच्या विकास आराखड्यास शासनाने दि.०९/०२/२००७ अन्वये मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि. २१/०२/२०१५ च्या अधिसूचनेव्दारे महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार महापालिका क्षेत्राबाहेरील २१ गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महापालिकेस प्राधिकृत केले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात नागरीकरणाचा वेग इतर शहरांच्या तुलनेत जास्त आहे. सद्यःस्थितीत महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त नसलेल्या इमारती /बांधकामे, अनधिकृत चाळी, घरे, झोपड्या असून यापुर्वी मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ९ व १० दि.०७/०६/२०१६ अन्वये सन २०११ च्या उपविधीतील तरतुदीनुसार तसेच मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६ दि.३१/०८/२०१९ अन्वये प्राप्त असलेल्या मान्यतेनुसार नळजोडण्या मंजूरीची कार्यवाही सरसकटपणे करण्यात येत होती.

सन २०२०-२०२१ पासून महानगरपालिकेस भासणारी पाण्याची तुट लक्षात घेऊन तत्कालीन आयुक्त यांनी दि.१५/०३/२०२१ च्या आदेशान्वये नवीन नळजोडण्या मंजूरीच्या कार्यवाहीस स्थगीती दिली होती. MMRDA च्या सुर्या ४०३ द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेतून दि.१५/११/२०२३ रोजी पासून महानगरपालिकेस १७० द.ल.ली. पाण्यापैकी काही

प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्याने दि. ०८/०२/२०२४ रोजीच्या आदेशान्वये नळजोडण्या मंजूरीची कार्यवाही सुरू करण्यात आली होती. महानगरपालिकेमार्फत आत्तापर्यंत ६९९६१ इतक्या नळजोडण्या दिल्या आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल याचिका Civil Appeal No.१४६०४/२०२४ वर दि.१७/१२/२०२४ रोजी निर्णय दिला असून मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये करण्याबाबत नगर विकास विभाग, शासन परिपत्रक संकिर्ण-२०२४/प्र.क्र.४५२/नवि-२० दि. २५/०४/२०२५ अन्वये कळविले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील २१.४ मध्ये "All the necessary service connections, such as, Electricity, water supply, sewerage connection, etc., shall be given by the service provider / Board to the buildings only after the production of the completion/occupation certificate" असे नमुद आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना सन २००९ मध्ये भुतपुर्व ४ नगरपरिषदा व परिसरातील ५५ महसुली गावांचा समावेश होऊन झालेली आहे. महानगरपालिका स्थापनेपुर्वीपासून नगरपरिषदा अथवा ग्राम पंचायत काळापासून बऱ्याच मालमत्ता ह्या क्षेत्रात अस्तित्वात आहेत. महानगरपालिका स्थापनेपूर्वी वसई तालूक्यातील ६९ गावांकरीता शासनाने पाणी पुरवठा योजना मंजूर केली होती. सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सन २०११ पुर्वी झाली होती. सदर योजनेसाठी आवश्यक असणारे पाणी हे महानगरपालिकेच्या स्त्रोतांवर आधारीत होते. महानगरपालिकेस सन २०११ ते सन २०१८ पर्यंत पाण्याची तुट भासत होती. ६९ गावांतर्गत अंथरण्यात आलेल्या PVC जलवाहिन्या ह्या नादुरूस्त झाल्या होत्या. त्यामुळे सदर भागात रहिवास करणाऱ्या नागरीकांना पाण्याचा लाभ उपलब्ध करून देणे शक्य झाले नाही.

महापालिकेत समाविष्ट ५२ गावांच्या पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने महापालिकेने सन २०२९ पासून जलवाहिन्या अंथरणे तसेच जलकुंभ दुरूस्ती अशी कामे हाती घेऊन काही गावांचा पाणी पुरवठा सुरू केला आहे. तसेच उर्वरीत गावांमध्ये टप्प्या-टप्प्याने पाणी पुरवठा करण्याचे नियोजन आहे. पाणी ही जीवनावश्यक बाब असल्याने वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येकाला मुलभूत हक्क म्हणून अधिकृतरित्या पाणी मिळवे ही अपेक्षा आहे. महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट ५२ गावांमध्ये व त्यांच्या हद्दीमध्ये भोगवटा प्रमाणपत्र / गुंठेवारी दाखला न घेतलेल्या बांधकामांचे प्रमाण जास्त असून आवश्यकतेनुसार कागदपत्रांची पुर्तता होत नसल्याने नागरीकांमार्फत अधिकृत नळजोडण्या घेण्याचे प्रमाण कमी झाले आहे. परिणामी नागरीक अनधिकृत नळजोडण्या घेत असल्याचे निदर्शनास येत आहे.

महानगरपालिका क्षेत्रात बहुतांश ठिकाणी जुनी वडीलोपार्जीत बांधकामे असून सदर बांधकामांचे नकाशे मान्य नाहीत. तसेच सदर जागेचे / प्लॉटचे भाऊबंधकीमध्ये वाटप झाले असल्याने त्यांची निश्चित मोजमापे उपलब्ध नसतात. अशा वेळी जागेच्या क्षेत्रफळानुसार / मालमत्तेच्या प्रकारानुसार मिळकर्तींना नळजोडण्या मंजूर करताना अनेक अडचणी येतात. व बहुतांशवेळी नागरीकांनी अधिकृत नळजोडणी न मिळाल्यामुळे अनधिकृतरित्या नळजोडण्या घेतल्याचे आढळून येत आहे.

ग्रामपंचायत / नगरपरिषद काळापासून अस्तित्वात असलेल्या सर्व मालमत्तांना तसेच ज्या मालमत्तांना / बांधकामांना बांधकाम परवानगी नाही / भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त नाही अशा मालमत्तांमध्ये निवास करणाऱ्या नागरीकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अधिकृत नळजोडण्या दिल्यास अनधिकृत नळजोडण्या घेण्याचे प्रमाण कमी होईल.

ज्या ग्रामिण भागात नळजोडण्या दिलेल्या नाहीत अथवा अन्य पाणी पुरवठ्याची कोणतीही व्यवस्था नाही अशा भागातील घरे/चाळी/झोपड्यांमध्ये रहिवास करणाऱ्या नागरीकांना पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्याकरीता महानगरपालिकेमार्फत टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. टँकरद्वारे पाणी पुरवठयाकरीता कोणतेही शुल्क पाणी लाभधारकांना आकारण्यात येत नाही. परिणामी टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येत आहे.

भारताच्या संविधानातील कलम २१ अन्वये प्रत्येक नागरिकास जीवनाचा व सन्मानाने जगण्याचा अधिकार असून त्याअंतर्गत स्वच्छ पाणी, स्वच्छता व मूलभूत नागरी सुविधा यांचा समावेश होतो. तसेच, ७४ वी घटना दुरुस्ती

नुसार अशा सेवा पुरविण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपविण्यात आलेली आहे. याबाबत मा. उच्च न्यायालयाने दि.०३/०२/२०२६ रोजी WRIT PETITION NO. ४२२५ of २०२४ AND INTERIM APPLICATION NO.६०१६ OF २०२५ या याचिकेच्या सुनावणी दरम्यान स्पष्ट केले आहे.

A) सर्व मालमत्तांना नळजोडण्या देऊन पाण्याचा लाभ उपलब्ध करून देणे.

वरील सर्व बाबीचा विचार करता वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील माहे डिसेंबर, २०२४ पुर्वी अस्तित्वातील व महानगरपालिकेस मालमत्ता कर भरणा करीत असलेल्या सर्व निवासी व बिगर निवासी तसेच औद्योगिक मालमत्तांना मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ९ व १० दि.०७/०६/२०११, मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६ दि.३१/०८/२०१९ अन्वये तसेच प्रशासकीय ठराव क्र. १९९७ दि.१६/०१/२०२५ व प्रशासकीय ठराव क्र. १९९८ दि.१७/०१/२०२५ अन्वये निश्चित केलेला आकार तसेच पाणीपट्टी दर आकारून खालील किमान कागदपत्रांची पुर्तता करणाऱ्या नागरीकांना प्रचलीत पध्दतीनुसार नळजोडण्या मंजूरीची कार्यवाही करण्यास मान्यता आवश्यक आहे.

1. विहित नमुन्यात अर्ज
2. मालकी हक्काची कागदपत्र / मालकाचे संमतीपत्र (रु.500/- च्या स्टॅम्प पेपरवर)
3. आधारकार्ड
4. बांधकाम परवानगी (असल्यास)
5. भोगवटा प्रमाणपत्र (असल्यास)
6. Property tax assessment & Property tax भरल्याची पावती
7. वीज देयक
8. रु. 500/- च्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र (नळजोडणी दिली म्हणजे बांधकाम अधिकृत होत नाही याबाबतचे तसेच पाणीपट्टी नियमीत भरणा करण्यात येईल याबाबतचे हमीपत्र)

B) अर्धा इंचाप्रमाणे व्यासाची परिगणना करून 1 इंच ते 3 इंच पर्यंत नळजोडण्या देणे.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रचलीत नियम व विविध ठरावानुसार अर्धा इंच नळजोडण्या मंजूर करून वितरण जल वाहिन्यांवर देण्याची तरतुद आहे. महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गृहसंकुले विकसीत झाली असून उदा. एका इमारतीत २५० ते ३०० सदनिका असल्यास २५ ते ३० अर्धाइंचाच्या नळजोडण्या मंजूर करून २५ ते ३० अर्घाइंच नळजोडण्या वितरण जलवाहिनीवर देण्यात येत आहेत. सदर जोडण्या वितरण जलवाहिनीवर जोडताना अनेक अडचणी येत असून पाण्याचा दाब सर्व नळजोडण्यांमध्ये समान राहण्यास तांत्रिक अडचणी येत आहेत.

वरील तांत्रिक अडचणीमुळे नागरीकांच्या पाणी पुरवठ्या विषयी तक्रारी प्राप्त होत आहेत. याकरीता मोठ्या स्वरूपात सदनिका असणाऱ्या इमारतींकरीता अर्धा इंचाच्या अनुज्ञेय असणाऱ्या नळजोडण्यांच्या व्यासाची परिगणना करून समतुल्य व्यासाची (१ इंच १.५ इंच, २ इंच, २.५ इंच, ३ इंच) एकच नळजोडणी दिल्यास पुरेशा दाबाने पाणी पुरवठा करणे शक्य होणार आहे.

सदरची कार्यवाही करण्यास मान्यतेची आवश्यकता आहे.

C) अनधिकृत नळजोडण्या नियमीत करणे.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात चाळी, झोपडपट्टी भागात असंख्य अनधिकृत नळजोडण्या घेण्यात येत असून सदर अनधिकृत नळजोडण्यांबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. संबंधीत क्षेत्रीय अभियंत्यामार्फत अनधिकृत

नळजोडण्या खंडीत करण्याची कार्यवाही करण्यात येते. मात्र अधिकच्या दाटीवाटी क्षेत्रात सदरच्या अनधिकृत नळजोडण्या पुन्हा वितरण जलवाहिनीवर नागरीक करीत आहेत.

महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या अनधिकृत नळजोडण्या खालील नियमावलीनुसार अधिकृत केल्यास महानगरपालिकेच्या पाणीपट्टी उत्पन्नात वाढ होईल. व NRW (Non Revenue Water) कमी करण्यास मदत होईल.

1. विहित नमुन्यात अर्ज
2. मालकी हक्काची कागदपत्र / मालकाचे संमतीपत्र (रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर)
3. आधारकार्ड
4. बांधकाम परवानगी (असल्यास)
5. भोगवटा प्रमाणपत्र (असल्यास)
6. Property tax assessment & Property tax भरल्याची पावती
7. वीज देयक
8. रु. ५००/- च्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र (नळजोडणी दिली म्हणजे बांधकाम अधिकृत होत नाही याबाबतचे तसेच पाणीपट्टी नियमीत भरणा करण्यात येईल याबाबतचे हमीपत्र)

मा. सर्वसाधारण सभा दि.०७/०६/२०११ ठराव क्र. ९ व १० मधील निर्णय १९ नुसार "कोणतीही जोडणी नळ अनधिकृतपणे गैरमार्गाने या उपविधीचे उल्लंघन करून घेण्यात आला असल्याचे निदर्शनास आल्यास मालमत्ता प्रकारानुसार अनुज्ञेय नळ जोडणी आकाराच्या तिप्पट दराने नळ जोडणी आकार वसुल करणे, जोडणी नळ घेतल्याच्या संभाव्य दिनांकापासूनची तिप्पट दराने पाणीपट्टी रक्कम वसुल करणे" अशी तरतुद नमुद आहे. त्यानुसार पाणी पुरवठा विभागामार्फत अनधिकृत नळजोडण्यांवर कार्यवाही करण्यात येत आहे.

अनधिकृत नळजोडण्या ह्या बहुतांश चाळी व झोपडपट्टी भागात होत असून सदर अनधिकृत नळजोडणी घेणाऱ्या बहुतांश कुटूंब / संस्था ह्या अल्पउत्पन्न गटात येत असल्याने अनधिकृत नळजोडणी अधिकृत करण्यासाठी येणारा आर्थिक खर्च विचारात घेऊन येत नाहीत.

सदर दंडामध्ये शिथीलता दिल्यास / दंडाची रक्कम कमी केल्यास अनधिकृत नळजोडण्या घेणारी कुटूंब / संस्था अनधिकृत नळजोडण्या नियमीत करण्याकरीता पुढे येतील. सदर बाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

तरी भारताच्या संविधानातील कलम २१ मधील तरतुदीनुसार तसेच ७४ व्या घटना दुरुस्ती नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपविण्यात आलेली जबाबदारी विचारात घेता वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांना नळजोडण्या देऊन पाण्याचा लाभ उपलब्ध करून देण्यासाठी वरील A ते C बाबत विचार विनीमय करून निर्णय घेण्याकरीता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे धोरणात्मक निर्णयासाठी सादर,

ठराव / निर्णय :-

वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन हि सभा खालील प्रमाणे धोरणात्मक निर्णय घेत आहे.

1. भारताच्या संविधानातील कलम २१ मधील तरतुदीनुसार तसेच ७४ व्या घटना दुरुस्ती नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपविण्यात आलेली जबाबदारी विचारात घेता वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील डिसेंबर, २०२४ पुर्वीच्या सर्व अधिकृत व अनधिकृत मालमत्तांमध्ये रहिवास करणाऱ्या नागरीकांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने वरील प्रस्तावात नमुद "A" प्रमाणे किमान कागदपत्र घेऊन नळजोडण्या देण्यास मान्यता देत आहे.
2. उक्त नळजोडण्या मंजूरी अनुषंगाने यापुर्वी मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ९ व १० दि.०७/०६/२०११, मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६ दि.३१/०८/२०१९ अन्वये तसेच प्रशासकीय ठराव क्र. १९९७ दि.१६/०१/२०२५ व प्रशासकीय ठराव क्र. १९९८ दि.१७/०१/२०२५ अन्वये निश्चित केलेला नळ आकार तसेच पाणीपट्टी दर आकारून नळ जोडण्या देण्यास मान्यता देत आहे.

3. महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गृहसंकुले विकसीत झाली असून प्रस्तावात नमुद "B" प्रमाणे मोठ्या स्वरूपात सदनिका असणाऱ्या इमारतींकरीता अर्धा इंचाच्या अनुज्ञेय असणाऱ्या नळजोडण्यांच्या व्यासानुसार पाणी वहन क्षमतेच्या परिगणीत सुत्रानुसार येणारी समतुल्य १ इंच १.५ इंच. २ इंच. २.५ इंच. ३ इंच व्यासाची नळजोडणी देण्यास मान्यता देण्यात येत आहे. जोडणी शुल्क व रस्ता खोदाई फी प्रचलीत दरानुसार (अर्धा इंच नळजोडणीसाठी ज्या प्रमाणे शुल्क आकारण्यात येत आहेत त्याप्रमाणेच) लागू करण्यास मान्यता देत आहे.

4. मा. सर्वसाधारण सभा दि.०७/०६/२०२११ ठराव क्र. ९ व १० मधील निर्णय १९ नुसार अनधिकृत नळजोडणी नियमीत करण्यासाठी तीप्पट दराने आकार व नळजोडणी घेतल्याच्या संभाव्य दिनांकापासून तीप्पट दराने पाणीपट्टी वसुल करण्यासाठी तरतुद असून सदर रक्कम मोठ्या स्वरूपात असल्याने नळजोडण्यानियमीत करण्यास नागरीक येत नसल्याने व सदर नागरीक / कुटूंब अत्यंत अल्प गटात येत असल्याने वरील प्रस्तावातील "C" प्रमाणे किमान कागदपत्रे घेऊन अनधिकृत नळजोडण्या नियमीत कराव्यात तसेच अनधिकृतपणे नळजोडणी घेतली म्हणून तीनपट आकार व तीनपट पाणीपट्टी ऐवजी एकपट (१+१) प्रमाणे आकार व नळजोडणी घेतल्याच्या संभाव्य दिनांकापासून पाणीपट्टी आकारण्यास मान्यता देत आहे.

5. वरील नमुद "A", "B" व "C" प्रमाणे अंमलबजावणी करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यात येत असून सदरची अंमलबजावणी त्यांनी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याने करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - Opal मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

Agapy

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार
मा.सर्वसाधारण सभा
विशेष सभा सुचना क्र.७

सर्वसाधारण सभा ठराव क्र...९८. **दिनांक :३०/०४/२०२६**

.....

विषय :- सन २०२६-२७ या वित्तीय वर्षामध्ये महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याकरिता निधी थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे देण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नऊ (०९) प्रभाग समिती कार्यक्षेत्रात जिल्हा परिषदेच्या एकूण ११६ शाळा कार्यरत आहेत. या शाळांमध्ये सद्यस्थिती मध्ये अंदाजे २० ते २१ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.सदर शाळेत शिक्षण घेत असलेली मुले / मुली हे आर्थिकदृष्टया दुर्बल कुटुंबातील असुन त्यांना शैक्षणिक व इतर साहित्य स्वखर्चाने खरेदी करणे परवडत नाही. **या कामी मा.गटशिक्षणाधिकारी यांनी वरील संदर्भिय पत्रान्वये जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तर,बुट,मोजे/सॅंडल, वॉटर कलर,ड्रॉईग बुक, वही, कंपास बॉक्स, पेन्सील बॉक्स, वॅक्स कलर इत्यादी शैक्षणिक साहित्य देण्याबाबत कळविले आहे.**

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाचा गोडवा निर्माण होऊन,मुले शाळेत नियमितपणे येतील व त्यांचा शैक्षणिक दर्जा वाढून ही मुले स्वावलंबी व सक्षम होतील या उद्देशाने मागील वर्षी सन २०२५-२६ या वर्षात महिला व बालकल्याण विभागामार्फत महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषदेच्या एकूण ११६ शाळेमधील विद्यार्थ्यांना इ.१ ली ते इ.१० वी (इयत्तेनुसार व साईज) दप्तर,पेन्सीली बॉक्स,कंपास बॉक्स, ड्रॉईग बुक,वही (८० पृष्ठे प्रत्येकी ६ नग व १७६ पृष्ठ प्रत्येकी ६ नग एकूण १२ नग वह्या या व्यतिरिक्त इ.१ली ते इ.४ थी वॅक्स कलर व इ. ५ वी ते १० वी वॉटर कलर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्या मंजुर निविदाधारकांमार्फत शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आलेले आहे याकामी २,१४,५४,२४०/- इतका खर्च झालेला आहे सदरचा खर्च शालेय विद्यार्थी व अंगणवाडीतील मुलांसाठी साहित्य वाटप लेखाशीर्षाखालील तरतूदीतुन भागविण्यात आलेला आहे.

वरील संदर्भीय पत्राचे अनुषंगाने दि.०१ एप्रिल, २०२६ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वस्तू स्वरुपात न देता रोख स्वरुपात देणेबाबत सुचना प्राप्त झाल्या आहेत या प्रमाणे वरील संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार

महानगरपालिकेमार्फत शैक्षणिक साहित्याकरिता निधी थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे विद्यार्थ्यांना दिल्यास ते शैक्षणिक साहित्यचा लाभ घेऊ शकतील.

नगरविकास विभाग,शासन निर्णय क्र.एमयुएम-२०२१/प्र.क्र.३८५/नवि-१७, मंत्रालय, मुंबई, दि.२९ मार्च, २०२२ अन्वये महानगरपालिकेच्या एकूण वार्षिक उत्पन्नापैकी बांधील खर्च वजा करुन राहिलेल्या निव्वळ महसूलातील ५% रक्कमेतून राबविण्याच्या महिला व बालकल्याणासाठीच्या योजना निश्चितीकरण व मार्गदर्शन सुचना प्राप्त झाल्या आहेत.त्याअनुषंगाने नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना शैक्षणिक साहित्याकरिता निधी थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे देणे योग्य होईल.

संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये "विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुस्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर,रोख स्वरुपात थेट (DBT) द्वारे देण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.याबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चीत करण्यात आलेली आहे.

अ) संबंधित वस्तुबाबत वितरण योजना तयार करणे.

आ) वस्तु विकत घेण्यासाठी अनुदान ठरविणे.

इ) वितरीत करावयाच्या वस्तूंचे परिमाण (Specification) ठरविणे.

ई) या योजनांतर्गत पात्रतेचे निकष ठरविण्यात यावे.

उ) पात्रतेप्रमाणे लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.

ऊ) लाभार्थ्यांची यादी तयार करुन त्यांच्या आधार क्रमांकाशी जोडणी (Seeding) करणे.

ए) निवड केलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणाला मान्यता देवून त्यांना लेखी कळविणे.

ऐ) लाभार्थ्यांनी परिमाणाप्रमाणे (Specification) वस्तूंची खरेदी करणे.

ओ) संबंधित यंत्रणेने लाभार्थ्याने खरेदी केलेल्या वस्तुची व सादर केलेल्या पावतीची शहानिशा करुन पूणपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्याच्या बँक खात्यावर योजनेअंतर्गत सुनिश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जमा करणे.वस्तुची शहानिशा कशा प्रकारे करावी व ती करणे आवश्यक आहे काय याबाबत संबंधित विभागाने निर्णय घ्यावा.

औ) लाभार्थ्यांना रोख रकमेच्या स्वरुपात अनुदान त्यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँक खात्यात जमा करण्यात यावे.

त्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याबाबतचे आर्थिक अनुदान रक्कम निश्चित करुन संदर्भीय शासन निर्णया मधील वरील नमुद कार्यपध्दतीनुसार "अ" ते "औ "कार्यपध्दत राबवून मगच "औ" नुसार थेट लाभार्थ्यांच्या (विद्यार्थी) बँक खात्यात (DBT) द्वारे जमा करणे अधिक उपयुक्त व पारदर्शक राहील.यानुसार प्रती विद्यार्थी

(DBT) द्वारे द्यावयाचे अनुदानाची रक्कम बाबत माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.यानुसार प्रति विद्यार्थी प्रति इयत्ता बाबत अनुदान रक्कम निश्चीत करणे आवश्यक आहे. तसेच या शासन निर्णया सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविण्यात आलेल्या वस्तु कोणत्याही योजने अंतर्गत खरेदी करुन लाभार्थ्यांना वाटप/वितरीत करता येणार नाही असे नमुद केलेले आहे सोबत संदर्भीय शासन निर्णय व परिशिष्ट "अ" जोडलेले आहे.परिशिष्ट मध्ये वरील संदर्भ क्र.१ नुसार मागणी केलेल्या शैक्षणिक साहित्यापैकी फक्त शाळेचे दप्तर (school bag) याचा उल्लेख आहे उर्वरीत साहित्याचा उल्लेख नाही.

अ.क्र.	तपशिल	विद्यार्थी संख्या	प्रती विद्यार्थी द्यावयाचे अनुदान	एकूण अंदाजित खर्च
१	२	३	४	५
१)	इ.१ ली ते ४ थी (दप्तर, पेन्सील बॉक्स, ड्रॉईंग बुक, कलर पेटी,वही ८० पृष्ठ व १७६ पृष्ठ)	११८९२	रु.७४७/-	रु.८८,८३,३२४/- (परिशिष्ट अ नुसार)
२)	इ.५वी ते ७ वी (दप्तर, पेन्सील बॉक्स, ड्रॉईंग बुक, वॉटर कलर,कंपास बॉक्स,वही ८० पृष्ठ व १७६ पृष्ठ)	६८७०	रु.९६३/-	रु.६६,१५,८१०/- (परिशिष्ट ब नुसार)
३)	इ.८ वी ते १० वी (दप्तर, पेन्सील बॉक्स, ड्रॉईंग बुक, वॉटर कलर,कंपास बॉक्स,वही ८० पृष्ठ व १७६ पृष्ठ)	१८६२	रु.९८९/-	रु.१८,४१,५१८/- (परिशिष्ट क नुसार)

वरीलप्रमाणे तक्तातील स्तंभ ३ मधील नमूद विद्यार्थी संख्या सन २०२५-२६ मधील आहे प्रत्यक्षात सन २०२६-२७ या वर्षातील शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यावर पट संख्या वाढण्याची शक्यता आहे त्यानुसार महानगरपालिका हद्दीतील इ.१ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याकरिता निधी थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे विद्यार्थ्यां देण्याकामी अंदाजे **रु.२,००,००,०००/-** (अक्षरी दोन कोटी रुपये मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

योजनेची कार्यपध्दती :-

१) वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी.

२) इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतचे विद्यार्थी.

३) प्रती विद्यार्थी दप्तर १नग,पेन्सील बॉकस १ नग,कलर पेठी १ नग (इ.१ ली ते ४ थी),वही ८० पष्ठ ६ नग,वही १७६ पृष्ठ ६ नग,ड्रॉईग बुक १ नग,वॉटर कलर १ नग (इ.५ वी ते १० वी) असे परिणाम राहिल.

४) संबंधित जिल्हा परिषदच्या एकूण ११६ शाळांच्या मुख्याध्यापक यांचेकडुन प्रमाणित केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या.

५) मुख्याध्यापक यांच्या कढुन प्राप्त यादीनुसार निधी थेट लाभार्थ्यांच्या (विद्यार्थी) बँक खात्यात जमा करणे.

६) लाभार्थ्यांनी आवश्यक शैक्षणिक साहित्य खरेदी करणे.

७) संबंधित शैक्षणिक वर्षात नियमित उपस्थित असलेले विद्यार्थी असणे आवश्यक याकामी विद्यार्थ्यांची माहिती मुख्याध्यापकांनी प्रमाणित करुन देणे.

८) विद्यार्थ्यांनी शैक्षणिक साहित्य १ महिन्यांत खरेदी कराव्यात व खरेदी केलेल्या साहित्याच्या मुळ पावत्या जमा करण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील याबाबत सर्व संबंधिताना कळविणे.

अटी व शर्ती :-

१) लाभार्थ्यांचे (विद्यार्थी) बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न (Aadhaar Seeded) असणे आवश्यक आहे.

२) एका विद्यार्थ्यांस एका शैक्षणिक वर्षात एकदाच अनुदान देण्यात येईल.

३) विद्यार्थीला शाळेत नियमित उपस्थिती ठेवणे आवश्यक राहील.

४) लाभार्थ्यांनी (विद्यार्थी) अनुदानाचा वापर केवळ शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी करणे बंधनकारक राहील.

५) महानगरपालिका वेळोवेळी जारी करेल त्या सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

६) खरेदी पुरावे (बिल/रसीद) सादर करणे बंधनकारक राहील (याबाबतची जबाबदारी मुख्यध्यापक यांची राहील)

याकामी सन २०२६-२७ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पात शालेय विद्यार्थी व अंगणवाडीतील मुलांसाठी साहित्य वाटप या लेखाशिर्षातर्गत लेखा सांकेतांक ७२२-२७४९ अन्वये रु.३,००,००,०००/- इतकी तरतुद करण्यांत आलेली असुन यामधुन याकामी होणारा खर्च भागविण्यात येईल.

तरी यानुसार जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थांसाठी शैक्षणिक साहित्याकरिता वरीलप्रमाणे नमूद तक्तातील स्तंभ ४ नुसार निधी थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे विद्यार्थ्यांना देण्याकामी व याकामी येणाऱ्या अंदाजे **रु.२,००,००,०००/-** (अक्षरी दोन कोटी रुपये मात्र) इतका खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेची आवश्यकता असल्याने सदरचा विषय मा.महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

ठराव :- सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याकरिता निधी थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे देण्याबाबतच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली असून जिल्हा परिषदेच्या एकूण ११६ शाळांच्या विद्यार्थ्यांच्या याद्या (ज्या मध्ये खाते क्र.व इतर आवश्यक बाबी नमुद आहे) या याद्या संबंधीत मुख्याध्यापकांनी सही शिक्यानीशी प्रमाणीत करून लेखी मागणी केल्या नंतर सदर विद्यार्थ्यांना खालील तक्त्यात नमूद निधी ची रक्कम थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे अदा करणेसाठी अशा सर्व विद्यार्थ्यांनी खालील नमूद केलेल्या

तक्त्या नूसार शैक्षणिक साहित्य हे शाळा सूरू झाल्या नंतर १ महिन्यांत खरेदी करून खरेदी केलेल्या साहित्याच्या मुळ पावत्या (जि.एस.टी. सह) मुख्याध्यापकांनी जमा करुन या कार्यालयाकडे सादर करण्याच्या अटीवर देण्याकामीची कार्यवाही करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे **रु.२,००,००,०००/-** (अक्षरी दोन कोटी रुपये मात्र) इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

अ. क्र.	**तपशिल**	**विद्यार्थी संख्या**	**प्रती विद्यार्थी द्यावयाचे अनुदान (सन २०२५-२६ मध्ये निश्चीत केलेले दर)**
१	२	३	४
१)	इ.१ ली ते ४ थी (दप्तर, पेन्सील बॉक्स, ड्रॉईंग बुक, कलर पेटी,वही ८० पृष्ठ व १७६ पृष्ठ)	११८९२	रु.७४७/-
२)	इ.५वी ते ७ वी (दप्तर, पेन्सील बॉक्स, ड्रॉईंग बुक, वॉटर कलर,कंपास बॉक्स,वही ८० पृष्ठ व १७६ पृष्ठ)	६८७०	रु.९६३/-
३)	इ.८ वी ते १० वी (दप्तर, पेन्सील बॉक्स, ड्रॉईंग बुक, वॉटर कलर,कंपास बॉक्स,वही ८० पृष्ठ व १७६ पृष्ठ)	१८६२	रु.९८९/-

सूचकाचे नाव :- प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव :- मनोज पाटील

अनूकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या ---------- तटस्थ संख्या----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजुर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

.....

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ९ **सभा सुचना क्र. ७** **दिनांक : ३०/०४/२०२६**

विषय :- बायो-मायनिंग व प्रक्रिया कामासाठी "प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार" म्हणून मे.ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांची नियुकी करण्यास व येणाऱ्या खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात साठलेल्या जुन्या कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने बायो-मायनिंग व प्रोसेसिंग करणे पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेतील क्षेपण भुमी गोखिवरे सर्वे क्र. ३० अ, ३१ व ३२ येथे स्थित असून क्षेपण भुमीचे एकुण क्षेत्रफळ १९.३३ हेक्टर इतक्या आहे. त्यापैकी व्यापलेल्या कचऱ्याचे क्षेत्रफळ सुमारे १७ एकर इतके आहे. जुना व दैनंदिन निर्मित कचऱ्याची विल्हेवाट लावणे कामी डिझाइंन ,बिल्ड, फाइनान्स , ऑपरेट व ट्रान्सफर (DBFOT) तत्वावरील कामास मे. साई युटीलिटी कॉन्ट्रक्टर्स प्रा.लि. यांची दि. १५/१२/२०२३ रोजी नियुक्ती करण्यात आली आहे. सदर कामात पडून असलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे कामी दोन वर्षाच्या कालावधी देण्यात आला आहे. तसेच दैनंदिन कचऱ्यावर प्रक्रिया करणे कामी २० वर्षाच्या कालावधी देण्यात आला आहे. प्रकल्पासाठी पूर्वी नियुक्त केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा. लि. संस्थेची सेवा तांत्रिक कारणास्तव खंडित करण्यात आलेली आहे. प्रकल्पाचे उर्वरित काम वेळेत आणि तांत्रिक निकषांनुसार पूर्ण करण्यासाठी नवीन सक्षम सल्लागार संस्थेची नियुक्ती करणे प्रस्तावित आहे.

सदर प्रकल्प सध्या प्रगतीपथावर असून, पूर्वीच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सोडलेले उर्वरित काम, गुणवत्ता नियंत्रण आणि देयकांची पडताळणी करण्यासाठी तांत्रिक मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. मे. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट या संस्थेने सदर प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून काम करण्याची तयारी दर्शविली आहे. मे. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट ही संस्था सन १९२६ पासून कार्यरत असलेली शासन मान्य निम-शासकीय संस्था असून, त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थां सोबत घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रात कामकरण्याचा प्रदीर्घ अनुभव आहे.

सदर संस्था केंद्र सरकारच्या 'स्वच्छ भारत मिशन' आणि राज्य शासनाच्या नगरविकास विभागाच्या पॅनेलवर आहे. शासन निर्णय दिनांक ०४/०६/२०१८ मधील तरतुदीं नुसार, अशा प्रकारच्या कामांसाठी तांत्रिक सल्लागार नियुक्त करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थेस विहित करण्यात आले आहेत. त्यानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी बायोमायनिंग व प्रक्रिया करणे कामासाठी खालीलप्रमाणे कामं करणे अपेक्षित आहे.

अ) बायो-मायनिंग आणि प्रक्रिया करणेसाठी तांत्रिक देखरेख व संनियंत्रण करणे.

ब) प्रकल्पाच्या उर्वरित कामाचा सविस्तर आढावा घेऊन अंमलबजावणीवर नियंत्रण ठेवणे.

क) कंत्राटदाराने केलेल्या कामाची गुणवत्ता तपासणे आणि तांत्रिक अहवाल सादर करणे.

ड) शासन निर्णयातील निकषांनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून सर्व जबाबदाऱ्या पार पाडणे.

महाराष्ट्रशासन, नगरविकासविभाग, शासननिर्णयक्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५४/नवि-१६ दि. ०४/०६/२०१८ अन्वये राज्यातील सर्व स्थानीक स्वराज्य संस्थांनी विविध प्रकल्पांचे/कामांचे डीपीआर तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यासाठी शुल्काचे अधिकतम दर व टप्पे विहीत करण्याचा तसेच त्याच्या प्रदानाबाबत मार्गर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क प्रदान करण्याबाबतचे टप्पे खालील प्रमाणे विहीत करण्यात आले आहेत.

अ.क्र.	प्रकल्पाच्या/कामाच्या प्रगतीचे टप्पा	नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात)	
		महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रकल्पांसाठी	इतर सर्व कामांसाठी
१.	प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर	०.७५ % (डीपीआर ०.५० % + प्र. मा. ०.२५ %)	०.५० % (डीपीआर ०.३३ % + प्र. मा. ०.१७ %)
२.	प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर	०.२५ %	०.१६ %
३.	प्रकल्पाचे २५ टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.४० %	०.२७ %
४.	प्रकल्पाचे ५० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.४० %	०.२७ %
५.	प्रकल्पाचे ७५ टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.६० %	०.४० %
६.	प्रकल्पाचे १०० टक्के कामपूर्ण झाल्यानंतर	०.६० %	०.४० %
एकुण		**३.०० %**	**२.०० %**

सद्यस्थितीत गोखिवरे क्षेपण भुमीवर बायो मायनिंग व प्रक्रिया करणेकामाचा प्रकल्प अहवाल मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा. लि. यांनी तयार केले असून त्यांची सेवा खंडीत झाल्यामुळे पुढील प्रकल्पाच्या कामा करिता दि. ०४/०६/२०१८ च्या शासन निर्णयातील कामाच्या प्रगतीच्या टप्प्यानुसार व निश्चित असलेल्या दरानुसार मे. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांची प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून नेमणूक करणे योग्यआहे. सदर नेमणूकीस व खर्चास मा. सर्वसाधारण सभेच्या मान्येतेची आवश्यकताआहे.

तरी वसई विरार शहर कार्यक्षेत्रातील गोखिवरे क्षेपण भुमीवर बायो मायनिंग व प्रक्रिया करणे कामाकरिता प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून मे. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांची नेमणूक करण्यास व दि. ०४/०६/२०१८ च्या शासन निर्णयातील भौतिक प्रगती प्रमाणे मंजुर दरानुसार त्यांचे सोबत गोखिवरे क्षेपण भुमीवर बायो मायनिंग व प्रक्रिया करणेच्या कामासाठी संविदा करणेस व या कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देणेसाठी विषय मा.महासभेपुढे ठेवण्यास शिफारस आहे.

ठराव / निर्णय :- विभागाने प्रस्तावित केल्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या बायो-मायनिंग व प्रक्रिया कामासाठी तसेच भविष्यात घनकचरा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून मे.ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांची नेमणूक करणेस प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे व शासन निर्णय दि. ०४/०६/२०१८ अन्वये निश्चित केलेल्या दरानुसार त्यांच्या सोबत कामाची संविदा करण्यास तसेच त्यांना या कामी कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - प्रविण शेट्टी

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुतांने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १० **सभा सुचना क्र. ७** **दिनांक : ३०/०४/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेरा कचरामुक्त शहर (GFC) '3' तारांकित मानांकन (Star Raing) चे प्रमाणिकरण (Certification) करणेकरिता मा. सर्वसाधारण सभेपुढे प्राथमिक प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

देशात स्वच्छ भारत अभियान २.० ची अंमलबजावणी सुरु आहे. या अभियांनातर्गत शहरे "हागणदारी मुक्त" करणे व "शहर स्वच्छ" करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे. शहर कचरा मुक्त करण्या करिता स्वच्छते मध्ये क्रमा क्रमाने आणखी सुधारणा होण्यास्तव शहरांना तारांकित मानांकन (Star Rating) देण्याबाबतची नियमावली गृह निर्माण व शहरी कार्यमंत्रालय केंद्रशासना मार्फत तयार करण्यात आली आहे. त्यांची अंमलबजावणी करणे महानगरपालिकेस बंधनकारक असुन शहर कचरा मुक्त करुन त्यानुसार तारांकितमानांकनठरविणेगरजेचेआहे. कचरामुक्त (Garbage Free City - GFC) यातारांकित मानांकना अंतर्गत एकुण चार स्थरीय (१, ३, ५ व ७ Star) याप्रमाणे शहरांचे मुल्यांकन केले जाते. सदरमानांकन हे शहरांच्या गुणवत्तेवर आधारीत असते. तसेच केंद्र शासना मार्फत सदर दर्जा प्राप्त करणे आवश्यक आहे.

कचरामुक्त शहर (GFC) '३' तारांकित मानांकनासाठी : कचरामुक्त शहरांचे नियमावलीतील खालील बाबीनुसार तारांकित मानांकन ठरविताना विचारात घेतली जाणारी व वसई-विरार शहरमहानगरपालिकेद्वारा पूर्ण करण्यात आलेले बाबी पुढील प्रमाणे आहेत.

- घरोघर जाऊन कचरा संकलन करणे.
- निर्मितीच्या जागीच कचऱ्याचे विलगीकरण करणे.
- सार्वजनिक, वाणिज्य व रहिवासी भागातील साफ-सफाई करणे तसेच मलनि:सारण व नदी - नाल्यांचे पृष्ठभाग स्वच्छ करणे.
- सार्वजनिक ठिकाणी ५२ लिटर क्षमतेचे किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेचे कचरा कुंडी (Litter Bins)ची उपलब्धता.
- १०० किलोपेक्षा जास्त घाऊक कचरा निर्माण करणा-या संस्थामार्फत कच-यावर जागीच प्रक्रिया करणे.
- कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रीया करणे, शास्त्रोक्त पध्दतीने क्षेपण भुमी तयार करणे.
  बांधकाम निष्कासनातून निर्माण होणारा कचरा हा बांधकाम कचरा संकलन केंद्रावर टाकणे व पूर्नवापर करणे.
- घनकचरा व बांधकामाचा कचरा संकलन करण्याकरिता उपयोग कर्ता शुल्क (User Charges) आकारणे.
- अस्वच्छतेबाबत दंड आकारणे तसेच प्लॅस्टिक बंदीची अंमलबजावणी करणे व नियमांचे उल्लघंन केल्यांस दंड आकारणे.
- नागरीकांच्या समस्यांचे निराकरण करणे व अभिप्राय प्राप्त करणे.
- कचऱ्याच्या ढीगांचे निर्मुलन करणे.
- शहरांतील गटारांची व नैसर्गिक जलसाठ्यांची स्वच्छता करणे.
- क्षेपण भूमीवरील पडून असलेल्या जुन्या 'Legacy' कचऱ्यावर प्रक्रिया करणे.
- शहर सौदर्यी करण करणे.

शहराच्या तारांकित मानांकनावरून केंद्र व राज्य शासनाद्वारे विविध योजने अंतर्गत कचरा व्यवस्थापन व स्वच्छतेवर आधारीत प्रकल्पांकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी उपलब्ध करण्यात येतो. या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेस तारांकित मानांकन प्राप्त करणे आवश्यक आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५ करिता वसई विरार शहरास कचरा मुक्त शहर (GFC) '३' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) करण्याकरिता प्राथमिक प्रशासकिय ठराव घेणे आवश्यक आहे. सदर ठरावानुसार जाहीर आवाहनाला किमान २ वृत्तपत्रात व इतर प्रसिध्दी माध्यमावर व्यापक प्रसिध्दी देणे व तदनंतर त्यावर नागरीकांच्या हरकती/ सुचना मागविणे आवश्यक आहे. नागरिकांच्या हरकती/ सुचना प्राप्त झाल्यानंतर अंतिम ठराव

पारीत करुन राज्य व केंद्रशासनास घोषणापत्र (Declaration) सादर करणेबाबत Garbage Free City Star Rating २०२४ च्या Toolkit अन्वये सुचना प्राप्त आहेत.

त्या अनुषंगाने सर्व प्रभाग लोकप्रतिनीधी व नागरीक/ संस्था यांचेकडून घोषणापत्र प्राप्त करून घेण्यात आलेले असून त्या घोषणापत्राच्या आधारावर स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२५ करिता महानगरपालिकेस कचरा मुक्त शहर (GFC) '३' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) करणे व सदर प्रस्ताव मंजूर करून नागरीकांच्या हरकती व सूचना प्राप्त करणेसाठी २ स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्धी देणेस आवश्यक आहे.

तरी, महानगरपालिकेस कचरा मुक्त शहर (GFC) '३' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) करणे व सदर प्रस्ताव मंजूर करून नागरीकांच्या हरकती व सूचना प्राप्त करणेसाठी २ स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्धी देणेस प्रशासकिय मान्यता मिळणेस सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे प्राथमिक मंजूरी मिळणेस पुढील ठराव करणेत येत आहे.

ठराव / निर्णय :- महानगरपालिकेस कचरा मुक्त शहर (GFC) '३' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) करणे व सदर प्रस्ताव मंजूर करून नागरीकांच्या हरकती व सूचना प्राप्त करणेसाठी २ स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्धी देणेस मा. सर्वसाधारण सभा प्राथमिक प्रशासकिय मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - मनोज परील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ११ **सभा सुचना क्र. ७** **दिनांक : ३०/०४/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात ओसी/सीसी नसलेल्या इमारतीमध्ये उभारण्यात आलेल्या रुग्णालयांबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

वैद्यकिय आरोग्य विभागाची स्थापना सन २०११ पासून सुरु झाली. त्यावेळी मा. सर्वसाधारण ठराव क्र. ५ दिनांक १९/०१/२०११ नुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व रुग्णालये, शुश्रूषागृहे यांची नोंदणी व नोंदणी नुतनीकरण वैद्यकीय आरोग्य विभागाकडून केली जाते. महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी अधिनियम, १९४९ अन्वये महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नर्सिंग होमची नोंदणी करणेकरिता वैद्यकीय आरोग्य अधिकारी हे स्थानिक पर्यवेक्षीय प्राधिकारी (Local Supervisory Authority) आहेत. बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन रुल्स् २००६ अन्वये रुग्णालये, शुश्रूषागृहे यांचेबाबत तसेच रुग्ण व रुग्णालयाचे मालक, ग्राहक आणि नागरीकांकडून येणाऱ्या तक्रारींचे निवारण करणेकरिता महानगरपालिका स्तरावर नर्सिंग होम रजिस्ट्रेशन बोर्डची स्थापना करण्यात आली होती. सदर नर्सिंग होम रजिस्ट्रेशन बोर्डच्या दिनांक ०३/०६/२०१७ रोजी घेण्यात आलेल्या सभेच्या इतिवृत्तानुसार रुग्णालय नोंदणी व नोंदणी नुतनीकरणाकरिता खालील नमुद कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक राहील असे धोरण निश्चित करण्यात आले होते.

१. Doctor's Qualification & Reg. Certificate.
२. RMO Qualification & Reg. Certificate.
३. Matron Qualification & Reg. Certificate (Bsc. Nursing)
४. Nursing Staff Qualification & Reg. Certificate. (GNM/ANM)
५. MPCB Authorization Certificate.
६. Bio-Medical Waste disposal subscription Certificate.
७. Housing Society NOC/ Builder's NOC.
८. Details of Facilities.
९. No. Of Beds & Demarcations-Area of every ward, OT, Office accommodation etc.,in sq. ft.
१०. Address proof of Hospital.
११. NOC From Fire Department.
१२. Structural Audit Report of Hospital Premises.
१३. Property Tax Paid Receipt.
१४. २ photo's of Owner of Hospital.

उपरोक्त कागदपत्रां व्यतिरिक्त महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम, २०२१ मधील पृष्ट क्र. ६ वर 'संपूर्ण बांधकाम विद्युत लेखापरीक्षण आणि अग्निसुरक्षाविषयक सर्व निकष पूर्ण करणारे तथा आवश्यक अग्निसुरक्षा उपकरणासह परिपूर्ण असेल' असे नमुद केले प्रमाणे रुग्णालय नोंदणी व नोंदणी नुतनीकरणाकरिता Electric Audit Report बंधनकारक करण्यात आले होते. सन २०२५ पर्यंत नमुद १ ते १४ आणि Electric Audit Report ही कागदपत्रे बंधनकारक केल्यानुसार जे रुग्णालय वरील सर्व कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर रुग्णालयांना वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत नवीन नोंदणी व नुतनीकरण देण्यात येत होते.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १७ डिसेंबर २०२४ रोजीच्या निर्णयानुसार इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच मा. सहसंचालक, आरोग्य सेवा,रुग्णालये (राज्यस्तर) मुंबई यांचेकडील पत्र क्र.आसेआ/कक्ष-३/टे-११ /मुंनहोम/ऑनलाईन /नोंदणी/जा.क्र.५७६५-७०/२५ दिनांक ०९/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ०७ एप्रिल, २०२५ जागतिक आरोग्य दिनापासून राज्यातील सर्व खाजगी नर्सिंग

होम्सची नोंदणी व पुर्ननोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देणे बंधनकारक करण्यात आले आहे. परंतू महानगरपालिका कार्यक्षेत्रात बहूतांश रुग्णालये ही ग्रापंचायत/नगरपरिषद काळातील आहेत व ते शहरांतील नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा देत आहेत.

अशा रुग्णालयांच्या नोंदणी/ नोंदणी नुतनीकरणाकरिता मार्गदर्शन मिळणेकरिता मा.सह संचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर) मुंबई यांना पत्र देणेबाबत सुचना देण्यात आल्या होत्या आणि सदर पत्राच्या अधीन राहून अर्ज सादर केलेल्या रुग्णालयांना नोंदणी/ नोंदणी नुतनीकरण देणेबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. यानुसार जावक क्र. वविशम/वैआवि/९६/२०२५ दि.०७/०४/२०२५ च्या पत्रान्वये मा.सह संचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर) मुंबई विनंती करण्यात आली आहे.

रुग्णालयांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने सुरु असल्याने दिनांक ०९/०४/२०२५ रोजी पूर्वी नोंदणी/ नोंदणी नुतनीकरणाकरिता सादर करण्यात आलेले अर्ज प्रलंबित आहेत. यामध्ये रुग्णालयांकडे Commencement Certificate, नगरपरिषदेकडील बांधकाम परवानगी/नाहरकत दाखला तसेच ग्रामपंचायतीकडील बांधकाम परवानगी/नाहरकत दाखला अशी कागदपत्रे उपलब्ध आहेत. तर काही रुग्णालयांके इमारत बांधकामाबाबत कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. यापैकी काही रुग्णालये साधारणत: २० ते २५ वर्षापासून सुरु आहेत. दिनांक ०७ एप्रिल, २०२५ पासून लागू झालेल्या निर्णयामुळे काही रुग्णालयांना नुतनीकरण न मिळाल्यामुळे सद्यस्थितीत ते परवानगी विना सुरु आहेत.

मा. सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे कडील दि.०२/०७/२०२५ रोजीच्या पत्रामध्ये 'ज्या रुग्णालयांना भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) नाही. अशा रुग्णालयांना नोंदणी/नोंदणी नुतनीकरण देता येईल किंवा कसे याबाबत बॉम्बे नर्सिंग होम्स ॲक्ट,१९४९ मध्ये सुधारणा करणे संदर्भात प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून, शासन स्तरावर याबाबत निर्णय घेणे प्रलंबित असल्याने, आपल्या कार्यक्षेत्रातील रुग्णालयांना नोंदणी व नोंदणी नुतनीकरण देताना सद्यस्थितीत बॉम्बे निर्सग होम्स ॲक्ट सुधारित २०१३ व महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी सुधारित अधिनियम, २०२१ नुसार कार्यवाही करण्यात यावी 'असे नमुद केले आहे.

त्यानंतर दिनांक १५/०७/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. आयुक्त महोदय यांचे बैठक कक्षात मा.श्री. हेमंत सावरा, खासदार, पालघर लोकसभा आणि विरार, नालासोपारा असोसिएशनचे काही डॉक्टर्स यांची बैठक झाली. सदर बैठकीमध्ये रुग्णालय इमारती आणि सोसायटी कडील नाहरकत दाखला याबाबतच्या अडचणी मा. आयुक्त महोदय आणि मा. आमदार महोदय यांचे समोर मांडण्यात आल्या. यामध्ये दिनांक ०९/०४/२०२५ पूर्वी नोंदणी/ नोंदणी नुतनीकरणाकरिता अर्ज सादर केलेले ज्या रुग्णालयांकडे इमारत बांधकामाबाबत ग्रामपंचायत/ नगर परिषदे कडील नाहरकत दाखला/ परवाना तसेच सी.सी. असतील अशा रुग्णालयांना मा.सह संचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर) मुंबई यांना पाठविण्यात आलेल्या पत्राच्या अधीन राहून नोंदणी / नोंदणी नुतनीकरण देता येईल असे ठरविण्यात आले.

तदनंतर मा. आयुक्त सो, यांची बदली झाल्याने नवीन मा. आयुक्त सो. यांनी सदरचा प्रस्ताव नव्याने बनवून आणणेकरिता सांगितल्या प्रमाणे दिनांक १६/०९/२०२५ रोजी पासून कार्यवाही सुरु होती. नोंदणी नुतनीकरणाकरिता प्रलंबित रुग्णालयात रुग्ण दाखल केल्यास आणि सदर रुग्णांबाबत अनपेक्षित घटना घडल्यास तसेच रुग्णालय इमारतीबाबत एखादी दुघर्टना घडल्यास अडचणी निर्माण होऊ शकतात. याकरिता प्रलंबित रुग्णालयाच्या नोंदणी नुतनीकरणाबाबत योग्य निर्णय होणे आवश्यक आहे असे वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचे म्हणणे होते. त्यानुसार मा. आयुक्त सो. श्री मनोजकुमार सुर्यवंशी यांचे मा. आयुक्त, आरोग्य सेवा यांचेशी दुरध्वनीवरुन झालेल्या चर्चेनुसार मा. न्यायालयाचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितल्याने सदरचा निर्णय प्रलंबित राहिला होता.

प्रलंबित निर्णयामुळे शहरांतील OC नसलेले रुग्णालये ही विना नुतनीकरण सुरु आहेत. सद्यस्थितीत महानगरपालिका/ नगरपरिषद/ ग्रामपंचायत कडील ना हरकत दाखल्या बाबतची माहिती खालीलप्रमाणे:-

१. महानगरपालिका OC :- १४४
२. नगरपरिषद कडील NOC :- ६७
३. ग्रामपंचायत कडील NOC:- २७
४. ग्रामपंचायत काळातील कोणतेही कागदपत्रे आढळत नाही :- ४७
५. इतर :- ३९

तरी ते भविष्यात अडचण/धोकादायक होऊ शकते. त्यामुळे ज्या पदधतीने हया अगोदर नर्सिंग होम रजिस्ट्रेशन बोर्डच्या दिनांक ०३/०६/२०१७ रोजी घेण्यात आलेल्या सभेच्या इतिवृत्तानुसार महानगरपालिकेने निश्चित केलेल्या धोरणानुसार नमुद १ ते १४ आणि Electric Audit Report तसेच Structural Audit (पक्के बांधकाम) बंधनकारक केलेल्या कागदपत्रानुसार रुग्णालयाचे नुतनीकरण करण्यात यावे किंवा कसे? तसेच शासनाने नव्याने लागू केलेल्या नियमानुसार नवीन रुग्णालयांना इमारतच्या OC शिवाय नवीन नोंदणी दिली जाणार नाही. या दोन्ही धोरणात्मक निर्णयास्तव मा.सर्व साधारण सभेपुढे सादर करणे शिफारस आहे.

ठराव / निर्णय :- मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १७ डिसेंबर २०२४ रोजीच्या निर्णयानुसार इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच याबाबत महाराष्ट्र शासनाने २०२५ मध्ये आदेश निर्गमित करण्यात आलेनुसार सदर निर्णयापूर्वी जे रुग्णालयांना यापूर्वी नोंदणी देण्यात आली आहे आणि जी रुग्णालये नर्सिंग होम रजिस्ट्रेशन बोर्डच्या दिनांक ०३/०६/२०१७ रोजी घेण्यात आलेल्या सभेच्या इतिवृत्तानुसार महानगरपालिकेने निश्चित केलेल्या धोरणानुसार नमुद १ ते १४ आणि Electric Audit Report तसेच Structural Audit (पक्के बांधकाम) ही कागदपत्रांचे पूर्तता करित असतील अशा रुग्णालयांना नोंदणी नुतनीकरण देणेस तसेच नवीन नोंदणीकरिता येणाऱ्या रुग्णालयांना हे नियम लागू होणार नाही. नवीन रुग्णालयांस नवीन नियमाप्रमाणेच नोंदणी देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुतानें~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२ **सभा सुचना क्र. ७** **दिनांक : ३०/०४/२०२६**

विषय : - वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) मध्ये नाना नानी पार्क ते आकांशा कॉमलेक्स फेस-२ पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा आर. सी. सी. गटार बांधणे तसेच रस्त्याची उंची वाढवून खडीकरण व डांबरीकरण करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

कामाची आवश्यकता :- नालासोपारा पूर्वेकडील तुळींज, आचोळे, डॉन लेन, सनशाईन इ. ठिकाणच्या सांडपाण्याचा / पावसाळी पाण्याचा निचरा आचोळे मुख्य रस्ता ते आकांक्षा कॉम्प्लेक्स अस्तित्वातील गटारामार्गे रेल्वे समांतर नाल्यात होतो. तथापि, मागील काही वर्षात परिसरातील लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढली असून सदर गटार जुने झाले असल्याने सांडपाण्याचा/ पावसाळी पाण्याचा निचरा जलदगतीने होण्याचा दृष्टीने अपूरे पडत आहे.

सदर गटाराच्या नाना नानी पार्क ते आकांक्षा कॉम्प्लेक्स फेस-२ या भागात सन २०२५ च्या पावसाळया दरम्यान मोठया प्रमाणात पाणी रस्त्यावर तसेच इमारतीभोवती साचले होते.त्यामुळे स्थानिक नागरीकांची मोठया प्रमाणावर गैरसोय झाली होती. नाना नानी पार्क ते आकांक्षा कॉम्प्लेक्स फेस-२ या भागात रस्त्याच्या एका बाजूला जुने पाईप गटार असुन सांडपाण्याचा/ पावसाळी पाण्याचा निचरा जलदगतीने होण्याच्या दृष्टीने रस्त्याच्या दोन्ही बाजूला जास्त खोलीचे आर.सी.सी.गटार बांधणे गरजेचे आहे..

तसेच सागर स्वीट्स ते आकांक्षा कॉम्प्लेक्स फेस-२पर्यंत अस्तित्वातील डांबरी रस्ता असुन तलाठी ऑफिस,नालासोपारा रेल्वे स्टेशन कडे जाण्यासाठी या रस्त्याचा वापर संपुर्ण शहरातील नागरिक करतात.त्यामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची तसेच पादचाऱ्यांची वर्दळ असते.

सदर रस्त्याच्या नाना नानी पार्क ते आकांक्षा कॉम्प्लेक्स फेस-२या भागात रस्त्याची पातळी हि आजूबाजूच्या रस्त्यांपेक्षाखालीअसल्यानेपावसाळ्यात पाणी साचून सदर रस्ता वारंवार खराब होतो .सन२०२५ च्या पावसाळ्यात या भागात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते.त्यामुळे नागरिकांची खूप गैरसोय झाली होती.तरी सदर रस्त्याची उंची वाढवून खडीकरण व डांबरीकरण करणे गरजेचे आहे.

त्याअनुषंगाने नकाशे व अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे आवश्यक आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रू. ३,८७,१३,००६/-

कामाचे स्वरुप :- **अंतर्भूत कामे- आर.सी.सी.गटार-** खोदाई, सोलींग, पीसीसी, आर.सी.सी. राफ्ट, आर.सी.सी. परदी, आर.सी.सी. स्लॅब, स्टील, एम.एस.चेंबर कव्हर्स, इ.

परिमाण – गटाराची एकुण लांबी –४७०मी., रूंदी – १.८० मी., खोली – १.७० मी.

अंतर्भूत कामे-रस्ता- खडीकरण-जी.एस.बी. ग्रेडिंग-१, ग्रेडिंग-२,वेट मिक्स, एम.पी.एम.,टॅककोट,डी.बी.एम.,बी.सी.ई.
परिमाण –१)लांबी – २३५मी.,रूंदी – ८.००मी.,

या पूर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- यापूर्वी सदर ठिकाणी मागील ३ वर्षात कुठल्याही प्रकारचे काम झालेले नाही.

अर्थसंकल्पीय तरतूद :- लेखाशिर्ष - १.गटार बांधणे २.रस्ता बांधकामे

स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. अ.क्र. वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (अ) नुसार मा. महासभे समोर प्रशासकीय व वित्तीय मान्यते स्तव सविनय सादर.

ठराव/ निर्णय :- वरील प्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रू.३,८७,१३,००६/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा आर्थिक, प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. सदर कामी शासनाकडुन अनुदान/ निधी उपलब्ध झाल्यास सदरच्या निधीतुन कामकरणेस प्रशासकीय वित्तीय मान्यता देणेत येत आहे. अनुदान/ निधी उपलब्ध न झाल्यास महानगरपालिका निधीतुन सदरचे काम करणेस मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस, तसेच त्या कामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चासही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

सुचकाचे नांव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - Dpl मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराय/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~.

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३ **सभा सुचना क्र. ७** **दिनांक : ३०/०४/२०२६**

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा स्टेशन रस्त्यालगत गोकुळ अपा. ते के. एम. अपा पर्यंत आर. सी.सी. गटार बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विचार-विनिमय करून निर्णय घेणे.

कामाची आवश्यकता	:-	वसई- विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा स्टेशन रस्त्या लगत रेल्वे स्टेशन जवळ गोकुळ अपा. ते के.एम.अपा. पर्यंत जुने आर.सी.सी. गटार अस्तित्वात आहे. सदर गटारास आचोळे मुख्य रस्ता सागर स्वीट्स, बोरी कॉलनी, संगम मेडिकल मार्गे येणारी प्रमुख गटारे जोडण्यात आली असुन या सर्व परिसरातील सांडपाण्याचा / पावसाळी पाण्याचा निचरा या गटारात व पुढे रेल्वे समांतर नाल्यात होत असतो. तथापि सदर गटाराची रुंदी व खोली कमी असल्याने सांडपाण्याचा / पावसाळी पाण्याचा निचरा जलद गतीने होण्याच्या दृष्टीने अपूरे पडत आहे. त्यामुळे सन २०२५ च्या पावसाळयात पाण्याचा निचरा जलद गतीने न झाल्याने संपूर्ण परिसरात रस्त्यावर व इमारतीं भोवती मोठया प्रमाणावर पाणी साचले होते. त्यामुळे नागरीकांची गैरसोय झाली होती. ही वस्तुस्थिती लक्षात घेता सदर गटाराची रूंदी तसेच खोली वाढविणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने नकाशे व अंदाज पत्रक तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे आवश्यक आहे.
अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रू. १,६९,९१,४२१/-
कामाचे स्वरुप	:-	अंतर्भूतकामे - खोदाई, सोलींग, पीसीसी, आर.सी.सी. राफ्ट, आर.सी.सी. परदी, आर.सी.सी. स्लॅब, स्टील, एम.एस.चेंबरकव्हर्सइ. परिमाण – गटाराचीलांबी – २३० मी.,रूंदी – २.६० मी.,खोली – १.९० मी.
यापूर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल	:-	यापूर्वी सदर ठिकाणी मागील ३ वर्षात कुठल्याही प्रकारचे काम झालेले नाही.

अर्थसंकल्पीय तरतूद अ) लेखाशिर्ष - गटारबांधणे

स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. अ.क्र. वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (अ) वुसार मा. महासभेसमोर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव/ निर्णय :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रु. १,६९,९१,४२१/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा आर्थिक, प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. सदर कामी शासनाकडुन अनुदान/ निधी उपलब्ध झाल्यास सदरच्या निधीतून काम करणेस प्रशासकीय वित्तीय मान्यता देणेत येत आहे. अनुदान / निधी उपलब्ध न झाल्यास महानगरपालिका निधीतुन सदरचे काम करणेस मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी येवून निविदेची कार्यवाही करणेस, तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

सुचकाचे नांव - प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव - Pat मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १४ **सभा सुचना क्र. ७** **दिनांक : ३०/०४/२०२६**

विषय :- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 33 व अन्वये विरार येथील हायस्पीड रेल्वे स्थानक क्षेत्रात स्थानिक क्षेत्र योजना (Local Area Plan) तयार करणेकामी इरादा प्रसिध्द करण्याबाबत. (दि. 23/04/2026 रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेतील स्थगित विषय)

वसई-विरार उपप्रदेशाची विकास नियंत्रण नियमावली-२००१. राज्य शासनाने नगरविकास विभाग अधिसूचना टीपीएस/१२०/१८१३/सीआर-४८/२००२/नवी-१२, दि. १६/०२/२००४ अन्वये एम-१ ते एम-१४ या बदलासहित तसेच ईपी-१ ते ईपी-७ यामधील नियम वगळून मंजूर केलेली असून ती दि. ०१/०३/२००४ पासून अंमलात आलेली आहे. राज्य शासनाने त्यानंतर नगरविकास विभाग अधिसूचना क्र. टीपीएस/१२०/१८१३/सीआर-४८/२००२/नबी-१२, दि. ३०/११/२००५ अन्वये ईपी-१ ते ईपी-७यामधील वगळलेले नियम मंजूर केले असून ते दि. १८/०१/२००६ पासून अंमलात आलेले आहेत.

वसई विरार उपप्रदेशाची शहर विकास योजना (आराखडा) शासन निर्णय क्र. टि.पी.एस. १२०१/१५४८/ सी.आर-२३४ (सी) दि. ०९/०२/२००७ अन्वये भागशः मंजुर केली असून ती दि. १५/०३/२००७, पासून अंमलात आलेली आहे. (११३ ई.पी वगळून त्यापैकी ३५ ई.पी शासनाने नंतर मंजुर केलेल्या आहेत.) तसेच वसई-विरार उपप्रदेशातील एकुण क्षेत्रापैकी ४ तत्कालीन नगरपालिका (वसई, नवधर-माणिकपूर, नालासोपारा व विरार) व ५३ गावांसह शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. २३०६ /४१२/प्र.क्र/२२३/२००६/युडी-२४, दि. ०३/०७/२००९ अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिका अस्तित्वात आलेली असून नगरविकास विभाग निर्णय क्र.टि.पी.एस. १२०९/२४२९/सी. आर-२६२/यूडी-१२ दि.०७/०७/२०१० नुसार या महानगरपालिकेला महानगरपालिका क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार प्रदान केलेले आहेत. तेव्हा पासून वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यरत असून त्याप्रमाणे कामकाज करीत आहे.

ज्याअर्थी वसई विरार उपप्रदेशाच्या मंजुर विकास आराखड्यामध्ये मुंबई अहमदाबाद हायस्पीड रेल्वेची अलाईनमेंट विरार रेल्वे स्थानकाचा परिसर आणि डीपी रोड (Alignment of Mumbai Ahmedabad High speed Rail Station Area at Virar & DP Road) चे समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ Act १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये केलेल्या कार्यवाही शासनाने. नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस- १२२१/६०४/प्र.क्र १२४/२२/नवि- १२ दि- ०७/०४/२०२५ च्या अधिसूचनेनुसार भागाशः मान्यता दिली आहे (शासनाच्या दि.०७/०४/२०२५ व टिपीएस १२२९/६०४/प्रक्र-१२४/२२/नवि-१२ रोजीचे पत्रा प्रमाणे)

तसेच विरार हायस्पीड रेल्वे स्थानक हे चार स्थानकापैकी एक आहे जे (SAD) स्टेशन क्षेत्र विकासासाठी Japan International Corporation Agency (JICA) सोबतच्या Project (SMART) अंतर्गत निवडले गेले आहे. मुंबई अहमदाबाद हाय स्पीड रेल्वे प्रकल्पाच्या रेल्वे स्थानक क्षेत्र नियोजनाकरीता भारत सरकाराच्या आवासन आणि शहरी कार्य मंत्रालय (Ministry of Housing and Urban Affairs MOHUA) यांनी दि-२०/०९/२३ च्या Office Memorandum अन्वये Project Team (PT) तसेच joint Cordinating Committee (JCC) व दि.१०/१०/२३ रोजीच्या office Memorandum अन्वये Joint Planing Team (JPT) अशा समीर्तीची स्थापना केली आहे. व त्याअनुसार स्थानक क्षेत्र विकास आराखडा तैयार करण्याचे अधिकार उपसंचालक, नगररचना विभाग यांना देण्यात आले आहे.

तसेच कक्ष अधिकारी, नवि-१२, दि. २९.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये वसई विरार शहर महानगरपालिकेस स्थानिक नियोजनाबाबत तपशिलवार अहवाल सादर करण्यास निर्देश दिले आहे. त्या अनुषंगाने इकडील कार्यालयाने जा.क्र. वविशम/नर/शा/५९३/२०२४-२५ दि.२४/०९/२०२४ च्या पत्रान्वये शासनाच्या नगरविकास विभागाकडे सदर विषयाबाबत योग्य निर्देश मिळणेकरीता विनंती केली होती.

तसेच JICA, MOHUA महाराष्ट्र शासनाकडून मिळणा-या सुचनेचे पालन करण्यात आले असुन, इकडील कार्यालयाच्या वविशम/नर/शा/१२३२/२०२४-२५ दि. ०६/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये वसई विरार हाय स्पीड रेल्वे च्या स्थानिक क्षेत्रीय योजनेचा समावेश करण्यासाठी आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये स्थानिक क्षेत्र नियोजनाकरीता नियम तैयार करणेस विनंती केली होती. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये सुधारणा करून स्थानिक क्षेत्र नियोजनाकरीता नविन कलमांचा समाविष्ट करण्यात आला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये खालील प्रमाणे Local Area Plan करीता सुधारणा करण्यांत आलेली आहे :

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम "३३ B" नुसार

Plans for areas of Comprehensive development. (१) Any time after the publication of notice regarding preparation] of draft Development plan under section २६, a Planning Authority may prepare plan or plans showing proposals for the development of an area or areas which in the opinion of the Planning Authority should be developed or re-developed as a whole (hereinafter referred to as the area or areas of Comprehensive development); and in particular, such plans shall provide for

(a) detailed development of specific areas for urban renewal, housing, shopping centres, industrial areas, civic centres, educational and cultural institutions;

(b) control of architectural features, elevation and frontage of buildings and structures;

(c) dealing satisfactorily with areas of bad layout, obsolete development and slum areas and re-location of population;

(d) open spaces, gardens, playgrounds and recreation areas.

(2) When the plans for an area or areas of Comprehensive development are prepared, whether or not separately, the Planning Authority shall follow the same procedure before submission of to the State Government for sanction as is provided by sections २५, २६, २७, २८, ७** ३० and ३१ as respect a draft Development plan and submit such plan or plans from time to time to the State Government for sanction, along with a report-

(a) explaining the proposals and the stages of the development programme by which it is proposed to execute the plan or plans,

(b) giving an appropriate estimate of the cost involved in executing the proposals of the plan or plans.

(३) The State Government may, after consulting the Director of Town Planning by notification in the Official Gazette, sanction the plan or plans for the area or areas of Comprehensive development either without, or subject to such, modifications as it may consider necessary not later than three months of the date of receipt of such plans from the Planning Authority or not later than such further period as may be extended by the State Government.

वर नमूद केल्या नुसार महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना (सुधारणा) अधिनियम 1966 मधील कलम ३३ B व ३३ C अन्वये विरार येथील हायस्पीड रेल्वे स्थानक येथे Local Area Plan तयार करणेकामी इरादा राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरीता मा. सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना (सुधारणा) अधिनियम १९६६ चे कलम 33 B व 33 अन्वये विषयांकीत विरार HSR Local Area Plan नियोजनाचे प्रारूप सिमांकन तसेच अंदाजे ४६४ हेक्टर क्षेत्रामध्ये Local Area Plan तयार करून शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार शासन राजपत्रात सुचना प्रसीद्ध करणेकामी व तयार होणा-या Local Area Plan चा प्रस्ताव शासनाकडे पाठविणे करीता आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी मा. सर्वसाधारण सभे पुढे सादर करण्यात येत आहे.

ठराव / निर्णयः- महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना (सुधारणा) अधिनियम 1966 चे कलम 33 व 338 अन्वये विरार येथील हायस्पीड रेल्वे स्थानक क्षेत्रात स्थानिक क्षेत्र योजना (Local Area Plan) तैयार करणेकामी इरादा जाहीर करण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरीता तसेच स्थानिक क्षेत्र नियोजनाचे प्रारूप सिमांकन तसेच अंदाजे ४६४ हेक्टर क्षेत्रामध्ये Local Area Plan असे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

सुचकाचे नाव - प्रफुल्लन साने

अनुमोदकाचे नाव - Cpats मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.)

मा. सर्वसाधारण सभा

मा.सर्वसाधारण सभा सूचना क्र. ०८

दि.१३/०५/२०२६

प्रति,
मा. श्री / श्रीमती .....,
नगरसेवक / नगरसेविका,
वसई-विरार शहर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि.२२/०५/२०२६ रोजी दुपारी ०३:०० वाजता 'सर्वसाधारण सभागृह', ४ था मजला, वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, यशवंत नगर, विरार (प.) येथे खालील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेणेसाठी आयोजित करण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेस कृपया उपस्थित रहावे, हि विनंती.

मा.सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका

१. मागील दि.२३/०४/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.
२. प्रश्नोत्तरे.
३. शासकीय पत्र व्यवहार माहितीस्तव.
४. श्री. रघुनाथ लक्ष्मण म्हात्रे, सफाई कामगार यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत.
५. श्री.अमोल बाळकृष्ण जाधव, उपअभियंता (विद्युत) यांच्या स्वेच्छा सेवानिवृतीबाबत.
६. श्री.वैभव प्रमोद जाधव यांना लाड समिती शिफारसीनुसार महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावून घेणेबाबत.
७. श्रीम.सुरेखा समीर पाटील यांना लाड समिती शिफारसीनुसार महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावून घेणेबाबत.
८. श्रीम.अनिता गणेश जाधव यांना लाड समिती शिफारसीनुसार महानगरपालिका सेवेत "शिपाई" या पदावर सामावून घेणेबाबत.
९. श्री.किशोर आलो पाटील व इतर २ (ठेका फायरमन) यांनी औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे (ULP) No. १०६/२००८ अंतर्गत दि.३०/०९/२०१५ रोजी दिलेला निर्णय व मा.उच्च न्यायालयच्या दि.१३/०२/२०२५ रोजीच्या निर्णयाच्या अनुषगांने समावेशन करण्याबाबत.
१०. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी सर्वसमावेशक शहर वाहतूक आराखडा Comprehensive Mobility Plan (CMP) राबविण्याकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
११. भटक्या व मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण व रेबीज रोगाचे लसीकरण करणे, जखमी श्वानांना पकडून उपचार करणेकरिता वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये स्वतःच्या अथवा भाड्याच्या जागेवर श्वानांसाठी निवारा उभारून सदर ठिकाणी भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन असून, भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ यांची मान्यता प्राप्त संस्थाकडून सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या तीन

आर्थिक वर्षासाठी नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून नसबंदी शस्त्रक्रियासाठी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रसिध्द करणेस, त्याकामी होणाऱ्या त्रैवार्षिक अंदाजित खर्चास प्रशासकीय तसेच जाहिर निवेदनाच्या अटी शर्तीस मान्यता मिळणेबाबत.

१२.वसई-विरार शहर महानगरपालिकेस कचरामुक्त शहर (Garbage Free City GFC) '३' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) व स्वयंघोषित करणेकरिता मा.सर्वसाधारण सभेपुढे अंतिम प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१३.वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जखमी जनावरांवर औषध उपचार करणेसाठी पशुवैद्यकिय दवाखाना उभारणेबाबत व याकामी होणाऱ्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

१४.वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत मोकाट व जखमी श्वानांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे व जखमी श्वानांना औषध उपचार करणेसाठी उभारण्यात आलेले २ श्वान निर्बीजीकरण केंद्रावरील कामकाजावर नियंत्रण ठेवणेकरिता आस्थापना विभागाचे मंजूर ठेकेदार मे.अर्चना सर्विसेस यांचेमार्फत कंत्राटी तत्वावर १ वेटरनरी डॉक्टराची नेमणूक करणेबाबत.

१५.वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वसई नवघर पूर्व येथे १००० श्वानांच्या क्षमतेचे निवारा केंद्र बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

१६.वसई विरार कार्यक्षेत्रातील दैनंदिन जमा होणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेकामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळण्याबाबत.

१७.मौजे भोयदापाडा, गोखिवरे येथील क्षेपणभूमीवर पडून राहिलेल्या कचऱ्यावर (Legacy waste Remediation) प्रक्रिया करणेकामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळण्याबाबत.

१८.विनामोबदला वृक्ष छाटणी करणे तसेच छाटणी केलेला पालापाचोळा, लाकुड फाटा उचलणेचे काम मिळणेबाबत.

१९.वसई-विरार शहर महानगरपलिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरीक संघाना वार्षिक अनुदान देणेबाबतच्या धोरणास/योजनेस मान्यता मिळणेबाबत.

२०.वसई विरार शहर महानगरपालिका राबवित असलेल्या विविध सामाजिक / सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता १ एप्रिल ते ऑगस्ट २०२६ पर्यंत कार्यरत कंत्राटदारास मुदतवाढ तथा प्रलंबित देयके व माहे एप्रिल ते ऑगस्ट २०२६ पर्यंत नियोजित कार्यक्रमाकरीता सुधारीत प्रशासकीय / वित्तीय मान्यता तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका राबवित असलेल्या विविध सामाजिक / सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता सन २०२६-२७ ते सन २०२७-२८ करीता प्रशासकीय / वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२१.PPP (Public Private Partnership) तत्वावर शहरातील उद्यानाकरिता आरक्षित भूखंड, मोकळ्या जागा तसेच गुरचरण जागांवर मियावाकी पद्धतीने वृक्षलागवड व देखभाल करणे तसेच दुभाजकांमध्ये शोभिवंत झाडांची देखभाल करणे इत्यादी कामे करण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या स्वारस्य अभिरुची सूचना (EOI) अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांच्या आधारे कामाचे वाटप करण्याबाबत.

आपला विशासू,

(विश्वनाथ तळेकर)
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

(मा.महापौर महोदय यांच्या मान्यतेने)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १ **सभा सुचना क्र. ८** **दिनांक : २२/०५/२०२६**

विषय :- मागील दि. २३/०४/२०२६ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.

ठराव / निर्णय :- दि.२३/०४/२०२६ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेचे कामय केलेल्या इतिवृत्ताचे वाचन करुन दुरुस्तीसह कायम करण्यात आले.

सुचक - प्रविण शेट्टी

अनुमोदक - मनोज पाचिल

PAC

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २ **सभा सुचना क्र. ८** **दिनांक : २२/०५/२०२६**

विषय :- प्रश्नोत्तरे.

ठराव / निर्णय :- सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला.

सुचक - प्रविण शेटटी

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३ **सभा सुचना क्र. ८** **दिनांक : २२/०५/२०२६**

विषय :- शासकीय पत्र व्यवहार माहितीस्तव.

ठराव/निर्णय :-

१. महाराष्ट्र शासान, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक- लसीका २०२४/ई.ऑ.क्र.९७२३०२/५४१/प्र.क्र.१४४/कु.क.१, दिनांक ०४/०५/२०२६

२. महाराष्ट्र शासान, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- स्वमअ-२०२५/प्र.क्र.८१/नवि-३४, दिनांक ०५/०५/२०२६

वरिल शासकीय प्रत्र व्यवहाराची माहिती व प्रत प्राप्त झालेली आहेत असे एकमताने मान्य केले.

सुचक - प्रविण शेटटी

अनुमोदक - ममोडा पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(~~अनीव~~ पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा.सर्वसाधारण सभा

सभा सुचना क्र. ०८

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०४ दि. २१/०५/२०२६.

विषय :- प्रभाग समिती 'एच' वसई येथील आस्थापनेवरील कार्यरत सफाई कर्मचारी श्री.रघुनाथ लक्ष्मण म्हात्रे, सफाई कामगार यांची स्वेच्छानिवृत्त मंजूर करणेबाबत...

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच', वसई येथील आस्थापनेवरील श्री.रघुनाथ लक्ष्मण म्हात्रे, सफाई कामगार यांनी दि.११/०२/२०२६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे.

श्री.रघुनाथ लक्ष्मण म्हात्रे यांची सेवा भुतपूर्व वसई नगर परिषद यांचे कडील स्थायी समिती ठराव क्र.०८(१) दि.२४/०२/१९९३ अन्वये दि.१६/०९/१९९३ पासुन "सफाई कामगार" या पदावर नेमणूक करण्यात आली आहे.

श्री.रघुनाथ लक्ष्मण म्हात्रे, सफाई कामगार यांची नेमणूकीपासून ते वसई विरार शहर महानगरपालिकेत ३३ वर्षे सेवा झालेली आहे.त्यांचे सद्याचे वय ५९ वर्षे असुन त्यांच्या वैद्यकिय कारणामुळे त्यांना स्वेच्छा निवृत्ती हवी आहे, असे दि. ११/०१/२०२६ रोजीच्या अर्जात त्यांनी नमूद केलेले आहे.

श्री.रघुनाथ लक्ष्मण म्हात्रे यांचेविरुध्द सद्यस्थितीत कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी सुरु नाही अथवा प्रलंबित नाही तथा प्रस्तावित नाही. त्यामुळे त्यांची स्वेच्छा निवृत्तीची विनंती मान्य करण्यास हरकत नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ तरतूदीनूसार

१. शासकीय कर्मचाऱ्याला त्याची २० वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर नियुक्ती प्राधिकाऱ्यास तीन महिन्यांची लेखी नोटीस देऊन सेवेमधून केव्हाही सेवानिवृत्त होता येईल.

२. स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याबद्दल पोटनियम (१) खाली दिलेली नोटीस, नियुक्ती प्राधिकाऱ्याने स्वीकारणे आवश्यक असेल. परंतू, उपरोक्त नोटीशीमध्ये नमूद केलेला कालावधी संपण्यापूर्वी नियुक्ती प्राधिकाऱ्याने सेवानिवृत्तीसाठी परवानगी देण्यास नकार दिला नाही तर, त्या कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून सेवानिवृत्ती अंमलात येईल असे नमूद आहे.

तथापि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ मधील तरतूदी नूसार श्री.रघुनाथ लक्ष्मण म्हात्रे यांना दि.१३/०५/२०२६ पासून महानगरपालिका सेवेमधून स्वेच्छा सेवा निवृत्ती दिलेली असून, त्यांना सेवानिवृत्तीनंतर सर्व लाभ म्हणजेच सेवा निवृत्ती वेतन, सेवाउपदान, रजारोखीकरण व इतर अनुषंगिक लाभ देणे आवश्यक आहे.

निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील **श्री.रघुनाथ लक्ष्मण म्हात्रे, सफाई कामगार** यांनी दि. ११/०२/२०२६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबतच्या विनंती अर्जानुसार त्यांची **महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ कलम ६६ पोटनियम (१) मधील तरतुदी नुसार दि.१३/०५/२०२६ रोजी मध्यान्होत्तर** महानगरपालिका सेवेतून दिलेल्या स्वेच्छानिवृत्तीस व सेवानिवृत्तीनंतर सेवा निवृत्ती वेतन, सेवाउपदान, रजारोखीकरण व इतर अनुषंगिक लाभ देणेस ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकांचे नाव - प्रविण शेट्टी

व स्वाक्षरी -

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील

व स्वाक्षरी -

अनुकुल संख्या .....—.....प्रतिकुल संख्या.....—.....तटस्थ संख्या.....—.....

ठराव / सर्वानुमते / ~~बहुमताने~~ / मंजूर / ~~नामंजूर~~

(~~अजीव~~ पाटील)
पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०५ सभा सुचना क्र. ०८ दिनांक: २२/०५/२०२६

विषय:- श्री.अमोल बाळकृष्ण जाधव, उपअभियंता (विद्युत) यांच्या स्वेच्छा सेवानिवृतीबाबत.

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "ई" नालासोपारा येथील आस्थापनेवरील श्री.अमोल बाळकृष्ण जाधव, उपअभियंता (विद्युत) यांनी दि. ३१/१०/२०२५ रोजी स्वेच्छा सेवानिवृती मिळणेबाबत अर्ज सादर केलाआहे.

प्रशासकीय ठराव क्र.४८२ दि. १५/१२/१९९४ नुसार भूतपूर्व नालासोपारा नगरपरिषद मध्ये कोकण दुय्यम निवड मंडळामार्फत पथदिप विभागातील वीजतंत्री या मंजूर पदावर रु. ९५०-२०-११५० दरो २५-१५०० या वेतनश्रेणीमध्ये श्री.अमोल बाळकृष्ण जाधव, उपअभियंता (विद्युत) यांची नेमणूक करण्यांत आल्याचे आहे.

१. नालासोपारा नगरपालिका दि. ३१/०५/१९९६ ची सर्वसाधारण सभा ठराव क्र. २४५ नुसार श्री.अमोल बाळकृष्ण जाधव, यांना "वीजतंत्री" या पदावर कायम करण्यात आलेले आहे.

२. श्री. अमोल बाळकृष्ण जाधव, यांना नालासोपारा नगरपालिकेच्या मंजुर आस्थापनेवर सर्वसाधारण सभा दि. १८/०६/१९९७ ठराव क्र. ६५७ व सर्वसाधारण सभा दि. १२/०८/१९९७ ठराव क्र. ६७१ नुसार कनिष्ठ अभियंता (विद्युत) या मंजूर पदावर रु. १६४०-६०-२६०० दरो ७५-२९०० या वेतनश्रेणीमध्ये दि. २१/०७/१९९७ पासून पदोन्नती देण्यांत आलेली आहे.

३. प्रशासकीय ठराव क्र. ९६४ दि. ३०/१२/२०२१ अन्वये व जा.क्र. वविशम/आस्था/३०/२०२२ दि. १०/०१/२०२२ च्या मा.आयुक्त सो, यांचे आदेशान्वये श्री.अमोल बाळकृष्ण जाधव, कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांची उपअभियंता (विद्युत) या संवर्गात पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदर आदेशाच्या अनुषंगाने त्यांची ७ व्या वेतन आयोगानुसार उप अभियंता (विद्युत) या संवर्गाची वेतनश्रेणी वेतनस्तर एस-२० त्यांना लागू करण्यात आलेली आहे.

४. श्री.अमोल बाळकृष्ण जाधव, उप अभियंता (विद्युत) हयांची नेमणूकीपासून ते सध्याच्या वसई विरार शहर महानगरपालिकेत अशी एकूण ३१ वर्षे सेवा बजावली आहे.त्यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशी अथवा खटला न्यायप्रविष्ठ नाही. त्यांचे सध्याचे वय ५५ वर्षे असून विद्युत विभागातील अपुरे कर्मचारी वर्ग, दिवाबत्ती अत्यावश्यक सेवेतील कामाचा ताण तसेच वेळोवेळी इतर विभागातील अतिरिक्त कामांच्या जबाबदारीमुळे त्यांची प्रकृती बिघडत राहिली. त्याचा परिणाम दि. २५/०७/२०२५ रोजी कार्यालयात काम करत असताना त्यांची तब्येत खालावली व त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यामुळे त्यांना मुंबईला रुग्णालयात दाखल करुन त्यांचे हृदयावर व फुफुसावर झालेले संसर्गावर दोन महिने उपचार करणेत आले.

सद्यस्थितीत त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरु असून त्यांची शारिरीक प्रकृती साथ देत नसल्याने तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्यामुळे त्यांनी वसई विरार शहर महानगरपालिका सेवेतून नियत कालमर्यादेपूर्वी स्वेच्छा निवृत्ती हवी असल्याचा त्यांनी दि.३०/१०/२०२५ च्या अर्जामध्ये उल्लेख केला आहे.

सबब श्री.अमोल बाळकृष्ण जाधव, उप अभियंता (विद्युत) यांच्या दि.१०/११/२०२५ रोजीच्या स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबतच्या सादर प्रस्तावावर दि. ३१/०१/२०२६ पूर्वी निर्णय होणे आवश्यक असून मुख्यालय आस्थापना कक्ष ३ यांचेकडून त्यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी प्रस्तावित नाही, याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय घेऊन तद्नंतर त्यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत निर्णयास्तव प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

महानगरपालिकेकडे विद्युत अभियंता राहणार नाही नवीन अभियंता येईपर्यत सदर विनंती मान्य् करणे उचित होणार नाही सबब श्री.अमोल बाळकृष्ण जाधव उपअभियंता (विद्युत) यांचा स्वेच्छा सेवानिवृत्तीचा प्रस्ताव तत्कालीन

मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी अमान्य केला होता. त्यानुसार कार्यालयीन पत्र क्र. व.वि.श.म./आस्था./६५/२०२६, दि. २९/०१/२०२६ अन्वये श्री.अमोल बाळकृष्ण जाधव उपअभियंता (विद्युत) यांना कळविण्यात आले आहे.

श्री.अमोल बाळकृष्ण जाधव, उपअभियंता (विद्युत) यांनी कालमर्यादेपूर्वी घेतलेली स्वेच्छा सेवानिवृत्ती अमान्य केलेल्या प्रस्तावावर फेरविचार होणेबाबत दि.३०/०१/२०२६ रोजी अर्ज केलेला आहे.

श्री. अमोल बाळकृष्ण जाधव, उप. अभियंता (विद्युत) यांनी त्यांचे स्वेच्छा निवृत्ती अमान्य केलेल्या निर्णयावर फेरविचार होणेबाबत दि. ३०/०१/२०२६ रोजीचे पत्रान्वये सविस्तर बाजु मांडली आहे, त्यानुसार सादर करणेत येते की,

१) श्री. अमोल बाळकृष्ण जाधव, उप. अभियंता (विद्युत) यांनी यापुर्वी दि.३०/०८/२०१८ रोजी वैयक्तीक व कौटुंबिक कारणास्तव स्वेच्छा निवृत्ती नोटीस दिली होती. परंतु, महानगरपालिका मा. सर्वसाधारण सभा दि.१९/१२/२०१८, ठराव क्र.०६ अन्वये विद्युत विभागाचा कार्यभार सक्षमपणे हाताळणारा एकही कर्मचारी महानगरपालिकेत कार्यरत नसल्याने, श्री. जाधव यांचे सेवेची महानगरपालिकेला आवश्यकता असल्याने लोकहितास्तव स्वेच्छा निवृत्तीचा अर्ज नामंजूर करण्यात आला होता. त्यावेळी महानगरपालिकेची होणारी कामातील अडचण लक्षात घेऊन त्यांनी मा. महासभेचा निर्णय मान्य केला आणि ते आजपर्यंत काम करीत आहेत, असे त्यांनी पत्रात नमुद केले आहे.

२) महानगरपालिका मंजूर आकृतीबंधात विद्युत विभागांन्तर्गत कार्यकारी अभियंता, उप-अभियंता, शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता अशी विविध एकुण ४३ पदे मंजूर आहेत. परंतु महानगरपालिकेने दि.१९/१२/२०१८ रोजी प्रथम स्वेच्छा निवृत्ती अर्ज नामंजुर केल्यानंतरही विद्युत विभागातील मंजूर पदांपैकी एकही पद आजपर्यंत भरलेली नाहीत.शहराची वाढती लोकसंख्या, वाढत्या विकासामुळे दिवाबत्तीचे कामाचा वाढता कार्यभार व अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे वारंवार आजारपण, व तब्येतीवर परिणाम होऊन माहे ऑगस्ट २०२५ ते सप्टेंबर २०२५ दरम्यान ५० दिवस हदय व फुफुसावरील संसर्ग संबंधित आजारावर वैद्यकिय उपचार घेऊन कामावर हजर झाल्याचे त्यांनी पत्रात नमुद केले आहे.

३) सद्यस्थितीत त्यांची सेवेतील ३१ वर्षे सेवा पूर्ण झाली असुन, सद्या त्यांचे वय ५५ वर्ष असून प्रकृती साथ देत नसल्याने, तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे महानगरपालिका सेवेतून कालमर्यादेपूर्वी स्वेच्छा निवृत्ती मिळणेबाबत दि. ३१/१०/२०२५ रोजी दिलेली नोटीस दिली होती. परंतु, स्वेच्छा निवृत्ती अमान्य करताना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम ६६ मधील ३० वर्षाची अर्हताकालीन सेवा पूर्ण झाल्यानंतर स्वेच्छा निवृत्ती बाबत असलेल्या तरतुदी विचारात न घेता, त्यांचा अर्ज अमान्य केला आहे. तरी तरतुदीनुसार फेर विचार होणेबाबत त्यांनी पत्रात नमुद केलेले आहे.

४) तसेच, स्वेच्छा निवृत्ती दुसऱ्यांदा अमान्य करताना, महानगरपालिकेने त्यांच्या नसल्याने प्रशासकीय कामात होणारी अडचण विचारात घेत आहात. परंतु, त्यांच्या एकाकी पदावर वाढलेल्या कामाचा ताण, अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे तब्येतीवर होत असलेला परिणाम याचा विचार न करता प्रशासकिय कारणास्तव अर्ज अमान्य केला, हा त्यांच्यावर अन्याय होत असल्याचे त्यांनी पत्रात नमुद केले आहे.

५) सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था व देखभाल दुरुस्ती कामी दैनंदिन साईटवर जावे लागत असल्याने त्यांच्या प्रकृतीवर गंभिर परिणाम होऊन पुन्हा हदय व फुफुसावरील संसर्गाचे आजार होऊ शकतात. त्यामुळे पुर्ण क्षमतेने महानगरपालिकेस वेळ देणे व काम करणे शक्य होणार नसल्याने वर नमूद केंलेल्या बार्बीचा फेर-विचार करुन अमान्य कलेली स्वेच्छा निवृत्ती बाबत फेर विचार होणेबाबत त्यांनी पत्रात नमुद केले आहे.त्यांचे वय ५५ वर्षे असून महानगरपालिकेत त्यांची सेवा ३१ वर्षे पूर्ण झालेली आहे. त्यांचे विरुध्द कोणतीही विभागिय चौकशी वा न्यायालयीन प्रकरण प्रलंबित अथवा सुरु नाही. तसेच कोणत्याही प्रकारचे येणे अथवा थकबाकी नाही असे प्रभाग समिती "ए" ते "आय" व आस्थापना कक्ष क्र.३ यांनी प्रमाणपत्र दिलेले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) १९८२ मधिल कलम ६६ मधील पोटनियम (१) नुसार श्री. अमोल बाळकृष्ण जाधव, उप. अभियंता (विद्युत) यांच्या दि.३१/१०/२०२५ रोजीच्या अर्जान्वये स्वेच्छानिवृत्ती अमान्य

केलेल्या निर्णयावर फेरविचार होणेबाबत श्री. अमोल बाळकृष्ण जाधव, उप. अभियंता (विद्युत) यांनी दि. ३०/०१/२०२६ रोजी विनंती अर्ज केलेला आहे.

म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम,१९८२ चे कलम ६६ नुसार स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याबाबत पोट नियम (१) मध्ये नमूद केल्यानूसार स्वेच्छानिवृत्ती करीता शासकीय कर्मचाऱ्याला दिलेली नोटीस नियुक्त प्राधिकरणाने स्वीकारणे आवश्यक असेल, मात्र उपरोक्त अर्जामध्ये नमुद केलेला कालावधी संपण्यापूर्वी (म्हणजेच अर्जाच्या तारखेच्या तीन महिन्यांच्या आत) नियुक्ती प्राधिकरणाने सेवानिवृत्तीसाठी परवानगी देण्यास नकार दिला नाही तर त्या कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून सेवानिवृत्ती अंमलात येईल, असे नमूद आहे. श्री.अमोल बाळकृष्ण जाधव, उपअभियंता (विद्युत) यांनी दिलेल्या अर्जाची मुदत दि.३०/०४/२०२६ रोजी संपुष्टात येत आहे.

सबब श्री.अमोल बाळकृष्ण जाधव, उपअभियंता (विद्युत) यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीस महानगरपालिका स्तरावर परवानगी देण्यात आल्यानंतर, त्यांना सेवानिवृत्तीनंतरचे सर्व लाभ म्हणजेच सेवानिवृत्तीवेतन उपदान, रजा रोखीकरण, व इतर अनुषंगिक लाभ देणे आवश्यक आहे.

तरी श्री.अमोल बाळकृष्ण जाधव, उपअभियंता (विद्युत) यांच्या दिनांक ३०/०१/२०२६ रोजीच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीच्या प्रस्तावावर विचार विनिमय करण्यात आला.

निर्णय :- श्री.अमोल बाळकृष्ण जाधव, उपअभियंता (विद्युत), यांनी दिनांक ३०/०१/२०२६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबतच्या विनंती अर्जानुसार त्यांची म.ना.से. (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ कलम ६६ पोटनियम (१) अन्वये दि.२२/०५/२०२६ पासून मध्यान्नोत्तर महानगरपालिका सेवेतुन स्वेच्छा सेवानिवृत्त करण्यास तसेच त्यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर सेवा उपदान, रजा रोखीकरण, सेवा निवृत्ती व इतर अनुषंगिक लाभ देणेस ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाचे नांव - प्रविण शेट्टी

व स्वाक्षरी –

अनुमोदकाचे नांव – मनोज पाटील

व स्वाक्षरी –

अनुकुल संख्या---------- प्रतिकुल संख्या ---------- तटस्थ संख्या ----------

ठराव / सर्वानुमते / बहुमताने / मंजूर / नामंजूर

(अजीव पाटील)

पिठासीन अधिकारी

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०६ **सभा सुचना क्र.** ०८ **दि.** २२/०५/**२०२६.**

प्रस्तावाचा विषय :- श्री. वैभव प्रमोद जाधव यांना लाड समिती शिफारसीनूसार महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावून घेणेबाबत...

प्रस्तावाचा मजकूर : श्री. प्रमोद भागा जाधव, सफाई कामगार स्वेच्छानिवृत्त कर्मचारी यांचे सेवापुस्तकाची तपासणी केली असता तत्कालिन वसई नगरपरिषद सर्वसाधारण सभा दि.२७/०२/२००४ नुसार सफाई कामगार या पदावर त्यांना सामावून घेण्यात आलेची नोंद दिसून येते. तसेच तत्कालीन वसई नगरपरिषद मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.११४, दि.२७/०२/२००४ अन्वये दि.०१/०६/२००४ पासून सफाई कामगार या पदावर त्यांची नियुक्ती करण्यात आली असुन स्थायी समिती ठराव क्र.३० दि.३०/०७/२००५ अन्वये दि.०५/०८/२००५ पासुन सफाई कामगार या पदावर कायम करण्यात आल्याचे सेवापुस्तिकेतील नोंदीवरून दिसून येते. श्री. प्रमोद भागा जाधव, सफाई कामगार हे सेवेत असताना त्यांची दि.०२/१२/२०२५ रोजी पासून स्वेच्छानिवृत्ती मंजूर करण्यात आलेली आहे.

श्री. प्रमोद भागा जाधव, सफाई कामगार यांची २० वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण झाली असल्याने त्यांना दि.०२/१२/२०२५ रोजी पासून मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्त करण्यात आलेले आहे.

श्री. वैभव प्रमोद जाधव यांचे वडील श्री. प्रमोद भागा जाधव, सफाई कामगार हे महानगरपालिकेत कार्यरत असताना ते दि.०२/१२/२०२५ रोजी स्वेच्छानिवृत्त झालेले आहेत. तरी त्यांच्या जागी वारस हक्काने मला नोकरी मिळावी, हि नम्र विनंती असे कळविले आहे.

सेवानिवृत्त सफाई कर्मचा-यांच्या वारसा हक्क नियुक्ती प्रस्तावाचे छाननी पत्रक

अ) सेवानिवृत्त सफाई कामगारांची माहीती

अ.क्र.	माहितीचा तपशिल	आवश्यक कागदपत्रे
१	श्री. प्रमोद भागा जाधव	सरळ सेवेने
२	जन्म दिनांक. ०१/०६/१९७२	सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत
३	नियुक्ती दिनांक ५/८/२००५	सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत
४	मुळ नियुक्ती पध्दत-	**सरळसेवा**
५	सफाई कामगार या पदावरुन पदोन्नती दिली आहे काय असल्यास पदनाम	पदोन्नती दिलेली नाही.
६	महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणुन केलेली एकुण सेवा-	२० वर्षे ३ महिने २७ दिवस
७	कोणत्या पदावर सेवासमाप्ती	**सफाई कामगार**
८	कोणत्या तारखेला पद रिक्त	**दि.०२/१२/२०२५**
९	सेवासमाप्तीचा प्रकार	**स्वेच्छानिवृत्ती**
१०	पद रिक्त झाल्याचे कारण	**स्वेच्छानिवृत्ती**
११	सेवा कालावधीनुसार वारस पात्र आहे काय	**होय, पात्र आहे...**

ब) वारसाची माहीती

	तपशिल		पुरावा दाखल कागदपत्र
१	वारसाचे नाव	श्री. वैभव प्रमोद जाधव	
२	वारसाचे नाते	मुलगा	सोबत कागदपत्र जोडलेले आहेत.
३	वारसाचा जन्म दिनांक	दि. ०६/०८/२०००	शाळा सोडल्याचा दाखला
४	वारसाचे अर्ज करते वेळी वय	एकुण २५ वर्षे ४ महिने	अनुज्ञेय आहे...
५	वारस हक्क नियुक्तीसाठी मनपाकडे प्राप्त वारसाचा अर्ज दिनांक	अर्ज दि. १५/०१/२०२६	पात्रता योग्य आहे
६	वारसाची शैक्षणीक अर्हता	१२ वी पास	साक्षांकीत दाखला
७	वारसाची जात	**बौध्द**	जात प्रमाणपत्र
८	सफाई कामगारांचा मृत्यु / सेवानिवृत्त/ स्वेच्छा निवृत्ती /रुग्णता सेवा निवृत्ती झाला असल्यास पात्र वारसाचे संम्मती पत्र	कुटूंबातील इतर सदस्यांचे स्वयंघोषणापत्र आहे	कुटूंबातील एकूण व्यक्ती - ५
९	वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात राहत असल्या बाबत पुरावा	रेशन कार्ड क्रमांक NO. ०२३९७२९	त्याच कुटुंबात राहत असल्याबाबत रेशकार्ड जोडले आहे. SE.no.०२३९७२९ रेशन कार्ड
१०	अर्जदाराशी नाते किंवा सांभाळ करणा-या व्यक्तीचे नाव	मुलगा	**सेवेसाठी पात्र**
११	प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे काय	होय	प्रतिज्ञापत्र/स्वयंघोषणापत्र सोबत जोडले आहे.
१२	जात पडताळणी प्रमाणपत्र आहे काय		शासन निर्णय दि. ११/०३/२०२४ नुसार शासन निर्णय दि. २४/०२/२०२३ मधिल अनु क्र. ८.४ नुसार नियुक्ती देण्यापूर्वी जात जातवैद्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे.
१३	लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र		सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुध्दीपत्रक दि.११ मार्च,२०२४ नुसार लहान कुटूंबाचे प्रमाणत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे.
१४	वारस कोणत्या पदासाठी पात्र होऊ शकेल.	सफाई कामगार	
१५	शिफारस	वारस श्री. वैभव प्रमोद जाधव यांना वारसा हक्काने महानगर पालिका सेवेत सफाई कामगार या पदासाठी पात्र आहे.	

संदर्भ क्र.२ शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदी खालीलप्रमाणे:-

१. **सफाई कामगारांची व्याख्या** :- लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. शौचालय स्वच्छता, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या खालील व्यक्ती-

१. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्ग.

२. **सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार**.

३. पूर्वी ज्या सफाई कामगारांनी डोक्यावरुन मैला वाहून नेण्याचे काम केले आहे. अशा सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे.

२. **सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार.**

२. **सफाई कामगारांकरीता वारसाहक्काची तरतूद**:- शासकीय/निमशासकीय/**महानगरपालिका**/ नगरपालिका/नगरपरिषदा/कटकमंडळे (कंटेनमेंट बोर्ड) राज्य शासनाची महामंडळे / राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ Parastatal संस्था/ अनुदानित संस्था शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इत्यादी आस्थापनेवरील उपरोक्त (१) येथे नमूद व्याख्येनूसार सफाई कामगारांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर, मृत्यूनंतर, **स्वेच्छा निवृत्तीनंतर** किंवा त्यांना वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर सफाई कामगाराचे आर्थिक नुकसान होऊ नये व त्याचे कुटूंब बेघर होऊ नयेआणि त्यास सामाजिक संरक्षण प्राप्त होण्याच्या दृष्टीने, लाड समितीच्या शिफारशीनूसार संबंधित सफाई कामगाराच्या जागी त्याच्या वारसाची नियमानुसार वारसा हक्काने नियुक्ती करण्याची कार्यवाही करावी.

३. **वारसा हक्काने पात्र ठरणारे सफाई कामगाराचे वारस :-**

३.१ पती/पत्नी

३.२ **मुलगा** / मुलगी

३.३ सून /जावई

३.४ विधवा मुलगी / बहिण/घटस्फोटीत मुलगी/बहिण/परित्यक्त्या मुलगी/बहिण/अविवाहित मुलगी अविवाहित बहिण.

३.५ सफाई कर्मचारी अविवाहीत असल्यास त्यांचा सख्खा भाऊ/सख्खी बहीण

३.६ नात/नातू

३.७ वरील पैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसापैकी कोणीही सफाईचे काम करण्यास तयार नसल्यास सफाई कामगाराचा तहहयात सांभाळ करण्याची लेखी शपथपत्राव्दारे हमी देणारी संबंधित नामनिर्देशित व्यक्ती असे नमूद आहे.

उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार **श्री. वैभव प्रमोद जाधव** हे लाड समितीच्या शिफारशीनुसार **"सफाई कामगार"** या पदावर नियुक्ती देणेस पात्र आहेत.

सबब शासन निर्णय क्र. सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक, दि. २४ फेब्रूवारी,२०२३ मधील तरतुदीनुसार **श्री. वैभव प्रमोद जाधव** यांना लाड समितीच्या शिफारशीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावून घेणे बाबतच्या प्रस्तावावर विचार विनिमय करून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

निर्णय/ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत कर्मचारी श्री. प्रमोद भागा जाधव, सफाई कामगार हे दि. ०२/१२/२०२५ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झाले असून त्यांचा मुलगा **श्री. वैभव प्रमोद जाधव** हयास शासन निर्णय क्र. सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक, दि. २४ फेब्रूवारी,२०२३ मधील तरतुदीनुसार वारस हक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत **"सफाई कामगार"** या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव : प्रविण रेड्डी
व स्वाक्षरी

अनुमोदकाचे नाव : मनोज पाटील
व स्वाक्षरी

अनुकूल संख्या ..... प्रतिकुल संख्या ..... तटस्थ संख्या .....
ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(श्री.अजीव यशवंत पाटील)
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र.०७ **सभा सुचना क्र.** ०८ **दि.**२२/०५/२०२६.

प्रस्तावाचा विषय :- श्रीम सुरेखा समीर पाटील यांना लाड समिती शिफारसीनूसार महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावून घेणेबाबत...

प्रस्तावाचा मजकूर : वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत श्री. शशिकांत सहदेव नाईक, सफाई कामगार यांचे सेवापुस्तकाची तपासणी केली असता त्यांना आगाशी ग्रामपंचायत येथे सभा ठराव क्र. ४०, अन्वये सफाई कामगार या पदावर दि.१०/०८/१९९७ पासुन कायम करण्यात आलेले आहे. श्री. शशिकांत सहदेव नाईक, सफाई कामगार यांना नियमित केलेल्या दिनांकापासून ते सेवानिवृत्ती दिनांक.३०/०६/२०२५ पर्यंतचा महानगरपालिकेत एकूण २८ वर्षे १० महिने २२ दिवस इतकी सेवा झालेली आहे.

श्री. शशिकांत सहदेव नाईक, सफाई कामगार, यांनी मी महानगरपालिकेत सफाई कामगार या पदावर कार्यरत असताना दि.३०/०६/२०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेलो आहे. तरी माझ्या जागी वारसा हक्काने माझी मुलगी **श्रीम.सुरेखा समीर पाटील** हिला सफाई कामगार या पदावर नोकरी मिळावी अशी नम्र विनंती केल्याचे कळविलेले आहे.

श्रीम सुरेखा समीर पाटील यांनी माझे वडील श्री. श्री. शशिकांत सहदेव नाईक, सफाई कामगार हे महानगरपालिकेत कार्यरत होते दि. ३०/०६/२०२५रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. तरी त्यांचे जागी वारसाहक्काने मला नोकरी मिळावी अशी नम्र विनंती केलेली आहे.

प्र.सहा-आयुक्त (आस्था) यांनी श्री. शशिकांत सहदेव नाईक यांच्या विनंती अर्जानुसार श्रीम सुरेखा समीर पाटील यांना कामावर घेणेकरिता आवश्यक कागदपत्रे सादर करणेबाबत कळविलेले आहे. त्याअनुषंगाने श्री. शशिकांत सहदेव नाईक यांनी दि.३१/१०/२०२५ रोजी १. सेवानिवृत्तीचा आदेश, २. पॅन कार्ड, ३. इलेक्शन कार्ड ४.शाळा सोडल्याचा दाखला, ५.जातीचा दाखला ६.विवाह नोंदणी प्रमाणपत्र ७. कुटूंबातील अन्य सदस्यांचे सांभाळ करण्याचे प्रतिज्ञापत्र, ८.कुटूंबातील इतर सदस्यांचे संमतीपत्र, ९. रेशन कार्ड, १०. श्रीम.अपर्णा शशिकांत नाईक (लहान बहीण) यांचे ना हरकत प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे जोडलेले आहेत.

सहा.आयुक्त (आस्था) यांनी श्री. शशिकांत सहदेव नाईक, सफाई कामगार यांनी साफ-सफाईचे कामकाज केले आहे किंवा कसे याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविलेले आहे. त्याअनुषंगाने **सहा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग) यांनी** श्री. शशिकांत सहदेव नाईक, सफाई कामगार यांनी सफाई कामगारांच्या व्याखेत बसणारे सर्व सफाईचे कामकाज केले असलेबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

सेवानिवृत्त सफाई कर्मचा-यांच्या वारसा हक्क नियुक्ती प्रस्तावाचे छाननी पत्रक

अ) सेवानिवृत्त सफाई कामगारांची माहीती

अ.क्र.	माहितीचा तपशिल	आवश्यक कागदपत्रे
१	श्री. शशिकांत सहदेव नाईक	सरळ सेवेने
२	जन्म दिनांक. ११/०६/१९६५	सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत
३	नियुक्ती दिनांक १०/०८/१९९७	सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत
४	मुळ नियुक्ती पध्दत-	**सरळसेवा**
५	सफाई कामगार या पदावरुन पदोन्नती दिली आहे काय असल्यास पदनाम	पदोन्नती दिलेली नाही.

६	महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणुन केलेली एकुण सेवा-	२८ वर्षे १० महिने २२ दिवस
७	कोणत्या पदावर सेवासमाप्ती	**सफाई कामगार**
८	कोणत्या तारखेला पद रिक्त	**दि.३०/०६/२०२५**
९	सेवासमाप्तीचा प्रकार	**सेवानिवृत्त**
१०	पद रिक्त झाल्याचे कारण	**सेवानिवृत्त**
११	सेवा कालावधीनुसार वारस पात्र आहे काय	**होय, पात्र आहे...**

ब) वारसाची माहीती

	तपशिल		**पुरावा दाखल कागदपत्र**
१	वारसाचे नाव	श्रीम सुरेखा समीर पाटील	
२	वारसाचे नाते	मुलगी	सोबत कागदपत्र जोडलेले आहेत.
३	वारसाचा जन्म दिनांक	दि. २२/१०/१९८८	शाळा सोडल्याचा दाखला
४	वारसाचे अर्ज करते वेळी वय	एकुण ३७ वर्ष	अनुज्ञेय आहे...
५	वारस हक्क नियुक्तीसाठी मनपाकडे प्राप्त वारसाचा अर्ज दिनांक	अर्ज दि. २४/०२/२०२६	पात्रता योग्य आहे
६	वारसाची शैक्षणीक अर्हता	०४ थी पास	साक्षांकीत दाखला
७	वारसाची जात	**हिंदू-भंडारी**	जात प्रमाणपत्र
८	सफाई कामगारांचा मृत्यु / सेवानिवृत्त/ स्वेच्छा निवृत्ती /रुग्णता सेवा निवृत्ती झाला असल्यास पात्र वारसाचे संम्मती पत्र	कुटूंबातील इतर सदस्यांचे स्वयंघोषणापत्र आहे	कुटूंबातील एकूण व्यक्ती - ३
९	वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात राहत असल्या बाबत पुरावा	रेशन कार्ड क्रमांक NO.०१९८११३	त्याच कुटुंबात राहत असल्याबाबत रेशकार्ड जोडले आहे. SE.no.०१९८११३ रेशन कार्ड
१०	अर्जदाराशी नाते किंवा सांभाळ करणा-या व्यक्तीचे नाव	मुलगी	**सेवेसाठी पात्र**
११	प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे काय	होय	प्रतिज्ञापत्र/स्वयंघोषणापत्र सोबत जोडले आहे.
१२	जात पडताळणी प्रमाणपत्र आहे काय	नाही	शासन निर्णय दि. ११/०३/२०२४ नुसार शासन निर्णय दि. २४/०२/२०२३ मधिल अनु क्र. ८.४ नुसार नियुक्ती देण्यापूर्वी जात जातवैद्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे.
१३	लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र	नाही	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुध्दीपत्रक दि.११ मार्च,२०२४ नुसार लहान कुटूंबाचे प्रमाणत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे.

१४	वारस कोणत्या पदासाठी पात्र होऊ शकेल.	**सफाई कामगार**	
१५	शिफारस	वारस श्रीम. सुरेखा समीर पाटील या वारसा हक्काने महानगरपालिका सेवेत **सफाई कामगार** या पदासाठी पात्र आहेत.	

<u>शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदी खालीलप्रमाणे</u>:-

१. **सफाई कामगारांची व्याख्या** :- लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. शौचालय स्वच्छता, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या खालील व्यक्ती-

१. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्ग.

२. **<u>सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार</u>**.

३. पूर्वी ज्या सफाई कामगारांनी डोक्यावरुन मैला वाहून नेण्याचे काम केले आहे. अशा सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे.

२. **<u>सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार.</u>**

२. **<u>सफाई कामगारांकरीता वारसाहक्काची तरतूद</u>**:- शासकीय/निमशासकीय/**<u>महानगरपालिका</u>**/ नगरपालिका/नगरपरिषदा/कटकमंडळे (कंटेनमेंट बोर्ड) राज्य शासनाची महामंडळे / राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ Parastatal संस्था/ अनुदानित संस्था शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इत्यादी आस्थापनेवरील उपरोक्त (१) येथे नमूद व्याख्येनूसार सफाई कामगारांना त्यांच्या **सेवानिवृत्तीनंतर**, मृत्यूनंतर, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा त्यांना वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर सफाई कामगाराचे आर्थिक नुकसान होऊ नये व त्याचे कुटूंब बेघर होऊ नयेआणि त्यास सामाजिक संरक्षण प्राप्त होण्याच्या दृष्टीने, लाड समितीच्या शिफारशीनूसार संबंधित सफाई कामगाराच्या जागी त्याच्या वारसाची नियमानुसार वारसा हक्काने नियुक्ती करण्याची कार्यवाही करावी.

<u>३. वारसा हक्काने पात्र ठरणारे सफाई कामगाराचे वारस :-</u>

३.१ पती/पत्नी

३.२ मुलगा / **मुलगी**

३.३ सून /जावई

३.४ विधवा मुलगी / बहिण/घटस्फोटीत मुलगी/बहिण/परित्यक्त्या मुलगी/बहिण/अविवाहित मुलगी अविवाहित बहिण.

३.५ सफाई कर्मचारी अविवाहीत असल्यास त्यांचा सख्खा भाऊ/सख्खी बहीण

३.६ नात/नातू

३.७ वरील पैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसापैकी कोणीही सफाईचे काम करण्यास तयार नसल्यास सफाई कामगाराचा तहहयात सांभाळ करण्याची लेखी शपथपत्राव्दारे हमी देणारी संबंधित नामनिर्देशित व्यक्ती असे नमूद आहे.

शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदी खालीलप्रमाणे:-

१. **सफाई कामगारांची व्याख्या** :- लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. **शौचालय स्वच्छता**, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी **संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या व्यक्ती**-

उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्रीम सुरेखा समीर पाटील हे लाड समितीच्या शिफारशीनुसार **"सफाई कामगार"** या पदावर नियुक्ती देणेस पात्र आहेत.

सबब शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदीनुसार श्री. शशिकांत सहदेव नाईक यांची वारस मुलगी श्रीम सुरेखा समीर पाटील यांनी धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार व इतर अटी शर्तीच्या अधिन राहून वारसाहक्काने महानगरपालिका सेवेत **"सफाई कामगार"** या पदावर सामावून घेणे बाबतच्या प्रस्तावावर विचार विनिमय करून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

निर्णय/ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी श्री. शशिकांत सहदेव नाईक, सफाई कामगार हे दि. ३०/०६/२०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असून त्यांची मुलगी श्रीम सुरेखा समीर पाटील हया शासन निर्णय क्र.सफाई २०१८/प्र.क्र.४६/ सआक,दि.२४ फेब्रूवारी, २०२३ मधील तरतुदीनुसार वारस हक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार"या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव : प्रविण लोंढी
व स्वाक्षरी

अनुमोदकाचे नाव : मनोज पाटील
व स्वाक्षरी

अनुकूल संख्या ..—..... प्रतिकुल संख्या .....—..... तटस्थ संख्या .....—.....
ठराव/सर्वानुमते/~~बहुताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(श्री.अजीव यशवंत पाटील)
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०८ **सभा सुचना क्र.** ०८ **दि.**२२ /०५ /२०२६.

.....

<u>प्रस्तावाचा विषय</u> :- श्रीम.अनिता गणेश जाधव यांना लाड समिती शिफारसीनूसार महानगरपालिका सेवेत "शिपाई" या पदावर सामावून घेणेबाबत...

<u>प्रस्तावाचा मजकूर</u> : वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत श्री. गणेश दत्तात्रेय जाधव, सफाई कामगार यांचे सेवापुस्तकाची तपासणी केली असताना त्यांची तत्कालिन नवघर माणिकपूर नगरपरिषद सर्वसाधारण सभा दि.२१/०८/२००८ नुसार सफाई कामगार या पदावर सामावून घेण्यात आले. ववविशम महानगरपालिका मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.०८, दि.१६/०५/२०१३ अन्वये सफाई कामगार या पदावर दि.०१/१२/२०१० पासुन कायम करण्यात आले. श्री. गणेश दत्तात्रेय जाधव, सफाई कामगार हे सेवेत असताना दि.०८/०९/२०२५ रोजी दिवंगत झालेले आहेत.

श्री. गणेश दत्तात्रेय जाधव, सफाई कामगार यांना नियमित केलेल्या दिनांकापासून ते मयत दिनांक ०८/०९/२०२५ पर्यंतचा महानगरपालिकेत एकूण १४ वर्षे सेवा झाली आहे.

<u>श्रीम.अनिता गणेश जाधव यांनी</u> माझे पती कै.गणेश दत्तात्रेय जाधव, सफाई कामगार हे महानगरपालिकेत कार्यरत असताना दि.०८/०९/२०२५ रोजी अल्पशा आजाराने त्यांचे निधन झालेले आहे. तरी त्यांच्या जागी वारस हक्काने मला नोकरी मिळावी हि नम्र विनंती असे कळविले आहे.

उप-आयुक्त (आस्था) यांनी श्रीम.अनिता गणेश जाधव यांना मा.तहसिलदार, वसई यांचेकडील वारस दाखला सादर करणेबाबत पत्राव्दारे कळविले आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र.३ नुसार श्रीम. अनिता गणेश जाधव यांनी दि.१५/१२/२०२५ रोजी वारस दाखला सादर केलेला आहे.

सेवानिवृत्त सफाई कर्मचा-यांच्या वारसा हक्क नियुक्ती प्रस्तावाचे छाननी पत्रक

अ) सेवानिवृत्त सफाई कामगारांची माहीती

अ.क्र.	माहितीचा तपशिल	आवश्यक कागदपत्रे
१	श्री.गणेश दत्तात्रेय जाधव	सरळ सेवेने
२	जन्म दिनांक. ०५/०६/१९८७	सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत
३	नियुक्ती दिनांक २१/०८/२००८	सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत
४	मुळ नियुक्ती पध्दत-	**सरळसेवा**
५	सफाई कामगार या पदावरुन पदोन्नती दिली आहे काय असल्यास पदनाम	पदोन्नती दिलेली नाही.
६	महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणुन केलेली एकुण सेवा-	१४ वर्षे
७	कोणत्या पदावर सेवासमाप्ती	**सफाई कामगार**
८	कोणत्या तारखेला पद रिक्त	**दि.०८/०९/२०२५**
९	सेवासमाप्तीचा प्रकार	**निधन झाल्यामुळे**
१०	पद रिक्त झाल्याचे कारण	**निधन झाल्यामुळे**
११	सेवा कालावधीनुसार वारस पात्र आहे काय	**होय, पात्र आहे...**

ब) वारसाची माहीती

	तपशिल		पुरावा दाखल कागदपत्र
१	वारसाचे नाव	श्रीम.अनिता गणेश जाधव	
२	वारसाचे नाते	पत्नी	सोबत कागदपत्र जोडलेले आहेत.
३	वारसाचा जन्म दिनांक	दि. ११/०९/१९८७	शाळा सोडल्याचा दाखला
४	वारसाचे अर्ज करते वेळी वय	एकुण ३८ वर्ष	अनुज्ञेय आहे...
५	वारस हक्क नियुक्तीसाठी मनपाकडे प्राप्त वारसाचा अर्ज दिनांक	अर्ज दि. ०१/१०/२०२५	पात्रता योग्य आहे
६	वारसाची शैक्षणीक अर्हता	१२ वी पास	साक्षांकीत दाखला
७	वारसाची जात	**हिंदु मल्हार कोळी (अ.ज.)**	शाळा सोडल्याच्या दाखला
८	सफाई कामगारांचा मृत्यु / सेवानिवृत्त/ स्वेच्छा निवृत्ती /रुग्णता सेवा निवृत्ती झाला असल्यास पात्र वारसाचे संम्मती पत्र	कुटूंबातील इतर सदस्यांचे स्वयंघोषणापत्र आहे	कुटूंबातील एकूण व्यक्ती -
९	वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात राहत असल्या बाबत पुरावा	रेशन कार्ड क्रमांक NO.	त्याच कुटुंबात राहत असल्याबाबत रेशकार्ड जोडले आहे. SE.no.०६३१५४ रेशन कार्ड
१०	अर्जदाराशी नाते किंवा सांभाळ करणा-या व्यक्तीचे नाव	पत्नी	**सेवेसाठी पात्र**
११	प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे काय	होय	प्रतिज्ञापत्र/स्वयंघोषणापत्र सोबत जोडले आहे.
१२	जात पडताळणी प्रमाणपत्र आहे काय		शासन निर्णय दि. ११/०३/२०२४ नुसार शासन निर्णय दि. २४/०२/२०२३ मधिल अनु क्र. ८.४ नुसार नियुक्ती देण्यापूर्वी जात जातवैद्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे.
१३	लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र		सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुध्दीपत्रक दि.११ मार्च,२०२४ नुसार लहान कुटूंबाचे प्रमाणत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे.
१४	वारस कोणत्या पदासाठी पात्र होऊ शकेल.	**शिपाई**	
१५	शिफारस	वारस श्रीम. अनिता गणेश जाधव यांना वारसा हक्काने महानगर पालिका सेवेत शिपाई या पदासाठी पात्र आहे.	

शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदी खालीलप्रमाणे:-

१. **सफाई कामगारांची व्याख्या** :- लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. शौचालय स्वच्छता, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या खालील व्यक्ती-

१. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्ग.

२. **सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार.**

३. पूर्वी ज्या सफाई कामगारांनी डोक्यावरुन मैला वाहून नेण्याचे काम केले आहे. अशा सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे.

२. **सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार.**

२. **सफाई कामगारांकरीता वारसाहक्काची तरतूद**:- शासकीय/निमशासकीय/**महानगरपालिका**/ नगरपालिका/नगरपरिषदा/कटकमंडळे (कंटेनमेंट बोर्ड) राज्य शासनाची महामंडळे / राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ Parastatal संस्था/ अनुदानित संस्था शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इत्यादी आस्थापनेवरील उपरोक्त (१) येथे नमूद व्याख्येनूसार सफाई कामगारांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर, **मृत्यूनंतर**, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा त्यांना वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर सफाई कामगाराचे आर्थिक नुकसान होऊ नये व त्याचे कुटूंब बेघर होऊ नयेआणि त्यास सामाजिक संरक्षण प्राप्त होण्याच्या दृष्टीने, लाड समितीच्या शिफारशीनूसार संबंधित सफाई कामगाराच्या जागी त्याच्या वारसाची नियमानुसार वारसा हक्काने नियुक्ती करण्याची कार्यवाही करावी.

३. **वारसा हक्काने पात्र ठरणारे सफाई कामगाराचे वारस :-**

३.१ पती/**पत्नी**

३.२ मुलगा / मुलगी

३.३ सून /जावई

३.४ विधवा मुलगी / बहिण/घटस्फोटीत मुलगी/बहिण/परित्यक्त्या मुलगी/बहिण/अविवाहित मुलगी अविवाहित बहिण.

३.५ सफाई कर्मचारी अविवाहीत असल्यास त्यांचा सख्खा भाऊ/सख्खी बहीण

३.६ नात/नातू

३.७ वरील पैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसापैकी कोणीही सफाईचे काम करण्यास तयार नसल्यास सफाई कामगाराचा तहहयात सांभाळ करण्याची लेखी शपथपत्राव्दारे हमी देणारी संबंधित नामनिर्देशित व्यक्ती असे नमूद आहे.

शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदी खालीलप्रमाणे:-

१. **सफाई कामगारांची व्याख्या** :- लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. **शौचालय स्वच्छता**, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी **संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या व्यक्ती**-

उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्रीम.अनिता गणेश जाधव हे लाड समितीच्या शिफारशीनुसार **शिपाई** या पदावर नियुक्ती देणेस पात्र आहेत.

सबब शासन निर्णय क्र. सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक, दि. २४ फेब्रूवारी,२०२३ मधील तरतुदीनुसार श्रीम. अनिता गणेश जाधव यांना लाड समितीच्या शिफारशीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत शिपाई या पदावर सामावून घेणे बाबतच्या प्रस्तावावर विचार विनिमय करून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

निर्णय/ठराव :- वसई विरार श.म.न पालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी श्री. गणेश दत्तात्रेय जाधव सफाई कामगार हे दि. ०८/०९/२०२५ रोजी मयत झाले असून त्यांची पत्नी श्रीम.अनिता गणेश जाधव हया शासन निर्णय क्र. सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक, दि. २४ फेब्रूवारी,२०२३ मधील तरतुदीनुसार वारस हक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "शिपाई" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव : प्रविण शेट्टी
व स्वाक्षरी

अनुमोदकाचे नाव : मनोज पाटील
व स्वाक्षरी

अनुकूल संख्या ..... प्रतिकुल संख्या ..... तटस्थ संख्या .....
ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(श्री.अजीव यशवंत पाटील)
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा. सर्वसाधारण सभा

सभा सुचना क्र. ०८

सर्वसाधारण सभा ठराव क्र. : ०९ **दिनांक :- २२/०५/२०२६**

विषय : - श्री. किशोर आलो पाटील व इतर २ (ठेका फायरमन) यांनी औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे (ULP) No. १०६/२००८ अंतर्गत दि. ३०/०९/२०१५ रोजी दिलेल्या निर्णयाच्या व मा. उच्च न्यायालयच्या दि. १३/०२/२०२५ रोजीच्या निर्णयाच्या अनुषगांने समावेशन करण्याबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- श्री. किशोर आलो पाटील , श्री. मायकल सेबिस्टीन लोपिस व श्री. शिवाजी बांगो सातपुते (ठेका फायरमन) यांनी औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी (ULP) No. १०६/२००८ अंतर्गत दि. ३०/०९/२०१५ रोजी दिलेल्या निर्णयाची महानगरपालिकेने अमंलबजावणी न केल्याने औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे दाखल कम्प्लेट नं. १६४ ऑफ २०२३, १६५ ऑफ २०२३ व १६६ ऑफ २०२३ अनुषंगाने खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त तिनही ठेका फायरमन यांनी मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे दाखल (ULP) No. १०६/२००८ संदर्भात मा. न्यायालयाने दि. ३० सप्टेंबर, २०१५ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने या प्रकरणी वस्तुस्थिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१. याचिकाकर्ते सर्व श्री. किशोर पाटील, श्री.मायकल सेबेस्टीन लोपीस, श्री.शिवाजी बांगो सातपुते हे तत्कालीन नवघर-माणिकपूर नगरपरिषदेकडे ठेका पध्दतीने अनुक्रमे दि. ०१/०९/१९९८, दि.०१/११/१९९८ व दि.०१/०४/२००० पासून अग्निशमन विभागात ड्रायव्हर-कम फायरमन म्हणून कार्यरत होते. ते आजतागायत वेळोवेळी मंजूर विविध ठेकेदरांमार्फत ठेका पध्दतीने कार्यरत आहेत. दरम्यान म्हणजेच दिनांक १६/०९/२००६ रोजी नगरपरिषद संचालनालयाच्या आदेशानुसार तत्कालीन नवघर-माणिकपूर नगरपरिषदेकरीता नियमित आस्थापनेवर विविध पदांचा आकृतीबंध मंजूर झाला होता. त्यामध्ये "लिडिंग फायरमनची - २" व "फायरमनची - ६" पदे मंजूर झाली होती आणि त्या मंजूर झालेल्या पदावर नियुक्तीसाठी उपरोक्त याचिकाकर्ते यांनी विनंती केली होती. परंतु याचिकाकर्ते हे त्यावेळी सदर पदाची आवश्यक ती शैक्षणीक अर्हता धारण करीत नसल्याने तत्कालीन नवघर-माणिकपूर नगरपरिषदेकडून त्यांचे मागणीवर विचार करण्यात आला नाही.

२. दरम्यान याचिकाकर्ते यांनी मा. औद्योगिक न्यायालयामध्ये वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या सेवेत कायम रुजू करणे बाबत (ULP) No. १०६/२००८ अन्वये दाद मागितली होती.

३. तत्कालीन नवघर-माणिकपुर नगरपरिषदेचा मंजुर आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम दि. १६ सप्टेंबर, २००६ व अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र राज्य यांनी दि. ०२ सप्टेंबर, २०१५ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार अग्निशामक विमोचक, गट- क (फायरमन) या पदाची वेतनश्रेणी व सेवाप्रवेश नियम पृष्ठ क्र. १२३ प/वि वर कृपया पहावे. सेवाप्रवेश नियमानुसार याचिकाकर्ते सर्व श्री किशोर पाटील, श्री.मायकल सेबेस्टीन लोपीस, श्री. शिवाजी बांगो सातपुते हे तिघेही शैक्षणिक अर्हता, शालांत परीक्षा एम.एस.सी.आय.टी, मराठीचे ज्ञान असणे या तीन अटींची पुर्तता करतात. तथापि, " राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण असावा", ही अट जुलै, २०१७ मध्ये पूर्ण केल्याचे दिसून येते.

४. उपरोक्त तीन ठेका कर्मचारी यांनी दाखल केलेल्या या दाव्याविरूध्द प्रथम तत्कालीन नवघर-माणिकपूर नगरपरिषदेकडून व वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर म्हणजेच दि. ०३/०७/२००९ पासून वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून न्यायालयात वेळोवेळी बाजू मांडण्यात आली होती.

५. उपरोक्त याचिका क्र. (ULP) No. १०६/२००८ संदर्भात मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी दि. ३० सप्टेंबर, २०१५ रोजी आदेश पारित केला आहे. त्याअन्वये "The respondent No १ (VVCMC) to २(Commissioner,

VVCMC) are hereby directed to absorb the complainants and make them permanent on the post on which they are working with the respondents since the date of filing of the complaint i.e. from १४.०५.२००८ on or before १५th December, २०१५. The respondents are further directed to fix the complaints in permanent scale of the Firemen and grant them notional increments from the date of complaint without any monetary benefits or difference however the complainants will be entitle for the monetary benefits of permanency since the date of implementation of order" असे मा. औद्योगिक न्यायालयाच्या आदेशात नमूद आहे.

तद्नंतर औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी (ULP) No. १०६/२००८ अंतर्गत दि. ३०/०९/२०१५ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने श्री. किशोर आलो पाटील ,श्री. मायकल सेबिस्टीन लोपिस व श्री. शिवाजी बांगो सातपुते (ठेका फायरमन) यांनी मा.मुंबई उच्च न्यायालय येथे अवमान याचिका क्र. २८४/२०२२ दाखल केली होती. सदर अवमान याचिका अपिलकर्ते यांनी मागे घेतल्याने मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दि. १८/१०/२०२२ रोजी सदरची याचिका Disposed of केलेली आहे.

वरील बाबी विचारात घेता औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी (ULP) No. १०६/२००८ अंतर्गत दि. ३०/०९/२०१५ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने श्री. किशोर आलो पाटील ,श्री. मायकल सेबिस्टीन लोपिस व श्री. शिवाजी बांगो सातपुते (ठेका फायरमन) यांनी औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे दाखल कम्प्लेट नं. १६४ ऑफ २०२३, १६५ ऑफ २०२३ व १६६ ऑफ २०२३ विरुद्ध मे. मुंबई उच्च न्यायालयात अपिल करणेस झालेला विलंब क्षमापित करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत याचिका क्र. १८४२/२०२५ अन्वये मे.मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलेली होती.

सदर याचिके संदर्भात मा. उच्च न्यायालय यांनी महानगरपालिकेचा विलंब क्षमापित करणेस अमान्य केले आहे व दि. १३/०२/२०२५ रोजी आदेशातील मुद्दा क्र. ५ नूसार Even if the aspect of delay is ignored and the merits of the petition are considered, it is seen that the Respondent-employees have been working with the Petitioner-Municipal Corporation continuously since १९९८ as Firemen, without any break in their service. They have been working continuously for the last २७ long years and it is high time that they are absorbed in the municipal service. The Industrial Court had recorded a finding of fact about existence of the vacant permanent posts for absorption of the Respondents. Even going by the judgment of the Constitution Bench in Secretary, State of Karnataka Vs. Umadevi and ors.[1], Respondents have completed more than १० years of service without intervention of any Court order and are eligible to be made permanent. Therefore, the impugned judgment and order passed by the Industrial Court otherwise does not suffer from any serious infirmity so as to warrant interference by this Court in exercise of extra-ordinary jurisdiction under Article २२७ of the Constitution of India असे नमूद करुन याचिका निकाली काढण्यात आली आहे.

वरील बाबी पाहता असे स्पष्ट होते की, मा. औद्योगिक कामगार न्यायालय ठाणे यांनी याचिका क्र.(ULP) No. १०६/२००८ अंतर्गत दि. ३०/०९/२०१५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे या महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील श्री. किशोर आलो पाटील , श्री. मायकल सेबिस्टीन लोपिस दोन्ही तत्कालीन ड्रायव्हर/ ऑपरेटर फायरमन तसेच श्री. शिवाजी बांगो सातपुते तत्कालीन फायरमन या तिन्ही ठेका कर्मचाऱ्यांना वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कायम सेवेत त्यांनी मुळ याचिका दाखल केल्याच्या दिनांकापासुन म्हणजेच दि. १४/०५/२००८ पासून घेणेबाबत आदेशित केले आहे.

तसेच या तीन्ही ठेका कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केलेपासून फायरमन या पदाची प्रतिकात्मक (Notional) वेतनवाढी मंजूर कराव्यात. तथापि, कोणतीही फरकाची रक्कम देण्यात येऊ नये मात्र त्यांना दि. १५/०१/२०१५ पर्यंत सेवेत नियमित केल्याचे आदेश काढावेत व सेवेत नियमित केल्याच्या दिनांकापासून वेतन निश्चिती लागू होईल, असे स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीबीसी-२०२४/प्र.क्र.७५/१६-क, दि. २७/०२/२०२४ अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाकरीता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी १०% आरक्षण विहित केलेले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेत ठेकेपद्धतीवर कार्यरत असलेल्या अग्निशमक विमोचक या संवर्गातील रिक्त पदे व आरक्षण मा. सहाय्यक आयुक्त (मावक) कोकण विभाग, कोकण भवन, नवि मुंबई यांचेकडुन बिंदूनामावली तपासुन घेतलेली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

दि. ३१/१२/२०२२ अखेरचा गोषवारा

मंजूर पदे- १४७ सेवानियम १००% प्रमाणे मंजूर पदे-१४७भरलेली पदे -०१ रिक्त पदे-१४६

अ क्र	तपशील	अ.जा. १०%	अ.ज २२%	वि.जा.अ ३%	भ.ज.ब २.५%	भ.ज.क ३.५%	भ.ज.ड २%	वि.मा.प्र. २%	इमाव १५%	खुलाअराखीव / ४०%	एकूण १००%
१	मंजूर पदे	१५	३२	०४	०४	०५	०३	०३	२२	५९	१४७
२	भरलेली पदे	०१	--	--	--	--	--	--	--	--	०१
३	एकूण भरावयाची पदे	१४	३२	०४	०४	०५	०३	०३	२२	५९	१४६

(आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस)आरक्षण गणना पत्रक)

एकूण भरावयाची पदे	ईडब्ल्युएसकरीताएकूण भरावयाच्या पदांच्या १०टक्केनुसारयेणारी पदे
१४६	१४.६०पुर्णाकांत १५ पदे

एकूण भरावयाची पदे

तपशील	अ.जा. १०%	अ.ज २२%	वि.जा.अ ३%	भ.ज.ब २.५%	भ.ज.क ३.५%	भ.ज.ड २%	वि.मा.प्र. २%	इमाव १५%	ईडब्ल्यूएस १०%	अराखीव ३०%	एकूण
भरावयाची पदे	१४	३२	०४	०४	०५	०३	०३	२२	१५	४४	१४६

मा. सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, कोकण विभाग, कोकण भवन यांनी उपरोक्त अनु.क्र. ६ मध्ये सर्वसाधारण सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये सरळसेवा भरती करतांना समांतर आरक्षण विचारात घ्यावे , अशा सूचना दिलेल्या आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. राआधो-४०२४/प्र.क्र.१४/१६-अ, दि. २५/०१/२०२४ मधील मुद्दा क्र. ७ मध्ये समांतर आरक्षणासंदर्भातील अनुसरावयाची कार्यपद्धती व त्या बाबतच्या मार्गदर्शक सूचना शासकीय / निमशासकीय सेवा, मंडळे / महामंडळे / नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हा परिषदा / शासकीय अनुदानाप्राप्त संस्था / विद्यापीठे / सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू आहे. तथापि, विविध न्यायालयीन प्रकरणे तसेच निवेदने या माध्यमातून समांतर आरक्षणाची पदे भरण्यात येत नसल्याबाबत अथवा समांतर आरक्षण धोरणाची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नसल्याची बाब निदर्शनास आल्याचे नमूद आहे. त्यानुसार शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण अंमलबजावणीसाठी संबधित प्रशासकीय विभागाने दिलेल्या सूचना नूसार काटकोर कार्यवाही संबधित नियुक्ती प्राधिकाराने करावी.

प्रत्येक पद भरती वेळी भरावयाच्या रिक्त पदांवर समांतर आरक्षणातील सर्व घटकांसाठी विहित केलेल्या प्रमाणानूसार पदे दर्शविण्यात येतील याची खातरजमा नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेचा सुधाधित आकृतीबंध दि. ०९/०९/२०१४ रोजी मंजूर झाला आहे. मंजूर आकृतीबंधातील अग्निशमन विमोचक या पदाचे सेवाप्रवेश नियम संचालक, अग्निशमन संचालनालयकडून विहित करण्यासाठी पत्र क्र.वविशम/आस्था./११६३/२०१५, दि. ०९/०३/२०१५ रोजी मागविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन संचालक, अग्निशमन संचालनालय यांचे पत्र क्र. मअसे/२०१५/३२-एफ/१३०९, दि. ०२/०९/२०१५ अन्वये अग्निशमन दलासाठी मंजूर केलेले अग्निशमन विमोचक याचे सेवा प्रवेश नियम खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	पदनाम / वेतनश्रेणी	नेमणूकीची अर्हता
१.	अग्निशमक विमोचक (गट क) वेतन रु. ५,२०० – २०,००० ग्रेड पे रु. १९०० ऑनकॉल पे रु. १००/- जाखीम भत्ता रु. १००/- युनिफॉर्म अपकीय रु. १५०/- **किंवा** शासनाने प्रत्यक्ष मंजूर केलेली वेतनश्रेणी नामनिर्देशन ७५% पदोन्नती २५%	**नामनिर्देशन :-** १. माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) उत्तीर्ण असणे आवश्यक. २. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करणे आवश्यक. ३. एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण असावा. ४. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. **किमान शारीरिक पात्रता :-** १. उंची १६५ से.मी (महिला उमेदवारांची उंची १६२ से.मी) २. छाती साधारण ८१ से.मी. फुगवुन ५ से.मी जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.) ३. वजन ५० कि.ग्र. ४. दृष्टी चांगली ५. वय २५ वर्षापेक्षा जास्त नसावे. **पदोन्नती :-** अग्निशामक विमोचक या पदावर किमान ५ वर्ष नियमित सेवा पुर्ण झालेल्या व वरील शैक्षणिक व शारीरिक अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर पदोन्नतीने नियुक्ती. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.

महानगरपालिकेच्या सुधारित आकृतीबंध व वसई विरार शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण) नियम २०१४, दि. ०९/०९/२०१४ रोजी मंजूर झालेले आहेत. प्रस्तावातील श्री. किशोर आलो पाटील , श्री. मायकल सेबिस्टीन लोपिस व श्री. शिवाजी बांगो सातपुते (ठेका फायरमन) यांची शैक्षणिक अर्हता व अन्य तपशिल खालील प्रमाणे आहेत.

अ. क्र.	नाव व पदनाम	अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन संचालक, अग्निशमन संचालनालय दि. ०२/०९/२०१५ अन्वये विहित केलेली शैक्षणिक अर्हता	धारण करित असलेली शैक्षणिक अर्हता	शेरा
१.	श्री. किशोर आलो पाटील	१. माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) उत्तीर्ण असणे आवश्यक. २. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन मुंबई यांचा ६ महिने	१. माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) उत्तीर्ण (मार्च १९९४) २. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन मुंबई यांचा ६	पात्र

		कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करणे आवश्यक. ३. एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण असावा. ४. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.	महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण (जुलै २०१७) ३. एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण असावा (एप्रिल २००८) ४. मराठी भाषेचे ज्ञान आहे.	
२.	श्री. मायकल सेबिस्टीन लोपिस	१. माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) उत्तीर्ण असणे आवश्यक. २. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करणे आवश्यक. ३. एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण असावा. ४. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.	१. माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) उत्तीर्ण (मार्च १९९४) २. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण (जुलै २०१७) ३. एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण (एप्रिल २००८) ४. मराठी भाषेचे ज्ञान आहे.	पात्र
३.	श्री. शिवाजी बांगो सातपुते	१. माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) उत्तीर्ण असणे आवश्यक. २. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करणे आवश्यक. ३. एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण असावा. ४. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.	१. माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) उत्तीर्ण (ऑक्टो १९८९) २. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण (जून २००३) व (जुलै २०१७) ३. एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण (एप्रिल २००८) ४. मराठी भाषेचे ज्ञान आहे.	पात्र

६. उपरोक्त तिनही कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्याकरिता दि. ०९/०९/२०१४ रोजीच्या मंजूर आकृतीबंधनुसार दि. ३१/१२/२०२२ अखेर अग्निशमक विमोचक (Fireman) ची १४६ पदे रिक्त आहेत. तसेच त्याच दिनांकाच्या सेवाप्रवेश नियमातील शैक्षणिक व शारिरीक पात्रतेची अर्हता श्री. किशोर आलो पाटील , श्री. मायकल सेबिस्टीन लोपिस व श्री. शिवाजी बांगो सातपुते यांनी जुलै २०१७ पुर्ण केलेले आहे.

७. उपरोक्त वस्तुस्थिती पाहता असे स्पष्ट होते की, श्री. किशोर आलो पाटील ,श्री. मायकल सेबिस्टीन लोपिस व श्री. शिवाजी बांगो सातपुते यांना मा. औद्योगिक न्यायालय ठाणे, दि. ३०/०९/२०१५ रोजीच्या निर्णयात नमूद केल्याप्रमाणे दि. १४/०५/२००८ पासून म्हणजेच नवघर-माणिकपुर नगरपरिषदेच्या सेवेपासून पुढे महानगरपालिकेच्या सेवेत फायरमन या पदावर सामावुन घेणे शक्य आहे.

८. मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार श्री. किशोर आलो पाटील , श्री. मायकल सेबिस्टीन लोपिस व श्री. शिवाजी बांगो सातपुते यांना फायरमन या पदावर समावेशनानंतर १४/०५/२००८ ते दि. १५/१२/२०१५ पर्यंतच्या काल्पनिक वेतन वाढ (Notimal Incremant) देऊन त्या अनुषंगाने दि. १६/१२/२०१५ पासून पुढे देय व अनुज्ञेय असलेले सर्व आर्थिक लाभ दयावे लागतील. सदर देय रकमेची परिगणना केली असता उक्त ३ कर्मचाऱ्यांना दि.१५/१२/२०१५ पासून देण्यात आलेले वेतन वजा करुन साधारणत: रु.२४,००,०००/- प्रति कर्मचारी म्हणजेच अंदाजे एकुण रु. ७२,००,०००/- एवढी रकमेचा आर्थिक भार पडणार आहे.

९. शासन नगर विकास विभागाचे दि. १३/११/२०२५ च्या पत्रात निर्देशित केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नियम ५१ ते ५४ मधील तरतुदीनुसार पद भरती करण्याचे अधिकार महानगरपालिकेस असल्याचे नमूद करुन सदर प्रकरणी विधीज्ञांचा सल्ला घेऊन मा. न्यायालयाच्या अवमान होणार नाही याची दक्षता घेऊन नियमोचित कार्यवाही करण्याबाबत म्हटले आहे.

१०. सदर मा. न्यायालयाचा निर्णय केवळ उपरोक्त ३ कर्मचाऱ्यांचा लागु राहील.

ठराव/निर्णय :- मा. औद्योगिक न्यायालयाच्या याचिका क्र.(ULP) No. १०६/२००८ अंतर्गत दि. ३०/०९/२०१५ व मा. उच्च न्यायालय याचिका क्र. १८४२/२०२५ अन्वये दिलेल्या न्यायालयाच्या निर्णयानुसार उपरोक्त श्री. किशोर आलो पाटील , श्री. मायकल सेबिस्टीन लोपिस व श्री. शिवाजी बांगो सातपुते यांना फायरमन या पदावर दि.१३/०५/२००८ पासून महानगरपालिकेच्या आस्थापनेवर समावेशन करण्यात येत आहे.

तसेच मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार श्री. किशोर आलो पाटील , श्री. मायकल सेबिस्टीन लोपिस व श्री. शिवाजी बांगो सातपुते यांना फायरमन या पदावर समावेशनानंतर १४/०५/२००८ ते दि. १५/१२/२०१५ पर्यंतच्या काल्पनिक वेतन वाढ (Notional Increment) देऊन त्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेने लागू केलेल्या अग्निशमन सल्लागार, मुंबई कार्यालयाचे सेवा प्रवेश नियमानूसार राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन मुंबई यांचा ६ महिने कालावधीचे अग्निशमन प्रशिक्षण जुलै, २०१७ मध्ये पूर्ण झालेले असल्याने शैक्षणिक अर्हता पुर्तता केल्याच्या दिनांकापासुन आर्थिक लाभ देण्यात यावेत.

सुचकाचे नांव :- प्रविण शेटटी

व स्वाक्षरी :-

अनुमोदकाचे नांव :- मनोज पाटील

व स्वाक्षरी :-

अनुकुल संख्या : - ---------- प्रतिकुल संख्या :- ---------- तटस्थ संख्या :- ----------

ठराव / सर्वानुमते / बहुमताने/ मंजुर / नामंजुर

(अजिव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १० **सभा सुचना क्र. ८** **दिनांक : २२/०५/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी सर्वसमावेशक शहर वाहतूक आराखडा Comprehensive Mobility Plan (CMP) राबविण्याकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.

वसई-विरार हे शहर पालघर जिल्ह्यातील शहर आहे बृहन्मुंबईच्या उत्तरेकडे वसलेले आहे. वसई-विरार शहराचे एकूण क्षेत्रफळ 311 चौ. किमी आहे. वसई-विरार शहर हे बृहन्मुंबई व मीरा-भाईंदर ह्या शहरांपासून वसई खाडी मुळे वेगळे झाले आहे रेल्वे सेवा व मुंबई अहमदाबाद ह्या राष्ट्रीय महामागनि मुंबईला जोडलेले आहे. तसेच वसई दिवा रेल्वे लाईन मुळे नवी मुंबई, ठाणे, भिवंडी, कल्याण व पनवेल ह्या शहरांना जोडलेले आहे. वसई विरार शहर हे अति झपाट्याने वाढत असलेले शहर आहे. वसई विरार उपप्रदेश्याच्या उत्तरेस वैतरणा नदी आहे. दक्षिणेस वसई खाडी आहे, पश्चिमेस अरबी समुद्र असून, प्रदेशाच्या पूर्वेकडील सीमेस ससुनवघर पासून चांदीप गावापर्यंत संपूर्ण जंगलांनी व्यापलेली तुंगार पर्वतश्रेणी आहे. प्रदेशाच्या पूर्वेस अनेक टेकड्या आणि तुरळक शिखरे दिसून येतात. चिंचोटी धबधबा तुंगारेश्वर मंदिर, व घनदाट जंगल यामुळे पूर्वेकडील भागात पर्यटनदृष्ट्या विकास करण्यास उत्तम संधी निर्माण झाली आहे.

३ जुलै २००९ रोजी ४ नगरपरिषदा आणि ५३ गावांचा समावेश असलेल्या नगरपालिका मिळून वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना झाली. वसई-विरार शहर महानगरपालिकेला "क" वर्ग महानगरपालिका म्हणून घोषित करण्यात आले आहे. वसई-विरार शहर महानगरपालिकेचे भौगोलिक क्षेत्र-३११ चौरस किमी. एवढे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेची लोकसंख्या एकूण १२.२२ लाख एवढी असून सध्याची अंदाजित लोकसंख्या १९.८५ लाख एवढी आहे. वसई विरार उपप्रदेशातील २१ गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करण्यात आले आहे. विशेष नियोजन प्राधिकरण सह क्षेत्रफळ :- ३८० चौ. किमी.

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत एकूण ४ रेल्वे स्टेशन येतात. या स्टेशन वरुन दररोज अंदाजे २ ते ३ लाख प्रवासी ये-जा करीत असतात. या प्रवाशांकरिता रेल्वे स्टेशन पर्यंत ये-जा करण्याकरिता सार्वजनिक परिवहन, रिक्षा व खाजगी वाहनांचा वापर केला जातो. महानगरपालिका कार्यक्षेत्रात मोठया प्रमाणात रस्त्याचे जाळे पसरलेले आहे. शहराची स्वतंत्र परिवहन व्यवस्था आहे. या परिवहन व्यवस्थेमार्फत महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण अंदाजे १२० बसेस शहरातील सार्वजनिक ठिकाणी वाहतूक केली जाते. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंदाजे ४२,००० रिक्षा आहेत. तसेच चार रेल्वे स्टेशन परिसरात अपुऱ्या वाहनतळामुळे दिवसेंदिवस वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. महानगरपालिका कायक्षेत्रात नागरिकांना चालण्यासाठी पदपथ निर्माण करणे व पदपथ हे सुस्थितीत ठेवणे गरजेचे आहे. शहरातील बऱ्याचा भागामध्ये रस्ते हे अरुंद असल्यामुळे सकाळ सायंकाळी वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत असते. राष्ट्रीय महामार्गावरुन शहरात येणारे नायगाव/वसई नालासोपारा/ विरार फाटा या ठिकाणावरुन येताना नेहमी वाहतूक कोंडी अनुभवास येत असते.

१. <u>सद्यस्थिती आणि आव्हाने (Current Scenario & Challenges)</u>

सध्या वसई-विरारमध्ये रस्ते वाहतुकीची कोंडी, अपुरे पदपथ, अनधिकृत पार्किंग आणि पूर्व-पश्चिम जोडणीसाठी असलेल्या मर्यादित पर्यायांमुळे नागरिकांना दैनंदिन प्रवासात अडचणी येत आहेत. शहरातील अंतर्गत वाहतूक प्रामुख्याने रिक्षा आणि खाजगी वाहनांवर अवलंबून असल्याने प्रदूषणात वाढ होत आहे. तसेच, रेल्वे स्थानकांभोवती होणारी गर्दी आणि अपुरी 'लास्ट-माईल' कनेक्टिव्हिटी हे या क्षेत्रापुढील मोठे आव्हान आहे.

२. <u>आराखड्याची उद्दिष्टे (Objectives of the CMP)</u>

सर्वसमावेशक शहर वाहतूक Comprehensive Mobility Plan (CMP) आराखड्याचे मुख्य उद्दिष्ट केवळ रस्ते बांधणे नसून, **'लोकांची गतिशीलता' (Mobility of People)** वाढवणे हे आहे. याची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :

- **शाश्वत वाहतूक व्यवस्था** :- सार्वजनिक वाहतूक (VVMT), सायकलिंग आणि पादचारी मार्गांना प्राधान्य देणे.
- **एकात्मिक नियोजन** :- रेल्वे, बस, रिक्षा आणि नियोजित मेट्रो यांमध्ये समन्वय साधून अखंड प्रवासाचा अनुभव देणे.
- **सुरक्षितता** :- अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी ब्लॅक स्पॉट्स शोधणे आणि सुरक्षित जंक्शन्स डिझाइन करणे.

- **पर्यावरण रक्षण:** कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांना (EV) प्रोत्साहन देणे.

३. नियोजनाचा दृष्टिकोन (Strategic Approach)

सर्वसमावेशक वाहतूक आराखडा केंद्र सरकारच्या **'नॅशनल अर्बन ट्रान्सपोर्ट पॉलिसी' (NUTP)** व **Ministry of Housing and Urban Affairs** मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून तयार केला जातो. यामध्ये आधुनिक तंत्रज्ञान जसे की, 'इंटेलिजंट ट्रान्सपोर्ट सिस्टीम' (ITS) आणि 'ट्रॅफिक सिम्युलेशन मॉडेलिंग'चा वापर करून पुढील २० ते ३० वर्षांच्या वाहतुकीचा अंदाज वर्तवण्यात येतो.

४. अभ्यासाची व्याप्ती (Scope of Work)

या आराखड्यांतर्गत शहराच्या वाहतूक व्यवस्थेचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी खालील बाबींचा समावेश होतो :-

- **डेटा संकलन :-** संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि रस्त्यांच्या जाळ्याची माहिती जमा करणे.
- **वाहतूक सर्वेक्षण :-** प्रमुख चौकांमध्ये (Junctions) गाड्यांची गणना करणे आणि प्रवाशांच्या प्रवासाच्या पद्धती समजून घेणे.
- **सार्वजनिक वाहतूक अभ्यास :-** बस मार्ग (VVMT), रेल्वे स्थानकांची क्षमता आणि रिक्षा स्टँडचे नियोजन तपासणे.
- **पादचारी आणि सायकलिंग :-** पादचारी मार्गांची उपलब्धता आणि सायकल ट्रॅकसाठी संभाव्य जागांचा शोध घेणे.
- **भविष्यकालीन अंदाज :-** पुढील 20 ते 30 वर्षांतील लोकसंख्या वाढ लक्षात घेऊन वाहतुकीच्या गरजांचे मॉडेलिंग करणे.

५. विद्यमान स्थितीचे विश्लेषण (Existing Situation Analysis)

सध्याच्या परिस्थितीचा अभ्यास करताना खालील मुख्य समस्या समोर येतात:

- **वाहतूक कोंडी (Congestion) :-** वसई, नालासोपारा आणि विरार रेल्वे स्थानकांच्या बाहेरील भागात आणि मुंबई-अहमदाबाद हायवेला जोडणाऱ्या रस्त्यांवर प्रचंड कोंडी.
- **पूर्व-पश्चिम जोडणीचा अभाव :-** रेल्वे लाईन ओलांडण्यांसाठी असलेल्या पुलांची (ROB) कमी संख्या, ज्यामुळे प्रवासाचा वेळ वाढतो.
- **अनधिकृत पार्किंग :-** रस्त्यांच्या कडेला होणाऱ्या पार्किंगमुळे रस्त्याची वहनक्षमता (Capacity) कमी होणे.
- **अपुरे पदपथ :-** अनेक ठिकाणी पादचाऱ्यांसाठी सुरक्षित फुटपाथ नसल्यामुळे नागरिक जीव धोक्यात घालून रस्त्यावरून चालतात.
- **रिक्षांचे वर्चस्व :-** सार्वजनिक बस सेवेपेक्षा शेअर रिक्षांवर अधिक अवलंबित्व, ज्यामुळे वाहतुकीचे नियोजन विस्कळीत होते.

६. प्रस्तावित उपाययोजना (Proposed Recommendations)

शहराच्या वाहतुकीचा चेहरामोहरा बदलण्यासाठी खालील उपाययोजना:-

➢ पायाभूत सुविधा विकास

- **नवीन उड्डाणपूल (ROB/Flyovers):-** पूर्व आणि पश्चिम जोडणी वाढवण्यासाठी नवीन रेल्वे ओव्हरब्रीज बांधणे.
- **मिसिंग लिंक्स जोडणे :-** शहरातील अंतर्गत रस्ते एकमेकांना जोडून पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे.
- **पार्किंग सुविधा**
- **वाहतूक केंद्र**
- **टर्मिनल सुविधा**
- **नवीन रस्ते**
- **रस्ते रुंदीकरण**
- **सब-वे (भुयारी मार्ग)**
- **रेल्वे उड्डाणपूल**
- **रेल्वे स्थानक परिसर सुधारणा योजना**
- **Bullet Train - LAP नुसार विकास करणे.**
- **महानगरपालिकेमध्ये ICCC केंद्र कार्यान्वित करणे.**

➢ **सार्वजनिक वाहतुक सुधारणा**

- ❖ **बस प्रायोरिटी लेन** :- गर्दीच्या रस्त्यांवर बससाठी वेगळी मार्गिका तयार करणे.
- ❖ **मेट्रो कनेक्टिव्हिटी** :- आगामी मेट्रो मार्ग क्र. १३ भाईंदर-चिखलडोंगरी यांमधिल येणारे मेट्रो स्टेशन हे रेल्वे स्थानके आणि बस डेपो यांना जोडणे (Multimodal Integration).
- ❖ **प्रवास मागणी व्यवस्थापन** :- शहरातील प्रवाशी व्यवस्थापन अंतर्गत रेल्वे, सार्वजनिक वाहतूक व इतर मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशी यांचे योग् प्रकारे नियोजन करणे.
- ❖ **जल वाहतूक** :- शहरामधून होणारी जल वाहतूक यामध्ये जुचंद्र ते नवीमुंबई विमानतळ आणि भाईंदर जेटी व मांरबळपाडा जेटी यांचे योग्य प्रकारे नियोजन करणे.

➢ **मोटारविरहित वाहतक (NMT)**

- ❖ **सेफ स्कूल झोन** :- शाळांच्या परिसरातील रस्ते मुलांसाठी सुरक्षित करणे.
- ❖ **सायकल शेअरिंग** :- रेल्वे स्थानकांपासून घरापर्यंत जाण्यासाठी भाड्याने सायकल मिळण्याची सोय करणे.

➢ **तंत्रज्ञानाचा वापर (Smart Solutions)**

- ❖ **ITMS (Intelligent Traffic Management System):** सीसीटीव्ही आणि स्मार्ट सिग्नलद्वारे वाहतुकीवर नियंत्रण ठेवणे.
- ❖ **स्मार्ट पार्किंग:** मोबाईल ॲपद्वारे पार्किंगची जागा शोधण्याची आणि बुक करण्याची सुविधा देणे.
- ❖ **ICCC (Integrated Comand Control Central) स्थापन करणे.**

७. पार्किंग व्यवस्थापन (Smart Parking Management)

वसई-विरारमध्ये रस्त्यांवरील अनधिकृत पार्किंग हे वाहतूक कोंडीचे सर्वात मोठे कारण आहे.यावर खालील उपाययोजना प्रस्तावित आहेत :-

अ) पार्किंग धोरण (Policy):-

- ❖ **पार्किंग फी (Dynamic Pricing)** :- गर्दीच्या ठिकाणी (उदा. विरार स्टेशन परिसर) पार्किंग शुल्क जास्त ठेवणे आणि कमी गर्दीच्या ठिकाणी कमी ठेवणे.
- ❖ **ऑन-स्ट्रीट आणि ऑफ स्ट्रीट विभागणी** :- मुख्य रस्त्यांवर पार्किंगला पूर्ण बंदी करून अंतर्गत गल्ल्यांमध्ये किंवा रिकाम्या भूखंडांवर पार्किंगची सोय करणे.

ब) स्मार्ट पार्किंग तंत्रज्ञान :-

- ❖ **पार्किंग ॲप** :- नागरिकांना आपल्या मोबाईलवर कोणत्या पार्किंगमध्ये किती जागा रिकामी आहे, हे रिअल-टाइममध्ये पाहता येईल.
- ❖ **सेन्सर-आधारित जागा** :- प्रत्येक पार्किंग स्लॉटमध्ये सेन्सर बसवणे, जे जागा भरल्यावर सिस्टीमला कळवतील.
- ❖ **मल्टी-लेव्हल पार्किंग** :- रेल्वे स्थानकांच्या परिसरात कमी जागेत जास्त गाड्या बसवण्यासाठी स्वयंचलित (Automated) टॉवर पार्किंग बांधणे.

क) अंमलबजावणी :-

- ❖ **ई-चलन** :- नो-पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या गाड्यांचे फोटो काढून थेट मालकाच्या मोबाईलवर दंड पाठवणे.
- ❖ **डिजिटल पेमेंट** :- पार्किंग शुल्कासाठी रोख पैशांऐवजी फास्टॅग (FASTag) किंवा युपीआय (UPI) चा वापर करणे.

वसई-विरारला एक उच्चतम दर्जाचे, राहण्यायोग्य आणि गतिशील शहर बनवण्यासाठी सर्वसमावेशक शहर वाहतूक आराखडा Comprehensive Mobility Plan (CMP) एक महत्त्वपूर्ण दिशादर्शक ठरेल. हा केवळ एक तांत्रिक दस्तऐवज नसून, शहराच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीचा कणा ठरेल. तरी सर्वसमावेशक शहर वाहतूक Comprehensive Mobility Plan (CMP) आराखडा तयार करणेकरिता प्रकल्प व्यवस्थापक आणि तंज्ञ सल्लागार यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. तसेच शहर स्तरावर शहरी वाहतूक कक्ष (Urban Transport Cell) स्थापन करणे आवश्यक असून यामध्ये १) वाहतूक नियोजक (Transport

Planner) २) शहरी नियोजक (Urban Planner) ३) भौगोलिक माहिती प्रणाली तज्ञ (GIS Expert) ४) संगणक प्रणाली तज्ज्ञ (Software Expert) याचा समावेश असावा. तरी सर्वसमावेशक शहर वाहतूक Comprehensive Mobility Plan (CMP) आराखडा तयार करणेकरिता येणाऱ्या आर्थिक व प्रशासकिय खर्चास मंजूरीसाठी मा. महासभेपूढे सविनय सादर.

ठराव / निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी सर्वसमावेशक शहर वाहतूक आराखडा Comprehensive Mobility Plan (CMP) राबविण्याकरीता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबतच्या वाहन विभागाच्या प्रस्तावाचे वाचन करण्यात आले. त्यानुसार सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन ईओआय मागविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सुचक - प्रविण शेटटी

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ११ **सभा सुचना क्र. ८** **दिनांक : २२/०५/२०२६**

विषय :- भटक्या व मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण व रेबीज रोगाचे लसीकरण करणे, जखमी श्वानांना पकडून उपचार करणेकरिता वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये स्वतःच्या अथवा भाड्याच्या जागेवर श्वानांसाठी निवारा उभारून सदर ठिकाणी भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन असून, भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ यांची मान्यता प्राप्त संस्थाकडून सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या तीन आर्थिक वर्षासाठी नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून नसबंदी शस्त्रक्रियासाठी स्वारस्य अभिव्यती (EOI) प्रसिध्द करणेस, त्याकामी होणाऱ्या त्रैवार्षिक अंदाजित खर्चास प्रशासकीय तसेच जाहिर निवेदनाच्या अटी शर्तीस मान्यता मिळणेबाबत.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या व मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण व रेबीज रोगाचे लसीकरण करणे, जखमी श्वानांना पकडून उपचार करणेकरिता वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये स्वतःच्या अथवा भाड्याच्या जागेवर श्वानांसाठी निवारा उभारून सदर ठिकाणी भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया करणे, व भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ यांची मान्यता प्राप्त संस्थाकडून सन २०२६-२७. २०२७-२८ व २०२८-२९ या तीन आर्थिक वर्षासाठी नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून नसबंदी शस्त्रक्रियासाठी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रसिध्द करणेस मा. आयुक्त महोदय यांनी मान्याता दिलेली आहे.

परंतु जाहिर निविदेन मागविताना कामाचे दर निश्चित करणे आवश्यक आहे. भटक्या, जखमी/पिसाळलेल्या श्वानांना पकडणे, त्यांच्यावर उपचार करणे, लसीकरण करणे व पुन्हा जागेवर जाऊन सोडणे यासाठी सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदरच्या निविदेमध्ये भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानांना पकडणे, त्यांच्यावर उपचार करणे, लसीकरण करणे व पुन्हा जागेवर सोडणे यासाठी प्रशासकिय ठराव क्र.२५८२. दि.२७/०३/२०२५ रोजी रक्कम रु.७००/- एवढा दर निश्चित केलेला आहे. तसेच ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाने दि. ०५/०४/२०२२ अन्वये भटक्या श्वानांना पकडणे, त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन खानपान व्यवस्थाप करणे व पुन्हा जागेवर सोडणे या कामासाठी रक्कम रु.१६५०/- एवढा दर निश्चित केलेला आहे.

सबब, वसई विरार शहर महानगरपालिकेने भटक्या व मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण व रेबीज रोगाचे लसीकरण करणे, जखमी श्वानांना पकडून उपचार करणेकरिता स्वतःच्या अथवा भाड्याच्या जागेवर श्वानांसाठी निवारा उभारून सदर ठिकाणी भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया करणे याकामाकरीता २०० पिंजऱ्यांचे अद्यावत निर्बिजीकरण केंद्र उभारल्यास सदर केंद्र राबविण्यासाठी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

कामाचा तपशिल	दर	संख्या (प्रती दिन)	संख्या (प्रती महिना)	खर्च
निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन खानपान व्यवस्थापन करणे व पुन्हा त्याच जागेवर सोडणे.	१६५०	४०	१२००	१९,८०,०००/-
भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानांना पकडणे, त्यांच्यावर उपचार करणे, लसीकरण करणे व पुन्हा त्याच जागेवर सोडणे.	७००	८	२४०	१,६८,८००/-
			१ महिन्याचा खर्च	**२१,४८,०००/-**
			१ वर्षाचा खर्च	**२,५७,७६,०००/-**
			३ वर्षाचा खर्च	**७,७३,२८,०००/-**

सदरील दर दिल्यास अंदाजीत **त्रैवार्षिक रक्कम रु.७,७३,२८,०००/-** इतका खर्च होऊ शकतो. तरी सदरील खर्च सन २०२६-२७ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील **"मोकाट आणि पिसाळलेल्या जनावरांचा बंदोबस्त व मादी श्वान निर्बिजीकरण करण्यावरील खर्च"** या लेखाशिर्षाच्या अंतर्गत भागविणे शक्य आहे.

तसेच भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया करणेसाठी जाहिर निविदेन मागविणेस ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाने नमूद केलेल्या खालीलप्रमाणे असणाऱ्या अटी शर्तीस मान्यता देणे आवश्यक आहे.

१. भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानांना पकडणे, त्यांचेवर उपचार करणे, लसीकरणे करणे व पुन्हा जागेवर जाऊन सोडणे यासाठी **रक्कम रु.७००/-** एवढा दर निश्चित करण्यात आलेला आहे.

२. भटक्या श्वानांना पकडणे, त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया, खानापान व्यवस्था करणे व पुन्हा जागेवर सोडणे यासाठी रक्कम **रु.१६५०/-** एवढा दर निश्चित करण्यात आलेला आहे.

३. ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाने निश्चित केलेल्या दरामध्ये बदल झाल्यास (दर कमी झाल्यास) सदर प्रकल्पामध्ये पात्र होणाऱ्या संस्थांना कमी दराने काम करावे लागेल.

४. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया करणेसाठी ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक आहे. नियमावलीचे पालन न झाल्यास कायदेशीर प्रश्न उद्भवल्यास त्यास वसई विरार शहर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

५. ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाच्या दिनांक ०३/०६/२०२१ च्या मार्गदर्शन सूचनानुसार सदर प्रकल्पामध्ये भाग घेणाऱ्या संस्थांना किंवा यापूर्वी काम करत असलेल्या संस्थांना ABC & AR साठी AWBI ची स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक आहे. ABC & AR साठी ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाची स्वतंत्र परवानगीचे प्रमाणपत्र ३० दिवसात वसई विरार शहर प्रमाणपत्र ३० दिवसात महानगरपालिकाकडे सादर करणे आवश्यक आहे. सादर न केल्यास सदर संस्थांना अपात्र करण्यात येईल.

६. खाजगी संस्थेने उभारलेले इन्फ्रा (नसबंदी शस्त्रक्रिया करणेसाठी उभारण्यात आलेले पिंजरे, जागा) हे ॲनिमल वेल्फेबर बोर्ड ऑफ इंडिया यांच्या निकषाप्रमाणे असणे आवश्यक असून त्या बाबतचे प्रमाणपत्र महाराष्ट्र शासनाच्या पशु संवर्धन विभागा (SPCA) कडून प्रमाणपत्र घेऊन ३० दिवसात वसई विरार शहर महानगरपालिकाकडे सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र ३० दिवसात सादर न केल्यास सदर संस्थांना अपात्र करण्यात येईल.

७. Animal Birth Control (Dog) चे काम करणाऱ्या सर्व संस्थांनी मनपाने व मॉनिटरिंग कमिटीचे दिलेले निर्देश बंधनकारक राहील.

८. भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया, औषधोपचार खर्च, अँटी रेबीज लसीकरण करणे तसेच मनपाने निर्धारित केलेले बेल्ट खर्च, सेवकवर्गाच्या वेतनावर होणारा संपूर्ण खर्च, वाहन खर्च, इंधन खर्च करण्याची जबाबदारी नियुक्त होणाऱ्या संस्थेची राहील, याकरिता वसई विरार शहर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

९. खाजगी अशासकीय संस्थाकडून वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत उपयोगात आणणाऱ्या वाहनांना GPS लावणे बंधनकारक आहे.

१०. सदर पात्र ठरणाऱ्या संस्थांचे खाजगी इन्फ्रास्ट्रक्चर वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत अथवा हद्दीजवळ असावे (ग्रामपंचायत हद्दीत असल्यास सदर संस्थेला ग्रामपंचायत ना हरकत दाखला जोडणे बंधनकारक राहील) तसेच आरोग्य विभागाने ठरवून दिलेल्या परिमंडळ झोन/क्षेत्रीय कार्यालये येथे नसबंदी शस्त्रक्रिया करण्याकरिता श्वान पकडावे लागतील.

११. पात्र ठरणाऱ्या संस्थेना मनपाच्या आवश्यकतेनुसार व नियोजनाप्रमाणे नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचे काम वाटून दिले जाईल.

१२. संस्थेच्या कामावर आरोग्य खात्याचे नियंत्रण राहील.

१३. सदर प्रकल्पामध्ये पात्र ठरणाऱ्या सर्व संस्थांना जागतिक Zoonoses Day (६ जूलै) व जागतिक रेबीज डे (२८ सप्टेंबर) या दिवशी मोकाट व भटक्या श्वानांना मोफत लसीकरण करणे बंधनकारक राहील. त्यसाठी वसई विरार शहार महानगरपालिका कोणतेही रक्कम अदा करणार नाही.

१४. वरील अटी व शर्तीचा भंग झाल्यास सदर संस्थेला देण्यात आलेली कामे अथवा करण्यात आलेला करारनामा रद्द करण्याचे अथवा काम काढून घेण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

१५. प्रस्तुत प्रकरणे प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारण्याचा अथवा रद्द करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी राखुन ठेवले आहेत.

तरी वरीलप्रमाणे भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानांना पकडणे, त्यांचेवर उपचार करणे, निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे, लसीकरणे करणे व पुन्हा जागेवर जाऊन सोडणे याकामी होणाऱ्या त्रैवार्षिक रक्कम **रु.७,७३,२८,०००/- (अक्षरी रक्कम रु. सात कोटी त्र्याहत्तर लक्ष अठ्ठावीस हजार मात्र)** इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय तसेच जाहिर निवेदनाच्या अटी शर्तीस मान्यता मिळणेकामी सदच्या प्रस्तावस मा. महासभा शिफारस देत आहे.

ठराव / निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानांना पकडणे, त्यांचेवर उपचार करणे, निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे, लसीकरणे करणे व पुन्हा जागेवर जाऊन सोडणे याकामी होणा-या त्रैवार्षिक रक्कम **रु.७,७३,२८,०००/- (अक्षरी रक्कम रु. सात कोटी त्र्याहत्तर लक्ष अठ्ठावीस हजार मात्र)** इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय तसेच जाहिर निवेदनाच्या अटी शर्तीस मा. महासभा मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - प्रविण शेटटी

अनुमोदक - नरेंद्र पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२ **सभा सुचना क्र. ८** **दिनांक : २२/०५/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेस कचरामुक्त शहर (Garbage Free City GFC) '3' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) व स्वयंघोषित करणेकरिता मा. सर्वसाधारण सभेपुढे अंतिम प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

वसई विरार शहर महानगरपालिका मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १० दि. ३०/०४/२०२६ रोजी अन्वये महानगरपालिकेस कचरा मुक्त शहर (Garbage Free City - GFC) '३' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) करणे व सदर प्रस्ताव मंजूर करून नागरीकांच्या हरकती व सूचना प्राप्त करणेसाठी मंजूरी देण्यात आलेली आहे.

तद्नंतर सदर ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिकेस कचरा मुक्त शहर (Garbage Free City - GFC) '३' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) व स्वयंघोषित करण्यास दि. ०५/०५/२०२६ रोजी दै.महासागर व दै.आमची मुंबई या वृत्तपत्राद्वारे दि. ११/०५/२०२५ रोजी पर्यंत नागरीकांच्या हरकती/ सुचना मागविण्यात आल्या होत्या. तथापी, दिलेल्या कालावधीत कोणत्याही हरकती/ सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्र कचरा मुक्त शहर (Garbage Free City - GFC) '३' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) व स्वयं घोषित करणेकरिता अंतिम ठराव घेणे आवश्यक आहे.

सदर कामी अंतिम ठराव पारित करून शहरास कचरा मुक्त शहर (Garbage Free City - GFC) '३' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) व स्वयंघोषित करण्याचा ठराव व घोषणापत्र राज्य व केंद्रशासनास पाठविणे आवश्यक आहे.

तरी, स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ करिता वसई विरार शहरास कचरा मुक्त शहर (Garbage Free City - GFC) '३' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) व स्वयंघोषित करणे करिता अंतिम ठराव घेणे कामी व पुढील कार्यवाहीसाठी राज्य व केंद्रशासनास पाठविण्याचे घोषणा पत्र पाठविणेस प्रशासकीय मान्यतेसाठी ठराव करण्यात येत आहे.

ठराव / निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेस कचरा मुक्त शहर (Garbage Free City - GFC) '३' तारांकित मानांकन (Star Rating) चे प्रमाणिकरण (Certification) व स्वयंघोषित करणेस तसेच सदरचे घोषणापत्र राज्य व केंद्रशासनास पाठविणेस प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक - प्रविण शेटटी

अनुमोदक - मनोहर पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३ **सभा सुचना क्र. ८** **दिनांक : २२/०५/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जखमी जनावरांवर औषध उपचार करणेसाठी पशुवैद्यकिय दवाखाना उभारणेबाबत व याकामी होणाऱ्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत सद्यस्थितीत श्वानांची अंदाजित संख्या ८० हजार ते १ लक्ष इतकी व त्यापेक्षा जास्त असण्याची शक्यता असून शहरातील श्वानांची वाढती संख्या लक्षात घेता व शहरातील लहान मुले व वृध्दांवर श्वानांकडून केलेल्या हल्ल्याच्या व दंशाच्या तक्रारी दिवसें दिवस वाढत आहेत. सदर बाबत सन्मा. नगरसेवक व स्थानिक नागरीकांच्या देखील तक्रारी प्राप्त होत आहेत. वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत श्वानांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रेबीज लसीकरण करण्यासाठी २ केंद्र कार्यरत आहेत.

तथापी, सदर भटक्या व जखमी श्वानांवर तसेच इतर प्राण्यांवर उपचार करण्यासाठी पशुवैद्यकीय दवाखाने मनपा क्षेत्रात उपलब्ध नाहीत. त्यामुळे शहरातील मोकाट आणि जखमी प्राण्यांची वाढती संख्या, तसेच अपघातात वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे होणारे प्राण्यांचे मृत्यु एक गंभीर समस्या बनली आहे. या समस्येवर कायम स्वरूपी उपाययोजना करण्यासाठी महापालिकेचे एक सुसज्ज व आधुनिक पशुवैद्यकीय दवाखाना तयार करणे आवश्यक आहे. ॲनिमल बर्थ कंट्रोल रुल्स, २०२३ नियम ११ (९) नुसार प्रत्येक महानगरपालिकेने मोकाट श्वानांसाठी STERILIZATION, DEWORMING, VACCINATION सुविधा उभारणे आवश्यक आहे. महापालिका क्षेत्रात पशुवैद्यकीय दवाखाना उभारुन चालवल्यास मोकाट श्वानांवर आवश्यकतेनुसार लसीकरण्यासाठी तसेच इतर जनावरांवर वेळोवेळी उपचार उपलब्ध करुन देण्यासाठी मदत होईल. तसेच महापालिकेसाठी मंजूर आकृतीबंधात व्हेटर्नरी ऑफीसर असे एक पद मंजूर आहे परंतु सदर पद रिक्त असल्याने पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी आवश्यक मनुष्यबळ बाह्यस्त्रोतावद्वारे घेणे आवश्यक राहील. सदरचा पशुवैद्यकीय दवाखाना प्राथमिक स्तरावर उभारणेसाठी तसचे बांधकामा व्यतिरिक्त मनुष्य बळावर व इतर बाबीवर होणारा अंदाजित खर्च खालील प्रमाणे आहे. वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जखमी जनावरांवर औषध उपचार करणेसाठी पशुवैद्यकीय दवाखाना उभारणे करिता, इमारत दुरुस्ती / बांधकाम व अंतर्गत व्यवस्था, वैद्यकीय उपकरणे, शस्त्रक्रिया साहित्य व फर्निचर औषधे व लसीकरण साहित्य उपलब्ध करणे, वाहन / प्राणी (पकडणे) सुविधा, वार्षिक मनुष्यबळ व प्रशासकीय खर्च इतर अनुषंगिक अंदाजित खर्च रक्कम रू. १.०० कोटी इतका अंदाजित प्रारंभिक खर्च अपेक्षित आहे. सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ६, कलम ६६ (२३) मध्ये नमूद प्राण्यांसाठी अपंगालय किंवा रुग्णालये बांधणे किंवा चालवणे या अंतर्गत अनुज्ञेय आहे.

तरी, वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जखमी जनावरांवर औषध उपचार करणेसाठी पशुवैद्यकीय दवाखाना उभारणेबाबत व इमारत दुरुस्ती / बांधकाम व अंतर्गत व्यवस्था, वैद्यकीय उपकरणे, शस्त्रक्रिया साहित्य व फर्निचर, औषधे व लसीकरण साहित्य, वाहन / प्राणी (पकडणे) सुविधा, वार्षिक

मनुष्यबळ व प्रशासकीय खर्च अंदाजे रक्कम रू. १.०० कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणे कामी सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

ठराव / निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जखमी जनावरांवर औषध उपचार करणेसाठी पशुवैद्यकीय दवाखाना उभारणेबाबत व याकामी मनुष्यबळावर होणारा वार्षिक खर्च रक्कम रू. १.०० कोटी इतक्या होणाऱ्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेस मा. महासभा मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - प्रविण शेट्टी

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १४ **सभा सुचना क्र. ८** **दिनांक : २२/०५/२०२६**

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत मोकाट व जखमी श्वानांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे व जखमी श्वानांना औषध उपचार करणेसाठी उभारण्यात आलेले २ श्वान निर्बिजीकरण केंद्र व श्वान निवारा केंद्र तसेच नव्याने स्थापन करण्यात येणाऱ्या अतिरिक्त श्वान निर्बिजीकरण केंद्रावरील कामकाजावर नियंत्रण ठेवणेकरिता आस्थापना विभागामार्फत १ वेटरनरी डॉक्टराची नेमणूक करणेबाबत.

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मोकाट व जखमी श्वानांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे व जखमी श्वानांवर औषध उपचार करण्यात येतो. सद्यस्थितीत नवघर, पूर्व येथिल श्वान निर्बीजीकरण केंद्र मनपा मालकीचे एकमेव निर्बीजीकरण केंद्र आहे. सदर केंद्रामध्ये एकुण १६५ पिंजरे असल्याने साधारणतः प्रतिदिन २५ ते ३० श्वानांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया होणे आवश्यक आहे. परंतु शस्त्रक्रिया बरोबर जखमी श्वान, रेबीज झालेले श्वान, आजारी श्वान यांचेवर उपचार करणे देखील आवश्यक असल्याने सदर श्वान केंद्रामध्ये आणले जातात. अशा श्वानांना चार ते पाच दिवस केंद्रामध्ये ठेवले जाते. त्यामुळे निर्बीजीकरण शस्त्रक्रिया अपेक्षेप्रमाणे करणे अडचणीचे होत असल्यामुळे सदरबाबत उपाय-योजना म्हणून वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात सन २०२४-२५, २०२५-२६ व २०२६-२७ या तीन आर्थिक वर्षासाठी भटक्या व मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण व रेबीज रोगाचे लसीकरण करणे, जखमी श्वानांना पकडून उपचार करणेकरिता वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये स्वतःच्या अथवा भाड्याच्या जागेवर श्वानांसाठी निवारा उभारून सदर ठिकाणी भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया करणेसाठी प्रभाग सिमिती "एफ" मधील, पेल्हार येथील काशिद कोपर येथे केंद्र उभारण्यात आले आहे. सदर कार्य करतेवेळी शहरातील नागरीक थेट सदर केंद्राशी संपर्क करून तसेच कार्यालयाशी संपर्क करून भटक्या श्वानांवर नियंत्रण ठेवणेकरिता तक्रारी करीत असतात. यामध्ये शहरातील प्राणी प्रेमी यांची संख्या जास्त असून सदर प्राणी प्रेमी शासनाच्या ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडिया (AWBI) यांचे मान्यता प्राप्त (SPCA) सोसायटी फॉर द प्रिवेंशन ऑफ कृएल्टी टु ॲनिमल या संस्थेचे सदस्य असल्याने सदरच्या कामावर त्यांचे बारिक लक्ष असते. त्यामुळे AWBI यांचे नियमानुसार श्वानांचे निर्बीजीकरण करणे, त्यांचे स्थलांतर थांबविणे, श्वानांना मारणे इ. बाबत दक्ष असतात. त्यामुळे सदर विभागावर सद्यस्थितीत २ श्वान केंद्राच्या कार्यप्रणाली संभाळण्याचा भार पडत आहे.

याकरिता दोन्ही केंद्रावरील कामांवर नियंत्रण ठेवणे तसेच श्वानदंशाच्या तक्रारी प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. विभागाकडे एखादा श्वान रेबिजग्रस्त आहे. याबाबत एकही तांत्रिक दृष्ट्या योग्य असा B.V.Sc असा पदविधारक अधिकारी अगर कर्मचारी नाही त्यामुळे तात्काळ त्यासंबंधी निर्णय घेणे व उपाययोजना करणे अडचणीचे ठरते. त्यामुळे महानगरपालिका हद्दीत मोकाट व जखमी श्वानांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे व जखमी श्वानांना औषध उपचार करणेसाठी उभारण्यात आलेले २ श्वान निर्बीजीकरण केंद्र व श्वान निवारा केंद्र नव्याने स्थापन करण्यात येणा-या अतिरिक्त श्वान निर्बिजीकरण केंद्रावरील कामकाजावर नियंत्रण ठेवणेकरिता १ वेटरनरी डॉक्टराची नेमणूक करावी असे विभागास वाटते. तसेच मनपाच्या आस्थापना विभागात १ वेटरनरी डॉक्टरचे पद रिक्त आहे. सदरचे रिक्त पद सरळ सेवा भरतीमार्फत भरण्यात येईल. तथापि सद्यस्थितीत विभागाच्या दोन्ही केंद्रावरील कार्यप्रणालीचा भार सांभाळण्यासाठी आस्थापना विभागामार्फत १ वेटरनरी डॉक्टरची नियुक्ती केल्यास विभागाचे काम सोयीचे होईल.

तरी, वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत मोकाट व जखमी श्वानांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे व जखमी श्वानांना औषध उपचार करणेसाठी पशुवैद्यकिय अधिकारी या नात्याने श्वानांविषयक आरोग्याच्या सर्व बाबी हाताळण्याच्या दृष्टीने उभारण्यात आलेले २ श्वान निर्बीजीकरण केंद्र व श्वान

ठेवणेकरिता १ वेटरनरी डॉक्टर ६ माहेसाठी अंदाजित रक्कम रु.४०,०००/- या ठोक रकमेवर आस्थापना विभागाकडून नियुक्त करणेसाठी सदरच्या प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभा शिफारस देत आहे.

ठराव / निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत मोकाट व जखमी श्वानांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे व जखमी श्वानांना औषध उपचार करणेसाठी पशुवैद्यकिय अधिकारी या नात्याने श्वानांविषयक आरोग्याच्या सर्व बाबी हाताळण्याच्या दृष्टीने उभारण्यात आलेले २ श्वान निर्बीजीकरण केंद्र व श्वान निवारा केंद्र तसेच नव्याने स्थापन करण्यात येणाऱ्या अतिरिक्त श्वान निर्बिजीकरण केंद्रावरील कामकाजावर नियंत्रण ठेवणेकरिता १ वेटरनरी डॉक्टर ६ माहेसाठी अंदाजित रक्कम रु.४०,०००/- प्रती माहे ठोक रकमेवर आस्थापना विभागाकडून नियुक्त करणेस मा. महासभा मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - प्रविण शेट्टी

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १५ **सभा सुचना क्र. ८** **दिनांक : २२/०५/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वसई नवघर पूर्व येथे १००० श्वानांच्या क्षमतेचे निवारा केंद्र बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने 'City Hounded by Strays, Kids Pay Price' या याचिकेमध्ये सार्वजनिक ठिकाणे जसे की शाळा, रुग्णालये, क्रीडा संकुले आणि रेल्वेस्थानके येथील भटक्या कुत्र्यांचे तात्काळ व्यवस्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. या अनुषंगाने ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाने दिलेल्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार महानगरपालिका क्षेत्रात श्वानांच्या शास्त्रीय व्यवस्थापनासाठी कायमस्वरूपी निवारा केंद्र उभारणे बंधनकारक आहे.

वसई-विरार कार्य क्षेत्रातील भटक्या श्वानांची वाढती संख्या लक्षात घेता, १००० श्वानांच्या क्षमतेचे भव्य निवारा केंद्र उभारण्याचे हाती घेणे योग्य आहे.

सदर प्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरअंदाजपत्रकात १००० श्वानांसाठी निवारा शेडची व्यवस्था करण्यात आली असून त्यात श्वांनासाठी राहण्याच्या व्यतिरित कॉरंटाईन रुम, दवाखाना व स्टोरची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी अडॅमिनिस्ट्रेशन रुम व शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. सदर बांधकामाचा एकूण अंदाजित खर्च रु. ५,४५,८४,६४८/- इतका आहे. सदर निवारा केंद्र डम्पिंग ग्राऊंड साठी (आरक्षणक्र. ५७९) आरक्षित वसई नवघर (पूर्व.) येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर बांधण्यात येईल.

अंदाजपत्रकीयरक्कम :- रु. ५,४५,८४,६४८/-

दरसुची :- २०२२-२३

कामाचेस्वरूप :- १. निवारा शेड - १०० मि. लांब व ३३ मि. रुंद - पत्राशेड
अर्तभुतबाबी — जी. आय. पत्रे, स्ट्रक्टचरल स्टिल, वीट बांधकाम, एम.एस. ग्रील, ॲल्युमिनियम पार्टीशन, कोटा फ्लोरिंग, विद्युत विषयक बाबी, इफ्युलेंट ट्रीटमेंट प्लांट (ई.टी.पी.)
२. कर्मचाऱ्यासाठी ६ सीटचे शौचालय
अर्तभुत बाबी — वीट बांधकाम, प्लॉस्टर, आर.सी.सी. बीम, आर.सी.सी. स्लॅब इ.

मालकी :- व.वि.श.म

विकासआराखडयातील आरक्षण :- डम्पिंग ग्राउंड

तरी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वसई नवघर पूर्व येथे १००० श्वांनाच्या क्षमतेचे निवारा केंद्र बांधणे हा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) नुसार मा. महासभेपुढे प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव / निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वसई नवघर पूर्व येथे १००० श्वांनाच्या क्षमतेचे निवारा केंद्र बांधणे या रक्कम रु. ५,४५,८४,६४८/- इतक्या रक्कमेचे काम महानगरपालिका निधीतुन करणेस व सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवुन निविदेची कार्यवाही करणेस, तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

सुचक - प्रवीण शेट्टी

अनुमोदक - नरेंद्र पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६ **सभा सुचना क्र. ८** **दिनांक : २२/०५/२०२६**

विषय :- वसई विरार कार्यक्षेत्रातील दैनंदिन जमा होणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेकामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळण्याबाबत.

वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जूलै २००९ रोजी झाली आहे. वसई विरार शहर महानगरपालिका ४ नगरपारिषदा व ५३ ग्रामपंचायत मिळून तयार करण्यात आलेली आहे. महानगरपालिका स्थापनेपुर्वी प्रत्येक नगरपरिषदा व ग्रामपंचायत यांचे त्या त्या स्तरावर कचरा टाकण्याकरिता क्षेपण भुमी उपलब्ध होत्या. परंतु सदर क्षेपणभुमीवर जमा होणाऱ्या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी येत असल्या बाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे गोखिवरे, भोयदापाडा येथील सर्वे क्र.३० (अ), ३१, ३२ या जागेवर १९.३३ हेक्टर जागेवर एकत्रित क्षेपण भुमी तयार करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत वसई विरार कार्यक्षेत्रात वाढलेल्या लोकसंख्ये मुळे दैनंदिन अंदाजे १००० ते १२०० टन कचरा निर्मिती होत आहे. सद्यस्थितीत गोखिवरे, भोयदापाडा येथील क्षेपण भुमीची जागा अपूरी असून या क्षेपण भुमीवर पडुन राहिलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेचा प्रकल्प सुरु आहे. त्यामुळे सदर ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन संबंधित विविध प्रकल्प राबविणेकामी पर्याप्त जागा उपलब्ध नसल्या कारणाने तसेच शासनाने दिलेल्या निर्देशानुसार घनकचरा प्रकल्पांचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. याकरिता महापालिका कार्यक्षेत्रातील क्षेपण भूमी करिता उपलब्ध असलेल्या आरक्षित जागेवर ओला व सुका कचरा प्रक्रिया केंद्र उभारणे योग्य राहील. त्यानुसार वसई विरार कार्यक्षेत्रात निर्माण होणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे कामी ठेकेदाराची Design, Build, Finance, Operate, Transfer (DBFOT) तत्त्वावरील निविदे नुसार नेमणूक करुन दैनंदिन जमा होणाऱ्या प्लास्टिक कचरा पुर्नवापर करणे / प्लास्टिक पासून इंधन तयार करणे / ओल्या कचऱ्यापासून गॅस निर्मिती करणे / खत निर्मिती करणे/ विज निर्मिती करणे इत्यादी प्रकारे सदर कचऱ्याचा पुर्नवापर करता येणे शक्य होणार आहे.

स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत ओला कचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी ५५० टन प्रतिदिन क्षमतेचा प्रकल्प केंद्र करिता रु. ११.५० लक्ष/मेट्रीक टन या दराने रक्कम रु. ६३.५ कोटी इतका निधी मंजूर असून यामध्ये ३०% हिस्सा महापालिकेचा आहे. तसेच सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी ३२० टन प्रतिदिन क्षमतेचा प्रकल्प केंद्र करिता रु. ८.५० लक्ष/ मेट्रीक टन या दराप्रमाणे रक्कम रु. २७.२० कोटी मंजूरअसून यामध्ये ३० % महानगरपालिकेचा आहे. परंतु सद्यस्थितीत १००० ते १२०० टन प्रतिदिन घनकचरा शहरात निर्मित होत असून सदर क्षमतेचा प्रकल्प केंद्र उभारण्याकरिता एकूण रक्कम रु.१४५ कोटीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात आला असून सदर अहवाल तांत्रिक मंजुरीसाठी शासनास पाठविणेत आला आहे.

उपरोक्त शासनाद्वारे मंजूर करण्यात आलेला निधी केवळ केंद्र प्रकल्प उभारण्यासाठी आहे. प्रतिदिन निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेकामी आवश्यक टिपींग फीचा खर्च महापालिकेद्वारे करणे अपेक्षित आहे. सदरच्या ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे व विल्हेवाट लावणे याकरिता रक्कम रु. ७००/- प्रति टन प्रमाणे अंदाजित १००० टन कचऱ्यावर एका वर्षा करिता रक्कम रु.२५,५५,००,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

ठराव/निर्णय :- वसई विरार कार्यक्षेत्रातील दैनंदिन जमा होणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे व विल्हेवाट लावणे या करिता अंदाजित १००० टन कचऱ्यावर एका वर्षा करिता रक्कम रु.२५,५५,००,०००/- इतक्या रक्कमेच्या खर्चा सही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरीदेतआहे. त्यानुसार सदर कामाच्या निविदेची कार्यवाही करणेस, तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चा सही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.

सुचक - प्रविण शेट्टी

अनुमोदक - नरेंद्र पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १७ **सभा सुचना क्र. ८** **दिनांक : २२/०५/२०२६**

विषय :- मौजे भोयदापाडा, गोखिवरे येथील क्षेपणभूमीवर पडून राहिलेल्या कचऱ्यावर (Legacy waste Remediation) प्रक्रिया करणेकामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळण्याबाबत.

वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जूलै २००९ रोजी झाली आहे. सदर महानगरपालिका ४ नगरपारिषदा व ५३ ग्रामपंचायत मिळून तयार करण्यात आलेली आहे. महानगरपालिका स्थापनेपुर्वी प्रत्येक नगरपरिषदा व ग्रामपंचायत यांचे त्या त्या स्तरावर कचरा टाकण्याकरिता क्षेपणभुमी उपलब्ध होत्या. परंतु सदर क्षेपण भुमीवर जमा होणाऱ्या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी येत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे गोखिवरे, भोयदापाडा येथील सर्वे नं.३० (अ), ३१, ३२ या जागेवर १९.३३ हेक्टर जागेवर एकत्रित क्षेपण भुमी तयार करण्यात आले आहे.

केंद्र शासनाने "स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.०" अन्वये १० लाखा पेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या शहरांना साठवून ठेवलेल्या कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे कामी रु.५५०/- प्रतिटन इतका दर ठरवून देण्यात आलेला आहे आणि शासनाकडे महापालिकेने मान्यतेसाठी सादर केलेला दर रु. ५५०/- प्रती टन इतका असुन त्यामध्ये निर्माण होणाऱ्या RDF वर प्रक्रिया करणे व वाहतुक करणे या खर्चाचा समावेश आहे.

गोखिवरे येथील क्षेपण भुमीवरील महापालिकेमार्फत सन 2022 मध्ये पडून असलेल्या कचऱ्याचा केलेल्या सर्वेनुसार पाच लक्ष टन कचरापडून असलेला आहे असे निदर्शनास आले होते. त्यामुळे गोखिवरे येथील क्षेपण भुमीवरील पडून राहिलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे कामी Design, Build, Finance, Operate, Transfer (DBFOT) पध्दतीची निविदा प्रसिद्ध करून एजन्सी नेमून पडून राहिलेल्या कचऱ्यावर (Legacy waste) शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. सदरच्या क्षेपण भूमीवर पडून राहिलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग पद्धतीने प्रक्रिया करून विल्हेवाट लावणे याकरिता रक्कम रु. ५५०/- प्रती टन प्रमाणे ५ लक्षमेट्रीकटनकचऱ्यावरप्रकियाकरणेकामीरक्कमरु. २७,५०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरील खर्च सन २०२६-२७ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय घनकचरा व्यवस्थापन सॅनिटरी लैंडफिलद्वारे कचऱ्याची विल्हेवाट या लेखाशिर्षामधील तरतुद रक्कम मधून भागविणे शक्य आहे. सदर कामी होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजुरी देणेसाठी विषय मा. महासभेपुढे ठेवण्यास शिफारस आहे.

ठराव / निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मौजे भोयदापाडा, गोखिवरे येथील क्षेपण भूमीवर पडून राहिलेल्या कचऱ्यावर (Legacy waste Remediation) प्रक्रिया करणे कामी क्षेपण भूमीवर पडून राहिलेल्या ५ लक्ष मेट्रीक टन कचऱ्यावर बायोमायनिंग पद्धतीने प्रक्रिया करून विल्हेवाट लावणे याकरिता रक्कम रु. २७,५०,००,०००/- इतक्या रक्कमेच्या खर्चासही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरीदेत आहे. त्यानुसार सदर कामाच्या निविदेची कार्यवाही करणेस, तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.

सुचक - प्रविण शेट्टी

अनुमोदक - नरेंद्र पाटील

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा. सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र.----- १८ सभा सुचना क्र. ------- ०८ दिनांक : २२/०५/२०२६

विषय :- विनामोबदला वृक्ष छाटणी करणे तसेच छाटणी केलेला पालापाचोडा लाकुड फाटा उचलणे चे काम मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकाचे एकूण ३८० चौ. किलोमीटर इतके क्षेत्रफळ आहे. त्याअंतर्गत ९ प्रभाग समिती मध्ये २०१६ च्या वृक्षगणनेप्रमाणे १४ लक्ष इतक्या वृक्षांची नोंद झालेली आहे. तसेच शासनाच्या धोरणाप्रमाणे व देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार प्रत्येक वर्षी लागवड करण्यात येते. त्यानुसार मागील दहा वर्षामध्ये महानगरपालिका मार्फत अवनत वनक्षेत्रे, मोकळया जागा, रस्ता दुतर्फा व सार्वजनिक ठिकाणी सुमारे एकूण ६ लक्ष वृक्षांची लागवड करण्यात आली असून त्याप्रमाणे सद्यास्थितीत अंदाजे २० लक्ष वृक्ष अस्तित्वात आहेत.

महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील रस्त्यांच्या दुर्तफा सावली देणाऱ्या वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे. शहरातील रस्ता दुतर्फा असलेल्या झाडांच्या धोकादायक/सुकलेल्या फांद्या छाटणी करणे तसेच आपतकालीन परिस्थितीमध्ये नैसर्गिकरित्या पडलेल्या झाडांची तातडीने छाटणी करणे आणि छाटणी केल्यानंतर रस्त्यावर पडलेला पालापाचोळा व लाकुडफाटा उचलून रस्ता रहदारीसाठी मोकळा करणे इत्यादी कामे तातडीने करणे आवश्यक असते.

सदर एकूण ९ प्रभाग समिती करीता वृक्षांच्या फांद्या छाटणीकामी वृक्षप्राधिकरण विभागाकरीता १ मॅकलिफटन वाहन स्वमालकीचे व १ मॅकलिफटन वाहन भाडेतत्वावर उपलब्ध आहे. सदर वाहनावरती केवळ ७ मजूर उपलब्ध आहेत. सदर नियुक्त करण्यात आलेले मजूर मुळ आस्थापना, नवघर-माणिकपूर नगरपरिषद मध्ये सन २००३ पासून कार्यरत आहेत व महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासून सदर कर्मचाऱ्यांना ९ प्रभाग समिती मध्ये विभागून देण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर धोकादायक वृक्षांची छाटणी करीता नियुक्त असलेला कर्मचारी वर्ग अतिशय कमी व त्यापैकी बहुतांश कर्मचारी वयोवृध्द आहे. त्याअनुषंगाने, कामाकरीता कर्मचारी व साहित्य अतिशय अपुऱ्या प्रमाणात उपलब्ध असून सदर वृक्षछाटणी पालापाचोळा फांद्या, वेळोवेळी उचलणेकामी प्राप्त होणाऱ्या तक्रारी वेळेत पुर्ण करण्यास अडचण निर्माण होत आहे. सदर कामाकरीता मुनष्यबळ व साहित्यांची अत्यंत आवश्यकता आहे.

मे. एस. पी. झेड ग्रीन ऐन्रजी सोल्युशन एल. एल.पी. यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कापण्यात व छाटण्यात आलेल्या सर्व झाडांचा लाकूड फाटा विना मोबदल्यात (FREE OF COST) घेऊन जाणे बाबत कळविले आहे . सदर पत्राचे अवलोकन केले असता मनपा मार्फत छाटणी व कापणी करण्यात आलेल्या झाडांचे लाकूड तसेच झाडाचा लाकूडफाटा व मोठे ओंडके प्रथमत: नजीकच्या स्मशानभूमीत जमा करून जळाऊ योग्य नसलेले झाडाचे अवशेष डपिंग यार्ड मध्ये न फेकता कंपनीचा मॅन्युफक्चरिंग प्रोसेस मध्ये वापर करणार असल्याचे ज्याच्यामुळे झाडे व झाडांचे फांदयाचा कचरा होणार नाही व महानगरपालिकेचा खर्च वाचेल. तसेच याकामी महानगरपालिकेचे मनुष्यबळ, वृक्षांची छाटणी व कापणी झालेल्या फांदयाची विल्हेवाट करण्यासाठी मनपाच्या जागेचा वापर होणार नाही अशा संस्थांची महापालिकेत नोंदणी केल्यास सोसायटी **परिसरात पालापाचोळा /कचरा बायोगॅस** तसेच सोसायटी मधे असलेले झाडे कापून किंवा झाडेचे ट्रीमिंग करण्यांसाठी लागणारे खर्च सोसायटीकडून घेण्यात येईल व त्या-व्यतिरिक्त वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील धोकादायक वृक्षांची छाटणी व कापणी करून मोबदल्यात कापण्यात आलेल्या झाडांचे लाकूडफाटा मोफत उचलण्यास परवानगी एस.बी. झेड ग्रीन एनर्जी सोलूशन एल.एल.पी. संस्थेने परवानगी मागीतलेली आहे.

सदर या वर्षामध्ये वृक्षांची छाटणी कामाकरीता खर्च रक्कम रू. ६४ लक्ष/- इतका खर्च अपेक्षित धरून निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे परंतु सदर निवेदेमध्ये छाटणी व कापणी करण्यात आलेल्या वृक्षांची विल्हेवाट करण्याकरीता लागणारी यंत्रणा निवेदेत सामाविष्ट नाही .सदर विल्हेवाट करण्याची बाब निवेदेत सामाविष्ट केल्यास

प्रत्यक्ष कामाची व्याप्ती पाहता दरवर्षी दोन ते तीन कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. वरील नमूद संस्थेने सादर केलेल्या पत्रानुसार महापालिका कार्यक्षेत्रातील वृक्षांची छाटणी/कापणी चा कचरा विनामोबदला उचण्याची परवानगी मागीतली आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने, महापालिका कार्यक्षेत्रातील वृक्षांची छाटणी व कापणी संस्थेमार्फत केल्यास महापालिकेचे आर्थिक बचत होणार आहे. व ओला कचऱ्यांची विल्हेवाट करण्याकरीता लागणारी यंत्रणेचा ताण कमी होईल . तसेच ह्या कामाची महानगरपालिकेच्या झाडांचे साफ सफाई करिता होणारा खर्च वाचेल. सदर विभागामार्फत नियुक्त ठेकेदाराव्दारे धोकादायक वृक्षांची छाटणी व कापणी केल्यानंतर झाडांचे अवशेष व लाकूडफाटा स्मशानभुमी विभागास अवगत करावे. तद्नंतर स्मशानभुमी विभागास आवश्यक असलेला लाकूडफाटा संबंधीत कर्मचाऱ्यांमार्फत पाहणी करून उपयुक्त लाकूडफाटा जमा करण्यात आल्यानंतर शिल्लक असलेल्या वृक्षांच्या झावळ्या व स्मशानभुमी विभागास उपयुक्त नसलेले लाकूडफाटा संबंधीत संस्थेने स्वखर्चावर उचलणे व त्यांची विल्हेवाट करणे योग्य राहील. सदर काम करतेवेळी नमूद संस्थेने संबंधीत वृक्षप्राधिकरण विभाग, मुख्यालयाकडून वेळोवेळी वृक्षांची मंजूरी प्राप्त करून घेतल्याशिवाय कुठल्याही छाटणी करण्यात आलेल्या वृक्षांच्या फांद्या व झावळ्या तसेच लाकूडफाटा उचलणे वैध राहणार नाही. याकामा करीता महापालिकेमार्फत कुठल्याही प्रकारचे साहित्य, अवजारे व मनुष्यबळ देण्यात येणार नाही. तसेच विभागाने मंजूर केलेल्या वृक्षांची छाटणी करतेवेळी सदर संस्थेने संबंधीत विद्युत विभागाशी संपर्क साधून काम करणे योग्य राहील.

सदर पुर्व पावसाळी परिस्थती लक्षात घेता तसेच कामाच्या अनुषंगाने व प्राप्त होणाऱ्या धोकादायक वृक्षांची छाटणी व कापणी पोटी लाकूडफाटा संबंधीत संस्थेस देवून धोकादायक वृक्षांची फांद्या व लाकूडफाटा वेळेत उचलण्यास मदत होवून जागेची बचत व विल्हेवाट लावण्यास महापालिकेवर येणारा आर्थिक बोजा कमी करण्यास मदत होईल. त्याअनुषंगाने, वृक्षांची छाटणी केल्यावर निर्माण होणारा लाकूडफाटा व कचरा उचलून नेण्यासाठी EOI (स्वारस्य अभिरूची सुचना) मागविणेस सदरचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेत येत आहे.

ठराव निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील धोकादायक वृक्षांची छाटणी व कापणी केल्यानांतर जमा होणारा पालापाचोळा व झाडांचे ओंडके (लाकुड फाटा) विनामोबदला उचलणे चे काम देणेकामी इच्छूक संस्थाचा सहभाग मागविणेकामी EOI (स्वारस्य अभिरूची सुचना) प्रसिध्द करण्यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सुचकाचे नांव- प्रविण शेटटी
स्वाक्षरी

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील
स्वाक्षरी

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराय/सर्वानुमते/~~बहुमाने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १९ **सभा सुचना क्र. ८** **दिनांक : २२/०५/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपलिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरीक संधाना वार्षिक अनुदान देणेबाबतच्या धोरणास/योजनेस मान्यता मिळणेबाबत.

ठराव / निर्णय :- सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला.

सुचक - प्रविण शेटटी

अनुमोदक - मनोज पाटील

Pas

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २० **सभा सुचना क्र. ८** **दिनांक : २२/०५/२०२६**

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका राबवित असलेल्या विविध सामाजिक / सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता १ एप्रिल ते ऑगस्ट २०२६ पर्यंत कार्यरत कंत्राटदारास मुदतवाढ तथा प्रलंबित देयके व माहे एप्रिल ते ऑगस्ट २०२६ पर्यंत नियोजित कार्यक्रमाकरीता सुधारीत प्रशासकीय / वित्तीय मान्यता तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका राबवित असलेल्या विविध सामाजिक / सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता सन २०२६-२७ ते सन २०२७-२८ करीता प्रशासकीय / वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

ठराव / निर्णय :- सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला.

सुचक - प्रविण शेट्टी

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा. सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र.२१ सभा सुचना क्र. ०८ दिनांक :२२/०५/२०२६

विषय :- **PPP (Public Private Partnership) तत्वावर शहरातील उद्यानाकरिता आरक्षित भूखंड, मोकळ्या जागा तसेच गुरचरण जागांवर मियावाकी पद्धतीने वृक्षलागवड व देखभाल करणे तसेच दुभाजकांमध्ये शोभिवंत झाडांची देखभाल करणे इत्यादी कामे करण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या स्वारस्य अभिरुची सूचना (EOI) अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांच्या आधारे कामाचे वाटप करण्याबाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :-

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, शासनामार्फत पर्यावरणीय संतुलन राखणे व शहरामध्ये सौंदर्य निर्माण करण्याच्या अनुषंगाने अशासकीय संस्था तसेच विविध कार्यक्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या इतर खाजगी संस्थांच्या सहभागातून वृक्षलागवड व संगोपन करण्याबाबत सूचना प्राप्त होत असतात. यामागील मुख्य उद्दिष्ट म्हणजे सर्व क्षेत्रांतील नागरिक व संस्थांना शहराच्या सौंदर्यीकरणामध्ये सहभागी करून घेणे तसेच पर्यावरणाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करणे होय.

याबाबत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध आरक्षित व मोकळया भुखंडावर अशासकीय संस्था, विकासक व इतर संस्थांच्या माध्यमातून वृक्षलागवड व संगोपन करणे तसेच दुभाजकांमध्ये शोभिवंत झाडांची देखभाल करणे इत्यादी कामे करणेकामी स्वारस्य अभिव्यक्ती सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार, संदर्भ क्र. १ अन्वये वृक्षलागवड व संगोपनाची कामे करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती सूचना वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर, संदर्भ क्र. २ अन्वये सदर स्वारस्य अभिव्यक्ती सूचनेस मुदतवाढ देऊन ती पुनश्च वृत्तपत्रांमध्ये तसेच महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती.

जाहिर करण्यात आलेल्या सूचनेनुसार विविध संस्थांनी सहभाग नोंदविला असून, संबंधित संस्थांच्या प्रतिनिधीं समवेत उद्यानांसाठी आरक्षित भूखंडांची व दुभाजकांची पाहणी करण्यात आली आहे. सदर पाहणीदरम्यान इच्छुक संस्थांसोबत जागा निवडीबाबत चर्चा करण्यात आली. त्याचा तपशील खालील कोष्टकात सादर करण्यात येत आहे.

अ.क्र.	संस्थेचे नाव	करावयाची कामे	ठिकाण	शेरा
१)	मे. ग्रीन यात्रा	मियावाकी पध्दतीने वृक्ष लागवड व संगोपन करणे.	म्हाडा ग्राऊंड लगतचा नाला परिसर	काम करण्यास सहमत आहे.

२)	मे. प्राक्रिती हॉस्पीटल एल.एल.पी	दुभाजकांमधील व सर्कल मधील शोभिवंत झाडांची देखभाल करणे.	१.म्हाडा चौक (विरार प.) २. जकात नाका ते खारोडी नाका, (विरार प.) ३.छेडा चौक (नालासोपारा प.)	काम करण्यास सहमत आहे.
३)	रोटरी क्लब ऑफ विरार	वृक्ष लागवड व संगोपन करणे.	सायन्स गार्डन व शहरातील गुरूचरण परिसरात वृक्षारोपण	काम करण्यास सहमत आहे.
४)	टू क्म्फर्ट फांऊडेशन	मियावाकी पध्दतीने वृक्षलागवड करणे.	शहरातील गुरूचरण, देवीचा पाडा, विरार गाव मौजे वालीव सर्व्हे नं. ७४ व ७५	काम करण्यास सहमत आहे.
५)	गोदावरी बहुउद्देशीय विकास संस्था, वसई	वृक्ष लागवड व संगोपन करणे.	सुरूची बीच, मौजे- सांडोर, सी.पी.एस., ७/१२ नं. ७०	काम करण्यास सहमत आहे. **(महापालिकेमार्फत रोपे उपलब्ध करून देणे या तत्वावर काम करण्यास इच्छूक आहे.)**
६)	ॲबसोल्यूट इंडिया मेडीकल ॲण्ड ऐज्युकेशन फांऊडेशन, वसई	वृक्ष लागवड व संगोपन करणे.	सुरूची बीच, मौजे- मालोंडे,७/१२ नं. ६९	काम करण्यास सहमत आहे. **(महापालिकेमार्फत रोपे उपलब्ध करून देणे या तत्वावर काम करण्यास इच्छूक आहे.)**

सदर शहरातील विकासकामांच्या अनुषंगाने पर्यावरणातील प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने उपलब्ध जागेनुसार नागरी क्षेत्रामध्ये मियावाकी वने (Urban Forest) विकसित करणे त्याची देखभाल, वृक्षलागवड व दुभाजकांमधील शोभिवंत झाडांची देखभाल करणे इत्यादी कामे करण्यासाठी वरील कोष्टकात नमूद केल्याप्रमाणे एकूण ०६ संस्थांनी सहभाग नोंदविला आहे. संबंधित संस्थांकडून करावयाच्या कामाचे सविस्तर सादरीकरण करणे आवश्यक होते.

त्याअनुषंगाने, मा. अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली स्वारस्य अभिव्यक्ती सूचनेअंतर्गत सहभाग नोंदविलेल्या संस्थांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये संबंधित संस्थांना सविस्तर सादरीकरण करण्याबाबत तसेच आवश्यक सुधारणांसह प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले होते.

त्यानुसार, वरील नमूद ०६ संस्थांनी वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे कामे करण्यास सहमती दर्शविली आहे. प्राप्त प्रस्तावांनुसार संबंधित संस्थांना अपेक्षित कामे ०५ वर्षांच्या कालावधीसाठी विनामोबदला पद्धतीने करण्यास मान्यता देणे तसेच त्यांच्यासोबत करारनामा करून कार्यादेश निर्गमित करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीकरीता सादर करणेत येत आहे.

ठराव निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील PPP (Public Private Partnership) तत्वावर शहरातील उद्यानाकरिता आरक्षित भूखंड, मोकळ्या जागा तसेच गुरचरण जागांवर मियावाकी पद्धतीने वृक्षलागवड व देखभाल करणे तसेच दुभाजकांमध्ये शोभिवंत झाडांची देखभाल करणे इत्यादी कामे करण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या स्वारस्य अभिरुची सूचना (EOI) अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांच्या आधारे कामाचे वाटप करण्यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सुचकाचे नांव- प्रविण शेट्टी
स्वाक्षरी

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील
स्वाक्षरी

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------
ठराय/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका